97-8

ISSN 0973 - 8452

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर चैत्र–ज्येष्ठ 1932
एप्रिल–जून 2010/ खंड 34 अंक 1





- मराठवाड्याच्या मानवी विकासाचा आढावा
- जागतिक घसरण व आर्थिक मंदीची सैध्दांतिक मीमांसा
- गोवा राज्याच्या पर्यटनातील समस्या
- टाटांची कामगिरी : एक पुनरावलोकन
- भाववाढ न रोखणारे मध्यममार्गी बजेट
- महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान – विशेष अभ्यास बारामती तालुका, जि. पुणे
- जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र – तुलनात्मक अध्ययन

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः ।।
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

www.marthpari.org

# अर्थसंवाद

एप्रिल - जून 2010/खंड 34, अंक 1

प्रमुख संपादक
जगन्नाथ शामराव पाटील

सहायक संपादक
संतोषकुमार बबनराव यादव

सल्लागार मंडळ
(2009-12)
लालासाहेब घाटगे
मोहन चौधरी
शिवाजी अंभोरे
संतोष कदम

संपादकीय पत्रव्यवहार
जगन्नाथ शामराव पाटील
शांती प्लाझा, बी- 9,
880/881, शनिवार पेठ.
सातारा. 415 002
मो.9423261796
फोन:(02162)233152

## । अ नु क्र म णि का ।

**मराठवाड्याच्या मानवी विकासाचा आढावा**
दीपक भारती . . . . . . . . 1

**जागतिक घसरण व आर्थिक मंदीची सैध्दांतिक मीमांसा**
एम.एन.शिंदे, डी. के. मोरे . . . . . . . . 26

**गोवा राज्याच्या पर्यटनातील समस्या**
वासुदेव नारायण सावंत. . . . . . . . 39

**टाटांची कामगिरी : एक पुनरावलोकन**
वसुधा जोशी . . . . . . . . 45

**भाववाढ न रोखणारे मध्यममार्गी बजेट**
विनायक म. गोविलकर . . . . . . . . 55

**महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान – विशेष अभ्यास बारामती तालुका, जि. पुणे**
मुलाणी एम. यु. . . . . . . . . 62

**श्रध्दांजली : पॉल अँथनी सॅम्युअलसन**
सु. गो. भानुशाली . . . . . . . . 79

**जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र – तुलनात्मक अध्ययन**
राधेशाम किसनराव राऊत . . . . . . . . 90

मराठी अर्थशास्त्र परिषद
कार्यकारी मंडळ(2009-10)

अध्यक्ष
मुक्ता दिगंबर जहागिरदार

कार्याध्यक्ष
दिलीप खंडेराव पाटील (सांगली)

कार्यवाह–खजिनदार
अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

प्रमुख संपादक अर्थसंवाद
जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

विश्वस्त
ज. फा. पाटील
के.जी.पठाण
चारूदत्त गोखले

सदस्य
1) हिरालाल चव्हाण(जळगाव)
2) प्रशांत काटोले (अमरावती)
3) अविनाश निकम (शहादा)
4) रामकृष्ण टाले (नागपूर)
5) विकास सुकाळे (नांदेड)
6) ज्ञानोबा मोरे (उस्मानाबाद)
7) महंमद रफिक मुलाणी (पुणे)
8) तानाजी भोसले (सांगली)
9) श्रीरंग मंडले (सिंधुदूर्ग)
10) वनिता चोरे (अमरावती)
11) बाळासाहेब माने (सांगली)
12) शामराव कुलकर्णी (बदलापूर)

अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :
1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली
2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
(टीप : म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.)

कार्यालयीन पत्रव्यवहार
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह – खजिनदार – मराठी अर्थशास्त्र परिषद,
" गोदाई " शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी 413 411. जि.सोलापूर
दूरध्वनी (02184) 224294 मो.9011339906

परिषदेचे प्रमुख कार्यालय :
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कॅंपस प्लॉट क्र.6 एफ. ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सहकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई 400051

**वर्गणी :**

अ) परिषदेचे सदस्य :

| | |
|---|---|
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रू. 2000 |
| साधारण सदस्य | : रू.300 (वार्षिक) |

आ) संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था | : रू.250 (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रू.600 (त्रैवार्षिक) |
| ग्रंथालये | : रू.1000(पंचवार्षिक) |

इ) वर्षगणना — 1 एप्रिल ते 31 मार्च

*** संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.**

*** कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.**

* अर्थसंवादची वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने प्रमुख संपादकांकडे पाठवावी.

# मराठवाड्याच्या मानवी विकासाचा आढावा

दीपक भारती,
अर्थशास्त्र विभाग, श्री मुक्तानंद महाविद्यालय,
गंगापूर, जि. औरंगाबाद
मोबाईल : 9422353611

**प्रास्ताविक :**

मानवी जीवनाची गुणवत्ता वाढविण्यासाठीच्या विकासाचे वास्तव ध्येय निर्देशित करणारी संकल्पना म्हणजे मानवी विकास होय. आजच्या अलौकिक अशा भरभराटीच्या जगात आपण जीवन जगत असताना गरीब लोक विशेषत: गरीब स्त्रिया व मुले ही मानवी हानीचे धक्के सातत्याने सहन करीत असल्याचे आढळते. त्यामुळे कोणत्याही देशातील विकासाच्या प्रक्रियेने मानवी विकासाची गती वाढविण्याचा अनुभव सर्वसामान्य घटकांना देखील दिला पाहिजे याची प्रचिती येते.

गेल्या चार-पाच दशकांमध्ये विकासाच्या संकल्पनेत झालेल्या परिवर्तनाचा परिपाक म्हणजेच 1990 मध्ये उदयास आलेली 'मानवी विकास' ही संकल्पना होय. 1990 पूर्वी आर्थिक विकासाच्या मोजमापासाठी प्रामुख्याने स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP) या निर्देशकाचा आधार घेतला जात असे; मात्र या निर्देशकाच्या मदतीने विकासाचे वास्तव चित्र दृष्टिक्षेपात येत नव्हते. म्हणून विकासाचे व्यापक असे विस्तारित निर्देशांक तयार करून आर्थिक विकासाचे मोजमाप करण्याच्या प्रयत्नांनी वेग घेतला. या प्रयत्नांमधून 'मानव विकास निर्देशांक' ही संकल्पना 1990 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या विकास कार्यक्रमामार्फत मांडण्यात आली.

1990 पर्यंत जगातील प्रत्येक देश आर्थिक विकास हे अंतिम साध्य समजून आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी धडपड करीत होता; मात्र 1990 च्या दशकात उदयास आलेल्या 'मानवी विकास' संकल्पनेने हे

समीकरण बदलून टाकले. ज्यानुसार सद्य:स्थितीत मानवी विकास हे साध्य बनले असून आर्थिक वृद्धी व विकास हे साधन बनल्याचे सर्वमान्य झाले आहे. त्यामुळे आज जगातील प्रत्येक देश लोकसंख्येच्या गुणवत्तेवर भर देणाऱ्या मानवी विकासाला प्राधान्यक्रम देताना दिसतो. एवढेच नव्हे तर प्रत्येक देश आर्थिक वृद्धी या साधनाच्या मदतीने आज मानवी विकास हे साध्य प्रत्यक्षात आणण्यासाठी धडपडताना दिसतो आहे. 'मानवी विकास ' ही संकल्पना आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास या संकल्पनांपेक्षा अधिक व्यापक असल्याने विद्यानिष्ठ व्यक्ती, संशोधक, योजनाकार आणि धोरणकर्ते या सर्वांमध्ये स्वीकारणीय बनलेली आहे. शिवाय ही संकल्पना लोकसंख्येच्या दुसऱ्या आणि महत्त्वाच्या अशा 'गुणात्मक' पैलूंवर अधिक भर देते.

2008 च्या मानव विकास अहवालानुसार भारताचा 128 वा क्रम लागतो. यावरून भारतातील लोकसंख्येची सुप्त गुणवत्ता अजूनही मोठ्या प्रमाणावर अविकसित राहिली असल्याचा अंदाज बांधता येतो.

अमेरिकेचे माजी राष्ट्रपती डब्ल्यु. जे. क्लिंटन (2000) यांनी हैद्राबाद येथे ''दारिद्रय निर्मूलन व नवनवीन तंत्रज्ञान'' या विषयावर बोलताना असे प्रतिपादित केले होते की, ''भारतातील दशलक्ष लोक हे **इंटरनेटशी** जोडले गेले आहेत. परंतु त्यापेक्षाही अधिक भारतीय लोक अद्यापदेखील पिण्याच्या स्वच्छ पाण्याशी जोडले गेले नाहीत. त्याच बरोबर जगातील एकूण सॉफ्टवेअर इंजिनिअर पैकी 30 टक्के सॉफ्टवेअर इंजिनिअर भारतीय आहेत, तर दुसऱ्या बाजूस जगातील एकूण उपासमार सहन करणाऱ्या लोकांपैकी 25 टक्के लोक हे भारतीय आहेत हे विसरायला नको. त्यामुळे दारिद्र्याविरूद्ध लढा देण्यासाठी व्यक्तील नवनवीन शोधांच्या माध्यमातून सामर्थ्यशाली शस्त्र हाती घ्यावी लागतील.'' मानवी विकासाच्या प्रक्रियेत अशा शोधांचे व शोध प्रयत्नांचे महत्त्व टिकून राहते.

प्रस्तुत लेखामध्ये मानव विकास अहवाल महाराष्ट्र 2002 च्या आधारे मानव विकास निर्देशांकातील महत्त्वाचे निर्देशक निवडून पूर्वीपासूनच मागासलेला विभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठवाडा विभागातील महत्त्वाच्या अशा लोकसंख्या, दरडोई उत्पन्न, शिक्षण, आरोग्य, मूलभूत सुविधा इत्यादी क्षेत्रांतील स्थितीचे जिल्ह्यानिहाय मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्या शब्दांत असे म्हणता येईल की, 'मिलेनिअम डेक्लेरेशनमध्ये' जगातील सर्व देशांनी, जी आठ ध्येये 2015 पर्यंत मिळविण्याचे वचन दिले होते, त्या वचनपूर्तीच्या दृष्टीने देशातील व राज्यातील सरकार किती अग्रेसर आहेत, तसेच त्या दृष्टीने शासन करीत असलेल्या प्रयत्नांना मराठवाडा विभाग कितपत प्रतिसाद देत आहे, याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**मानवी विकासाची संकल्पना**

संपूर्ण जगाची विभागणी विकसित,

अविकसित आणि विकसनशील अशा तीन गटांत केली जाते. आज या तिनही गटांतील प्रत्येक देश आपल्या देशातील साधनसंपत्ती आणि आपल्या गरजा विचारात घेऊन विविध व्यूहरचनांच्या माध्यमातून विकासाकडे वाटचाल करताना दिसतो. विकासाच्या प्रक्रियेत प्रत्येक देश हा राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न यामध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसते. याचा परिणाम म्हणून जागतिक आर्थिक विकासात असमतोलपणा जाणवू लागला आहे. दारिद्रय, लोकसंख्या विस्फोट, वाढते नागरीकरण व औद्योगिकीकरण, नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकी वापर यामुळे पर्यावरणात असमतोल निर्माण होऊन संपूर्ण मानव जातीचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे. याबाबतीत सुधारणेच्या दृष्टीने म्हणजे जागतिक आर्थिक विकासात समतोलपणा आणण्यासाठी व पर्यावरणात समतोल राखण्यासाठी 1990 मध्ये जन्मास आलेल्या 'मानवी विकास' या संकल्पनेची भूमिका दिवसेंदिवस विस्तारत असल्याचे दिसते.

1990 च्या पहिल्या मानवी विकास अहवालात यू.एन.डी.पी.ने मानवी विकासाचे दिलेले स्पष्टीकरण दुसऱ्या शब्दांत पुढीलप्रमाणे मांडता येईल.

मानवी विकास म्हणजे लोकांच्या निवडी (Choices) विस्तारण्याची प्रक्रिया होय. तत्त्वत: या निवडी अमर्याद आणि काळानुरूप बदलणाऱ्या आहेत; पण विकासाच्या प्रत्येक पातळीवर तीन घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत.

1) आरोग्यदायी व दीर्घायुषी जीवन जगणे.

2) ज्ञानप्राप्ती करणे.

3) चांगले जीवनमान जगण्यासाठी लागणाऱ्या संसाधनांची निवड करण्याची सवलत मिळणे.

जर या निवडी उपलब्ध असतील, तर इतर संधी प्राप्त करणे सुसाध्य होईल; तथापि, या व्यतिरिक्त इतर संधी म्हणजे 1) राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य, 2) क्रियाशील आणि उत्पादक संधी, 3) आत्मसन्मान उपभोगणे व 4) मानवी हक्कांची हमी होय.

**महबूब-उल-हक** (2004) असे म्हणतात की, ''मानवी विकास प्रारूप हे विकासाचे सर्वसमावेशक प्रतिमान आहे. यामध्ये आर्थिक वृद्धी, सामाजिक गुंतवणूक, लोकांचे सबलीकरण, मुलभूत गरजा आणि सुरक्षितता यांची तरतूद, राजकीय आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य आणि मानवी जिवनाचे इतर सर्व पैलूं की, ज्यांचा विकास होऊ शकेल अशा सर्वांचा या प्रारूपात समावेश होतो.''

**राव व्ही. एम.** (1996) यांच्या मते, ''मानवी विकास हा एका प्रक्रियेतून घडून येतो, ज्यामध्ये कुटुंबीय पुरेशी गुंतवणूक करतात किंवा तसे करण्यास मदत करतात. आणि महिला, मुले व कुटुंबातील सर्व सदस्यांना सुदृढ आरोग्य, शिक्षण, उत्पादक संपत्ती आणि कौशल्य मिळविण्यासाठी समर्थ बनवितात.'' जर कुटुंबियांमध्ये व्यापक सुधारणेसाठी काम करण्याची तीव्र प्रेरणा असेल, तर केवळ तेव्हाच ही मानवी विकासाची प्रक्रिया वेग धरेल असे त्यांना वाटते.

एकूण मानवी विकासाचा वेगवेगळ्या तज्ज्ञांनी लावलेला अर्थ लक्षात घेता शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेचे साधन या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूंसाठी दिलेला लढा आणि त्यांची प्रत्यक्षात झालेली पूर्तता यांचा मिलाफ म्हणजे मानव विकास होय. यावरून मानवी विकास ही संकल्पना आर्थिक विकास या संकल्पनेपेक्षा व्यापक आहे, असे म्हणता येईल. एवढेच नव्हे तर मानवी विकासामध्ये आर्थिक विकास व सामजिक विकास दोन्ही अभिप्रेत असल्याचे लक्षात येते.

**मानव विकास निर्देशांकातील महत्त्वाचे निर्देशक व मराठवाडा**

1990 मध्ये विकासाचे अंतिम ध्येय म्हणून उदयास आलेली मानवी विकासाची संकल्पना ही विकासाच्या दोन्ही बाजू म्हणजे मागणी व पुरवठा यांना व्यापणारी असल्याने ही संकल्पना अभ्यासक, अर्थतज्ज्ञ, नियोजनकार व धोरणकर्ते या सर्व स्तरांतून स्वीकारार्ह बनलेली आहे. ज्याचा परिणाम म्हणून भारतासारख्या विकसनशील देशांमधून राज्य पातळीवर राज्यासाठीच्या मानव विकास अहवाल प्रकाशित करण्याच्या प्रयत्नांना वेग प्राप्त झाला. देशात सर्व प्रथम मध्यप्रदेश या राज्याने राज्यासाठीचा मानव विकास अहवाल प्रकाशित केला. त्यानंतर कर्नाटक, सिक्कीम व राजस्थान या राज्यांनीही या कार्यास प्रारंभ केला. महाराष्ट्र हे देशातील औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रापेक्षा कमी विकसित राज्यांनी मानव विकास अहवाल प्रकाशनात पुढाकार घेतल्याने महाराष्ट्र शासनाने देखील या दृष्टीने प्रयत्नांना सुरुवात केली. 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, तेव्हापासून राज्याने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात आश्वासक अशी प्रगती साध्य केली आहे. या सर्व प्रगतीचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने 2002 मध्ये आपला पहिला मानव विकास अहवाल प्रकाशित केला. सरकारला भविष्यातील धोरण-निश्चितीसाठी मदत व्हावी, या हेतूने मानव विकास अहवाल तयार करण्याची कल्पना फेब्रुवारी 2001 मध्ये पुढे आली होती. जवळपास 14 महिन्यांच्या कालावधीत म्हणजे 2002 (एप्रिल) मध्ये महाराष्ट्र मानव विकास अहवाल प्रत्यक्षात आला. महाराष्ट्रातील मानवी अभावग्रस्तता हे राज्यापुढे असलेले एक मोठे आव्हान असल्याने हे आव्हान वेळीच दूर करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र मानव विकास अहवालात राज्यातील मानवी विकासाची पातळी राज्य, तसेच जिल्हा स्तरावर अभ्यासण्यात आली आहे.

अमर्त्य सेन (2004) हे आपल्या 'डेव्हलपमेंट अँड कॅपॅबिलिटी एक्सपॅन्शन' या लेखात असे नमूद करतात की, मानव हा विकासाचा प्रतिनिधी (Agent), लाभार्थी आणि निर्णयकर्ता (Adjudicator) आहे; पण त्याचबरोबर तो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे उत्पादनाचे प्राथमिक साधन आहे. मानवाची ही दुहेरी भूमिका नियोजन व धोरण निश्चितीमधील साध्य आणि साधनाकरिता अनुकूल वातावरण पुरवते. कोणीही मानवी सुखाची हमी देऊ शकत नाही. आणि लोक-जे निवड करतात ते त्यांच्या स्वत:शी

संबंधित असते; परंतु विकासाच्या प्रक्रियेने मानवासाठी (व्यक्तिगत आणि सामुहिक) एक अनुकूल वातावरण निर्माण केले पाहिजे की, ज्यामुळे मानवाला आपल्या क्षमतांचा पूर्ण विकास करता येईल आणि गरजेनुसार व आवडीनुसार उत्पादक आणि क्रियाशील (Creative) जीवन जगण्याची योग्य संधी मिळेल.

महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 चा आधार घेऊन मराठवाड्यातील जिल्हानिहाय मानव विकास स्थितीच्या संदर्भात मानवाची दुहेरी भूमिका नियोजन व धोरण निश्चितीमधील साध्य आणि साधनांकरिता कितपत अनुकूल वातावरण पुरवत आहे व विकासाची प्रक्रिया मानवी क्षमतांच्या विकासासाठी कितपत अनुकूल वातावरण उपलब्ध करून देत आहे, या दोन्ही बाजूंचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठवाड्यातील जिल्हानिहाय मानव विकास स्थितीचा आढावा घेण्यासाठी प्रामुख्याने मानव विकासाच्या खालील निर्देशकांचा आधार घेण्यात आला आहे. 1) लोकसंख्या, 2) शिक्षण, 3) आरोग्य व 4) आर्थिक वृद्धी

**1) लोकसंख्या :**

मानवी विकास ही संकल्पना लोकसंख्येच्या महत्त्वाच्या अशा 'गुणात्मक' पैलूवर अधिक भर देणारी आहे. एखाद्या विशिष्ट देशातील, प्रांतातील, भागातील लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा हा त्या भागातील मानव विकास स्थितीच्या सुधारणेत महत्त्वाची भूमिका बजावतो. भारत हा लोकसंख्येच्या दृष्टीने जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे, तर 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र हे भारतातील लोकसंख्या आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. 1960 पासून महाराष्ट्र राज्याचा एक घटक म्हणून अस्तित्वात आल्यापासून मराठवाड्याच्या लोकसंख्येत देखील सातत्याने वाढीची प्रवृत्ती दिसून येते. महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 नुसार 1991-2001 या दशकातील मराठवाड्यातील लोकसंख्यावाढीचे प्रतिशत प्रमाण किंवा दशवर्षीय वृद्धि दर हा 21.78 टक्के दिसतो, जो 1971-1981 च्या तुलनेत (20.73 टक्के) अधिक आहे, तर 1981-91 च्या तुलनेत (31.38 टक्के) कमी दिसतो; मात्र अजूनही मराठवाड्याच्या लोकसंख्या वृद्धि दरात अपेक्षित घट घडून आलेली दिसत नाही.

**यू.एन.डी.पी.ने.** (1990) प्रकाशित केलेल्या पहिल्या मानव विकास अहवालातील मध्यवर्ती निष्कर्षांमध्ये असाही एक निष्कर्ष आहे, की 'मानवी विकासाच्या पातळीतील सदृश्य सुधारणेसाठी लोकसंख्या वृद्धिदरात उल्लेखनीय घट ही निरपेक्षत: आवश्यक असते.'

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय लोकसंख्येची स्थिती :**

तक्ता क्र. 1 मध्ये मराठवाड्यातील जिल्हानिहाय लोकसंख्या, लोकसंख्येची स्त्री-पुरूष विभागणी, स्त्री-पुरूष गुणोत्तर व लोकसंख्येची घनता व 1991-2001 या काळातील लोकसंख्येचा दशवर्षीय वृद्धिदर दर्शविला आहे.

**1) लोकसंख्येचा आकार :**

तक्ता क्र. 1

**1991 व 2001 या वर्षाकरिता मराठवाड्यातील जिल्हा निहाय लोकसंख्या, दश वर्षीय वृद्धिदर, स्त्री–पुरूष गुणोत्तर (FMR) व लोकसंख्येची घनता**

| अ. क्र. | जिल्हा / विभाग / राज्य | 1991 | | | | | 2001 | | | | | 1991-2001 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकूण | FMR | लोकसंख्येची घनता | पुरूष | स्त्रिया | एकूण | FMR | लोकसंख्येची घनता | दश वर्षीय वृद्धि दर |
| 1 | औरंगाबाद | 11,51,693 | 10,62,086 | 22,13,779 | 922 | 219 | 15,21,632 | 13,98,916 | 29,20,548 | 919 | 289 | 31.93 |
| 2 | जालना | 6,96,798 | 6,67,627 | 13,64,425 | 958 | 177 | 8,25,977 | 7,86,380 | 16,12,357 | 952 | 209 | 18.17 |
| 3 | परभणी | 6,61,700 | 6,31,404 | 12,93,104 | 954 | 192 | 7,61,937 | 7,29,172 | 14,91,109 | 957 | 229 | 15.31 |
| 4 | हिंगोली | 4,22,094 | 4,01,837 | 8,23,931 | 952 | - | 5,05,188 | 4,81,529 | 9,86,717 | 953 | 218 | 19.76 |
| 5 | बीड | 9,37,410 | 8,84,662 | 18,22,072 | 944 | 170 | 11,20,664 | 10,39,177 | 21,59,841 | 927 | 202 | 18.54 |
| 6 | नांदेड | 11,97,876 | 11,32,498 | 23,30,374 | 945 | 221 | 14,76,301 | 13,91,857 | 28,68,158 | 943 | 272 | 23.08 |
| 7 | उस्मानाबाद | 6,58,896 | 6,17,431 | 12,76,327 | 937 | 169 | 7,62,947 | 7,09,309 | 14,72,256 | 930 | 195 | 15.35 |
| 8 | लातूर | 8,63,203 | 8,13,438 | 16,76,327 | 942 | 234 | 10,74,321 | 10,03,916 | 20,78,237 | 934 | 290 | 23.95 |
| 9 | मराठवाडा | 65,89,670 | 62,10,983 | 1,28,00,653 | 943 | 197 | 80,48,967 | 75,40,256 | 1,55,89,323 | 937 | 238 | 21.78 |
| | | (16.14) | (16.30) | (16.22) | | | (15.99) | (16.24) | (16.11) | | | |
| 10 | महाराष्ट्र | 4,08,25,618 | 3,81,11,569 | 7,89,37,187 | 934 | 257 | 5,03,34,270 | 4,64,17,677 | 9,67,52,247 | 922 | 314 | 22.57 |

संदर्भ : मानव विकास अहवाल : महाराष्ट्र (2002) तक्ता क्र. 2 व 3 पान क्र. 145 - 147.

टिप : 1) 1991 साठीच्या हिंगोली जिल्ह्याच्या लोकसंख्या घनतेचा परभणी जिल्ह्यामध्ये समावेश आहे.

2) मराठवाड्याची लोकसंख्येची घनता सरासरीने घेतली आहे.

3) कंसातील आकडे राज्याच्या एकूण लोकसंख्येतील प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे मराठवाड्यातील एकूण लोकसंख्येचा 1991 च्या जनगणनेनुसार राज्याच्या एकूण लोकसंख्येतील प्रतिशत वाटा 16.22 टक्के होता, जो 2001 मध्ये फारसा बदल न होता 16.11 टक्के दिसतो. 1991 जनगणनेनुसार जिल्हा निहाय लोकसंख्येचा आकार लक्षात घेता नांदेड जिल्हा आघाडीवर असून हिंगोली जिल्ह्याची लोकसंख्या सर्वात कमी आढळते. 2001 मध्ये नांदेड जिल्ह्याला मागे टाकून औरंगाबाद जिल्हा सर्वाधिक मोठा जिल्हा (लोकसंख्या आकाराच्या दृष्टीने) दिसून येतो.

**2) लोकसंख्येची स्त्री-पुरूष विभागणी:**

तक्ता क्र. 1 नुसार 1991 मध्ये मराठवाड्याच्या एकूण लोकसंख्येत पुरुष लोकसंख्येचे प्रमाण 51.48 टक्के होते, तर स्त्री-लोकसंख्येचे प्रमाण 48.52 टक्के होते, ज्यामध्ये 2001 च्या जनगणनेनुसार पुरूष लोकसंख्येचे प्रमाण वाढून 51.63 टक्क्यांपर्यंत, तर स्त्री लोकसंख्येचे प्रमाण कमी होऊन ते 48.36 टक्क्यांपर्यंत आल्याचे दिसते.

जिल्हा निहाय तुलना केल्यास तक्ता क्र. 1 नुसार जवळपास प्रत्येक जिल्ह्यातील लोकसंख्येच्या स्त्री-पुरूष विभागणीतील असमतोल सातत्याने वाढत असल्याचे दिसते. मराठवाड्यातील मानवी विकासाच्या दृष्टीने ही बाब चिंतेची ठरते.

**3) स्त्री-पुरूष गुणोत्तर :** (FMR)

देश व राज्य पातळीप्रमाणेच मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरात अधोगती होत असल्याचे दिसून येते. तक्ता क्र. 1 नुसार 1990 मध्ये मराठवाड्यातील दर हजार पुरुषामागे असणारी स्त्रियांची संख्या राज्य सरासरीपेक्षा (934) जास्त म्हणजे 943 होती, ज्यामध्ये 2001 च्या जनगणनेनुसार घट होऊन हे गुणोत्तर राज्य सरासरीपेक्षा जरी जास्त 922 असले तरी मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे दिसते.

जिल्हा निहाय तुलना केल्यास 1991 मध्ये सर्वाधिक स्त्री-पुरूष गुणोत्तर जालना जिल्ह्याचे (958) तर सर्वात कमी औरंगाबाद जिल्ह्याचे (922) होते, तर 2001 च्या जनगणनेनुसार सर्वाधिक गुणोत्तर परभणी जिल्ह्याचे (957), तर सर्वात कमी औरंगाबाद जिल्ह्याचे (919) आढळते.

औरंगाबाद हे मराठवाड्याची राजधानी म्हणून ओळखली जाते. औरंगाबाद जिल्ह्यात झालेले औद्योगिकीकरण व त्यातून मरावाड्यातील इतर जिल्ह्यांमधून रोजगारासाठी पुरूष लोकसंख्येचे औरंगाबाद जिल्ह्यामध्ये होणारे स्थलांतर हे औरंगाबाद जिल्ह्याचे स्त्री-पुरूष गुणोत्तर प्रभावित करण्यामध्ये जरी महत्त्वाची भूमिका बजावत असले, तरीही इतर जिल्ह्यांमध्येही औरंगाबादप्रमाणेच सातत्याने घटीची प्रवृत्ती आढळते.

लोकसंख्येतील स्त्री-पुरूष गुणोत्तरात होणारी घट ही जन्म घेणारी मुलगी कशी उपेक्षित आणि दुर्लक्षित राहते, याची द्योतक मानली जाते; पण त्याचबरोबर गर्भाची लिंग निश्चिती करून केले जाणारे गर्भपातही या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसतात. यामागे प्रमुख दोन उद्दिष्टे मानली जातात. एक म्हणजे छोट्या कुटुंबाची निकड; पण त्याचबरोबर घरात मुलगा जन्माला आलाच पाहिजे, ही भावना अधिक प्रभावी ठरत

असल्यानेच असे निर्णय घेतले जातात.

मराठवाड्यातील सातत्याने घटत जाणाऱ्या स्त्री-पुरूष गुणोत्तरावरून समाजाचा मुलीकडे (स्त्रियांकडे) पाहण्याचा दृष्टिकोन सुद्धा अधोरेखित होतो. स्त्री-पुरूष विषमतेची दरी कमी होणे हे मानवी विकासात अभिप्रेत असताना देश, राज्य व मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरात सातत्याने होणारी घट ही चिंतेची बाब असल्याचे लक्षात येते.

**4) लोकसंख्येची घनता :**

मराठवाड्यातील लोकसंख्येची घनता ही सातत्याने वाढताना दिसते. तक्ता क्र. 1 नुसार मराठवाड्यातील लोकसंख्येची घनता 1991 मध्ये सरासरी 197 होती, ज्यामध्ये 2001 मध्ये उल्लेखनीय वाढ होऊन लोकसंख्येची सरासरी घनता 238 पर्यंत पोचल्याचे दिसते. दर चौरस किलो मीटरमागे राहणाऱ्या लोकसंख्येचे हे वाढते प्रमाण लक्षात घेता मराठवाड्यातील लोकसंख्यावाढीची तीव्रता लक्षात येते. 2001 नुसार विभागात सर्वाधिक लोकसंख्येची घनता लातूर (290) जिल्ह्याची, तर सर्वात कमी उस्मानाबाद (195) जिल्ह्याची आढळते.

**5) लोकसंख्या वृद्धी**

तक्ता क्र. 1 मध्ये मराठवाड्यातील जिल्हा निहाय लोकसंख्येचा दशवर्षीय वृद्धिदर, तर तक्ता क्र. 2 मध्ये मराठवाड्यासह राज्यातील इतर लोकसंख्येतील वृद्धी दर्शविलेली आहे.

तक्ता क्र. 2 नुसार 1991-2001 या दहा वर्षातील मराठवाड्यातील सरासरी लोकसंख्येचा दश वर्षीय वृद्धि दर 21.78 टक्के आहे, जो राज्य सरासरीपेक्षा (22.57 टक्के) कमी दिसतो; मात्र विभागातील जिल्हा निहाय लोकसंख्या वृद्धी लक्षात घेतल्यास लोकसंख्येचा सर्वाधिक दश वार्षिक वृद्धि दर औरंगाबाद जिल्ह्याचा (31.93 टक्के), तर सर्वात कमी परभणी जिल्ह्याचा (15.31 टक्के) आढळतो. एकूणच जिल्हा निहाय लोकसंख्या वृद्धीमध्ये बरीच तफावत असल्याचे तक्त्यावरून लक्षात येते.

तक्ता क्र. 2 नुसार मराठवाड्यातील

**तक्ता क्र. 2**

**महाराष्ट्रातील विभागनिहाय लोकसंख्येतील वाढ**

| अ. क्र. | विभाग | प्रति शत वाढ 1971-1981 | प्रति शत वाढ 1981-1991 | प्रति शत वाढ 1991-2001 |
|---|---|---|---|---|
| 1 | कोकण | 32.04 | 27.12 | 28.03 |
| 2 | पुणे | 22.37 | 25.46 | 21.69 |
| 3 | नाशिक | 23.09 | 24.82 | 21.83 |
| 4 | मराठवाडा | 20.73 | 31.38 | 21.78 |
| 5 | नागपूर | 24.16 | 21.76 | 18.23 |
| 6 | अमरावती | 21.04 | 20.81 | 18.67 |

संदर्भ : मानव विकास अहवाल महाराष्ट्र तक्ता क्र. 3.10, पान क्र. 21

लोकसंख्येच्या दशवर्षीय वृद्धिदराची राज्यातील इतर विभागांशी तुलना केली असता 1971-1981 या दशकातील मराठवाड्यातील लोकसंख्येची प्रतिशत वाढ 20.73 टक्के होती, जी राज्यात सर्वात कमी प्रतिशत वाढ होती. मात्र 1981-1991 या दशकात राज्यात सर्वाधिक प्रतिशत वाढ ही मराठवाड्यात (31.38 टक्के) झाल्याचे लक्षात येते, तर सर्वात कमी अमरावती विभागात (20.81 टक्के) दिसून येते. 1991-2001 या दहा वर्षांतील लोकसंख्येतील प्रतिशत वाढीनुसार मराठवाड्यातील प्रतिशत वाढ (21.78 टक्के) जरी 1981-1991 च्या तुलनेत (31.38 टक्के) कमी झाली असली, तरी 1991-2001 च्या दशकातील मराठवाड्यातील प्रतिशत वाढ (21.78 टक्के) ही राज्यातील अमरावती (18.67 टक्के), नागपूर (18.23 टक्के), पुणे (21.69 टक्के) या तिनही विभागांच्या तुलनेत अधिक दिसते.

मानवी विकासासाठी लोकसंख्येच्या वृद्धिदरात उल्लेखनीय घट आवश्यक असताना मराठवाड्यातील लोकसंख्येच्या दश वर्षीय वृद्धि दरावरून मराठवाड्यातील लोकसंख्येच्या वृद्धि दरात अजूनही उल्लेखनीय घट साधता आलेली नाही असा निष्कर्ष काढता येतो. याचाच अर्थ लोकसंख्या नियंत्रण प्राप्त करण्यासाठी शासनाने अवलंबिलेले धोरण अजूनही समाधानकारक फल निष्पत्ती देताना दिसत नाही. दुसऱ्या बाजूने लोकसंख्या वाढीचे गांभीर्य सर्वसामान्य लोकांपर्यंत पूर्णत: पोचल्याचे दिसते नाही असेच म्हणावे लागेल. मराठवाड्यातील मानवी विकासाची पातळी सुधारण्याच्या दृष्टीने लोकसंख्या वृद्धीमध्ये उल्लेखनीय घट जरूरीची आहे व त्यासाठी लोकसंख्या वृद्धीचे गांभीर्य लोकांपर्यंत पोचणे महत्त्वाचे आहे. एकूणच याबाबतीत यश प्राप्तीसाठी शासन व लोक दोघांचीही भूमिका महत्त्वाची असल्याने दोन्ही बाजूंनी प्रयत्न व प्रतिसाद आवश्यक ठरतो.

**2) आरोग्य :**

मानवी विकासाच्या प्रत्येक पातळीवर जे घटक महत्त्वाचे आहेत, त्यांतील महत्त्वाचा घटक म्हणजे लोकांना आरोग्यदायी व दीर्घकालीन जीवन प्राप्त होणे होय. एकूणच मानवी जीवनाची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्देशक म्हणून आरोग्य व पोषण यास महत्त्वाचे स्थान आहे. मानवी विकासाचा सबलीकरण (Empowerment) हा अत्यंत आवश्यक घटक आहे. मानवी विकासाच्या प्रक्रियेत लोकांच्या सबलीकरणासाठी ज्या विविध आघाड्यांवर काम करण्याची गरज आहे, त्यापैकी महत्त्वाची बाब म्हणजे लोकांचे आरोग्य होय.

अमर्त्य सेन (1991) यांनी नमुद केल्यानुसार, खऱ्या संधी किंवा क्षमता प्राप्त होणे ज्या अनेक घटकांवर अवलंबून असते, त्यांतील महत्त्वाचा घटक म्हणजे 'आरोग्य' होय. म्हणूनच मानवी विकासाच्या दृष्टीने लोकसंख्येच्या गुणवत्ता वाढविणाऱ्या शिक्षण या घटकाबरोबर 'आरोग्य' या घटकास तितकेच महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसते.

**मराठवाड्यातील प्रजनन व बाल आरोग्य निर्देशकांची स्थिती :**

तक्ता क्र. 3 मध्ये मराठवाड्यातील प्रजनन व बाल आरोग्य निर्देशकांची स्थिती दर्शविली आहे.

**प्रजनन निर्देशक :**

## तक्ता क्र. 3

### मराठवाड्यातील प्रजनन व बाल आरोग्य निर्देशकांची जिल्हा निहाय स्थिती

### (प्रजनन व बाल आरोग्य प्रकल्प शीघ्र कुटुंब पाहणी 1998-1999 नुसार)

(शेकडा प्रमाण)

| अ. क्र. | जिल्हा / विभाग / राज्य | प्रजनन व बाल आरोग्य निर्देशांक | | | | | | | | | | एकूण प्रजनन दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 18 वर्षा खालील विवाहित मुली | 3 व त्यावरील जन्माचा क्रम | प्रसूति पूर्व पूर्ण वेळ काळजी घेण्यासाठी नोंदणी झालेली प्रकरणे | संस्था मधील प्रसूति | संतती प्रतिबंधात्मक साधनांचा वापर न करणारी एकूण जोडपी | संतती प्रतिबंधात्मक साधनांचा सध्या वापर करणारे | दोन अपत्यामध्ये अंतर ठेवण्यासाठी पद्धतीचा वापर करणारे | पूर्ण लसीकरण मिळणारी मुले | सुरक्षित प्रसूती | ग्रामीण महिलांना भेट देणाऱ्या साहाय्यकारी परिचारिका/ | |
| 1 | औरंगाबाद | 0.90 | 42.20 | 39.70 | 49.60 | 30.50 | 50.00 | 10.40 | 59.20 | 56.9 | 15.8 | 4.62 |
| 2 | जालना | 55.60 | 44.00 | 40.20 | 27.90 | 13.20 | 51.70 | 6.00 | 78.30 | 34.6 | 17.2 | 4.47 |
| 3 | परभणी | 46.60 | 47.00 | 38.00 | 32.30 | 26.30 | 55.70 | 6.40 | 67.20 | 36.6 | 20.4 | 4.54 |
| 4 | हिंगोली | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 5 | बीड | 59.40 | 41.60 | 40.30 | 42.70 | 26.40 | 55.80 | 6.10 | 63.00 | 47.4 | 28.1 | 4.37 |
| 6 | नांदेड | 36.70 | 43.50 | 46.80 | 29.90 | 30.50 | 52.00 | 9.20 | 71.30 | 36.7 | 51.4 | 4.58 |
| 7 | उस्मानाबाद | 46.50 | 35.60 | 47.50 | 36.40 | 10.00 | 58.20 | 4.10 | 79.30 | 42.7 | 18.3 | 3.87 |
| 8 | लातूर | 58.10 | 39.50 | 43.90 | 40.70 | 10.30 | 60.00 | 4.90 | 89.30 | 44.3 | 17.2 | 4.32 |
| 9 | मराठवाडा | 50.54 | 41.91 | 42.34 | 37.07 | 21.03 | 54.77 | 6.73 | 72.51 | 42.7 | 24.1 | 4.40 |
| 10 | महाराष्ट्र | 28.80 | 33.90 | 54.50 | 58.50 | 16.00 | 60.40 | 7.70 | 80.30 | 61.2 | 28.8 | 3.72 |

संदर्भ : मानव विकास अहवाल : महाराष्ट्र (2002) तक्ता क्र. 37, 38 व 101 पान क्र. 186, 187, 257

टिप : 1) हिंगोली जिल्ह्याच्या माहितीचा परभणी जिल्ह्यामध्ये समावेश आहे.

2) मराठवाड्याचे प्रमाण सरासरीने घेतली आहे.

तक्ता क्र. 3 वरून मराठवाड्यातील 18 वर्षांखालील विवाहित मुलींचे सरासरी शेकडा प्रमाण उल्लेखनीयरीत्या 50.54 टक्के असल्याचे आढळते, जे राज्य सरासरीपेक्षा (28.80 टक्के) खूपच अधिक दिसते.

18 वर्षांखाली विवाह होणाऱ्या मुलीच्या प्रजोत्पादन कालावधीत वाढ होऊन जनन दर अधिक राहण्यावर त्याचा परिणाम होतो. या बाबतीत मराठवाड्यातील स्थिती राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत वाईट असल्याचे दिसते. राज्यात हे प्रमाण 'शिक्षणाचा लातूर पॅटर्न' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूर जिल्ह्यात (58.10 टक्के) व सर्वाधिक बीड जिल्ह्यात (59.40 टक्के) आढळते. एवढेच नव्हे तर हे प्रमाण मराठवाड्यात नांदेड जिल्ह्याचा (36.70 टक्के) अपवाद वगळता इतर सर्व जिल्ह्यांमध्ये 45.00 टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे दिसते.

3+ या स्तरात मोडणाऱ्या जन्माचे प्रमाणसुद्धा मराठवाड्यात 41.91 टक्के आढळते. विभागातील जिल्हा निहाय स्थितीचा विचार केल्यास हे प्रमाण प्रत्येक जिल्ह्यात 35 टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे दिसते. मराठवाड्यात संतती प्रतिबंधात्मक साधनांचा वापर न करणाऱ्या एकूण जोडप्यांचे शेकडा प्रमाण 21.03 टक्के आहे, जे राज्य सरासरीपेक्षा (16.00 टक्के) उच्च आढळते. विभागात हे प्रमाण सर्वाधिक औरंगाबाद व नांदेड जिल्ह्यात (प्रत्येकी 30.50 टक्के), तर इतर सर्व जिल्ह्यात 10 टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे दिसते.

संतती प्रतिबंधात्मक साधनांचा वापर करणाऱ्यांचे शेकडा प्रमाण मराठवाड्यात 57.77 टक्के दिसते, जे राज्य सरासरीपेक्षा (60.40 टक्के) कमी दिसून येते. मराठवाड्यात हे प्रमाण सर्वाधिक लातूर जिल्ह्यात (60.00 टक्के) तर सर्वांत कमी औरंगाबाद जिल्ह्यात (50.00 टक्के) आढळते. दोन अपत्यांमध्ये अंतर ठेवण्यासाठी विविध पद्धतींचा वापर करणाऱ्यांचे शेकडा प्रमाण मराठवाड्यात 6.73 टक्के आहे, जे राज्य सरासरीपेक्षा (7.70 टक्के) कमी दिसून येते. विभागात हे प्रमाण सर्वाधिक औरंगाबाद जिल्ह्यात (10.40 टक्के), तर सर्वांत कमी उस्मानाबाद जिल्ह्यात (केवळ 4.10 टक्के) आढळते.

मराठवाड्यातील सुरक्षित प्रसूतीचे सरासरी शेकडा प्रमाण 42.7 टक्के आहे, जे राज्य सरासरीपेक्षा (61.2 टक्के) कमी असल्याचे दिसते. मराठवाड्यात जिल्हा निहाय तुलना केल्यास हे प्रमाण सर्वाधिक औरंगाबाद जिल्ह्यात (56.9 टक्के), तर सर्वांत कमी जालना जिल्ह्यात (34.6 टक्के) आढळते.

मराठवाड्यातील ग्रामीण महिलांना भेट देणाऱ्या साहाय्यकारी परिचारिका/प्रसविका यांचे शेकडा प्रमाण केवळ 24.1 टक्के आहे, जे राज्य सरासरीपेक्षा (28.8 टक्के) कमी दिसते. विभागात हे प्रमाण परभणी (20.4 टक्के), बीड (28.1 टक्के) व नांदेड (51.4 टक्के) जिल्ह्याचा अपवाद वगळता इतर जिल्ह्यांमध्ये विभाग सरासरीपेक्षा (24.1 टक्के) खूप कमी आढळते.

एकूणच मराठवाड्यातील प्रजनन निर्देशकांची स्थिती लक्षात घेता मराठवाडा लोकसांख्यिकीय संक्रमणात खूपच मागासलेला असल्याचे लक्षात येते. शिवाय मानवी विकासासाठी

आवश्यक असणारी लोकसंख्या वृद्धी दरातील उल्लेखनीय घट प्राप्त करण्यास मराठवाड्यास आलेल्या अपयशामध्ये वरील प्रजननविषयक निर्देशकांची वाईट स्थिती कारणीभूत ठरल्याचे लक्षात येते.

**3) शिक्षण :**

लोकसंख्येची गुणवत्ता वाढविणारा महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षण होय. मानवी विकासात लोकसंख्येच्या गुणवत्तेचा विचार होत असल्याने शिक्षण हा मानवी विकासाचा निर्देशक ठरतो. संधीचा विस्तार आणि कौशल्याची वाढ यावर मानव विकास अवलंबून असतो व शिक्षणाचा प्रत्येक टप्पा हा व्यक्तीला अधिकाधिक क्षमतेकडे नेणारा असल्याने मानवी विकासात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची ठरते. शिक्षणामुळे आपल्यासमोर असणाऱ्या अनेक पर्यायांपैकी योग्य पर्यायाची निवड करण्याची क्षमता प्राप्त होते.

लोकांच्या सशक्तीकरणासाठी (Empowerment) शिक्षण क्षेत्रातील गुंतवणूक ही मानवी विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण मानली जाते. त्यामुळे मराठवाड्यातील मानव विकासाच्या स्थितीचा आढावा घेताना मानवी विकासाच्या शिक्षण या निर्देशकाच्या बाबतची मराठवाड्याची स्थिती व प्रगतीचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरते.

**मराठवाड्यातील जिल्हा निहाय साक्षरता प्रमाण व गळतीचे प्रमाण :**

तक्ता क्र. 4 मध्ये मराठवाड्यातील स्त्री पुरूष साक्षरता व एकूण साक्षरता प्रमाणानुसार जिल्ह्यांचा गुणानुक्रम तसेच इयत्ता सातवी व दहावीतील मुले, मुली व एकूण गळतीचे प्रमाण व एकूण गळतीच्या प्रमाणानुसार जिल्ह्यांचा राज्यातील गुणानुक्रम दर्शविला आहे.

तक्ता क्र. 4 नुसार 2001 मध्ये मराठवाड्यातील पुरूष साक्षरता 81.68 असून, ती राज्य सरासरीपेक्षा (86.27) कमी असल्याचे आढळते. जिल्हा निहाय तुलना केल्यास सर्वाधिक पुरूष साक्षरता प्रमाण औरंगाबाद जिल्ह्यात (85.07 टक्के), तर सर्वांत कमी जालना जिल्ह्यात (79.17 टक्के) आढळते. स्त्री–साक्षरतेच्या बाबतीत सर्वाधिक स्त्री–साक्षरता प्रमाण औरंगाबाद (61.28 टक्के) व लातूर जिल्ह्यात (60.28 टक्के), तर सर्वात कमी स्त्री–साक्षरतेचे प्रमाण जालना जिल्ह्यात (49.25 टक्के) दिसून येते. मराठवाड्यातील सरासरी स्त्री–साक्षरता 55.48 टक्के असून ती राज्य सरासरीपेक्षा (67.51 टक्के) खूपच कमी आढळते.

एकूण साक्षरतेबाबत विभागात सर्वाधिक साक्षरता प्रमाण औरंगाबाद जिल्ह्यात (73.63 टक्के) ज्याचा राज्यातील गुणानुक्रम 23 असून विभागात सर्वांत कमी साक्षरता प्रमाण जालना जिल्ह्यात (64.52 टक्के), ज्याचा राज्यातील गुणानुक्रम 33 असल्याचे दिसते. विभागात एकाही जिल्ह्याचे साक्षरता प्रमाण राज्य सरासरीपेक्षा (77.27 टक्के) अधिक असल्याचे दिसत नाही. एकूणच साक्षरतेच्या बाबतीत गुणानुक्रम लक्षात घेता सर्वच जिल्हे पिछाडीवर असलेले दिसतात.

तक्ता क्र. 4 नुसार मराठवाड्यातील इयत्ता सातवी मधील एकूण गळतीचे प्रमाण 44 (प्रति 100) असल्याचे दिसते, जे राज्याच्या सरासरीपेक्षा (31) खूपच अधिक दिसून येते. विशेषत: मुलींच्या बाबतीत गळतीचे प्रमाण उच्च असून विभागात

तक्ता क्र. 4

मराठवाड्यातील जिल्हानिहाय साक्षरता प्रमाण व गळतीचे प्रमाण

| अ. क्र. | जिल्हा/ विभाग/ राज्य | साक्षरता प्रमाण (वय – 7) 2001 | | | | गळतीचे प्रमाण (प्रती – 100) (1998-99) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | इयत्ता 7 वी | | | | इयत्ता 10 वी | | | |
| | | पुरूष | स्त्रिया | एकूण | गुणानुक्रम | मुले | मुली | एकूण | गुणानुक्रम | मुले | मुली | एकूण | गुणानुक्रम |
| 1 | औरंगाबाद | 85.07 | 61.28 | 73.63 | 23 | 35 | 39 | 37 | 22 | 52 | 62 | 57 | 20 |
| 2 | जालना | 79.17 | 49.25 | 64.52 | 33 | 47 | 55 | 51 | 34 | 65 | 80 | 73 | 35 |
| 3 | परभणी | 80.58 | 52.98 | 67.04 | 31 | 43 | 51 | 47 | 31 | 66 | 79 | 72 | 33 |
| 4 | हिंगोली | 81.11 | 51.96 | 66.86 | 32 | | | 47 | 32 | | | 72 | 34 |
| 5 | बीड | 80.69 | 55.38 | 68.48 | 30 | 41 | 50 | 45 | 30 | 56 | 70 | 62 | 25 |
| 6 | नांदेड | 81.14 | 55.12 | 68.52 | 29 | 51 | 54 | 53 | 34 | 64 | 78 | 69 | 32 |
| 7 | उस्मानाबाद | 82.03 | 57.55 | 70.24 | 28 | 37 | 43 | 40 | 25 | 54 | 69 | 62 | 26 |
| 8 | लातूर | 83.63 | 60.28 | 72.34 | 25 | 31 | 39 | 35 | 20 | 54 | 65 | 59 | 21 |
| 9 | मराठवाडा | 81.68 | 55.48 | 68.95 | - | 41 | 47 | 44 | - | 59 | 72 | 66 | - |
| 10 | महाराष्ट्र | 86.27 | 67.51 | 77.27 | - | 34 | 32 | 31 | - | 60 | 56 | 53 | - |

संदर्भ : मानव विकास अहवाल : महाराष्ट्र (2002) तक्ता क्र. 108 व 112 पान क्र. 265, 269

टिप : 1) मराठवाडा विभागाचे प्रमाण सरासरीने घेतले आहे.

सर्वाधिक मुलींचे गळतीचे प्रमाण जालना जिल्ह्यात (55) आढळते. एकूण गळतीच्या प्रमाणानुसार विभागातील जिल्ह्यांचा राज्यातील गुणानुक्रम लक्षात घेता लातूर जिल्ह्याचा अपवाद वगळता इतर सर्व जिल्ह्यांमध्ये गळतीचे प्रमाण असमाधानकारक दिसते.

इयत्ता दहावीतील गळतीच्या प्रमाणाबाबतीत मराठवाड्यातील औरंगाबाद (20) व लातूर जिल्ह्याचा (21) अपवाद वगळता, इतर जिल्ह्यातील स्थिती असमाधानकारक असल्याचे लक्षात येते. विशेषत: मुलींच्या बाबतीत गळतीचे प्रमाण सर्वाधिक जालना जिल्ह्यात (80 प्रति 100) आढळते, जे राज्यात सर्वोच्च असल्याचे आढळते. औरंगाबाद व लातूर जिल्ह्याचा अपवाद वगळता इतर सर्व जिल्ह्याचे दहावीतील प्रमाणाबाबत राज्यात 24 नंतरचे गुणानुक्रम असल्याचे दिसतात, जी बाब मराठवाड्यातील मानवी विकासाच्या दृष्टीने चिंतेची ठरते.

**डॉ. वसंत पेठे** (2003) यांच्या मते, लोकसंख्येची सुप्त गुणवत्ता जेवढ्या वेगाने वाढवली जाईल तितक्या वेगाने देशातील बहुव्यापी गरिबी दूर होऊ शकते. त्यांच्या मते, सुप्त गुणवत्तेच्या इष्टतमीकरणात येणारी प्रमुख अडचण म्हणजे सर्वांसाठी समान संधीचा अभाव होय. समान संधीचा अभाव असण्याची प्रमुख दोन कारणे आहेत. 1) समाजात मोठ्या प्रमाणावर असलेली आर्थिक विषमता 2) शैक्षणिक सुविधांचा स्थानिक अभाव (विशेषत: ग्रामीण भागातून) होय. ही परिस्थिती मराठवाड्यातही बऱ्याच अंशी दिसून येते. विशेषत: ग्रामीण भागापर्यंत शैक्षणिक सुविधांचा अजूनही पूर्णत: प्रसार व विस्तार झाल्याचा दिसत नाही. त्यामुळेच मराठवाड्यातील जिल्ह्यांचा साक्षरता साध्य व प्रगती निर्देशांक कमी दिसतो.

**4) आर्थिक वृद्धी :**

मानवी विकासासाठी आर्थिक वृद्धी आवश्यक आहे; परंतु मानवी प्रगती आणि आर्थिक वृद्धी यामध्ये कुठलाही स्वयंचलित संबंध असल्याचा दिसत नाही. मानवी विकासाचा आवश्यक घटक असणारी उत्पादकता ही उत्पन्न निर्मितीच्या प्रक्रियेतील लोकांच्या पूर्ण सहभागावर प्रकाश टाकत असते. त्याच वेळी जात किंवा लिंग याबाबतीत कुठल्याही भिन्नतेशिवाय समान संधीचा उपयोग करून घेण्याच्या सवलतीवर न्याय (Equity) प्रकाश टाकतो, तर सशक्तीकरण हा मानवी विकासाचा आवश्यक घटक विकास हा केवळ लोकांसाठी नसून, तो लोकांद्वारे घडून आला पाहिजे यावर भर देते. या प्रक्रियेत लोकांनी निर्णय प्रक्रियेत पूर्णतः सहभाग नोंदवला पाहिजे, की ज्यामुळे लोकांच्या जीवनास आकार प्राप्त होतो. त्यामुळे असेही सांगण्यात येते, की आर्थिक वृद्धी हे साधन (Means) आहे; तर मानवी विकास हे साध्य आहे.

आर्थिक वृद्धी ही मानवी जीवनाच्या गुणवत्तेवर भर देण्यापेक्षा GNP च्या विस्ताराशी संबंधित असल्याचे दिसते. तर मानवी विकास हा वस्तूचे उत्पादन व विभाजन आणि मानवी सामर्थ्यांचा विस्तार व उपयोग यांना एकत्रित आणतो. थोडक्यात, मानवी विकास हा मानवास उत्पादन प्रक्रियेतील आदान (Input) म्हणून

वागणूक देतो. म्हणजेच साध्यापेक्षा साधन म्हणून मानवाला दिलेली वागणूक ही मानवी विकासाला महत्त्वाची ठरते.

**मराठवाड्यातील आर्थिक वृद्धी :**

उच्च उत्पन्न असणाऱ्या प्रमुख राज्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक वरचा लागतो. मात्र मानवी विकास निर्देशांकाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा क्रमांक खाली घसरलेला दिसतो. याचा अर्थ उच्च दरडोई उत्पन्नामुळे उच्च मानव विकास घडून येतोच असे नाही. म्हणजेच आर्थिक वृद्धी हे साध्य नसून मानवी विकास साधण्याचे एक साधन म्हणून विचारात घेतले जाते.

तक्ता क्र. 5 मध्ये मराठवाड्यातील आर्थिक वृद्धीचे चित्र दृष्टिक्षेपात आणणाऱ्या जिल्हा उत्पन्नाचा चालू व स्थिर किंमतीनुसार राज्य उत्पन्नातील वाटा (टक्केवारीत) दर्शविला आहे.

तक्ता क्र. 5 मध्ये चालू किंमतीनुसार

**तक्ता क्र. 5**

**मराठवाड्यातील जिल्हा उत्पन्नाचा राज्य उत्पन्नातील वाटा (टक्केवारीत)**

**चालू व स्थिर किंमतीनुसार**

| अ. क्र. | जिल्हा/ विभाग/ राज्य | चालू किंमतीनुसार | | | | चालू किंमतीनुसार (1993-1994) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1993-1994 | 1995-1996 | 1997-1998 | 1998-1999 | 1993-1994 | 1995-1996 | 1997-1998 | 1998-1999 |
| 1 | औरंगाबाद | 2.47 | 2.55 | 2.29 | 2.40 | 2.47 | 2.57 | 2.30 | 2.36 |
| 2 | जालना | 1.00 | 0.87 | 0.92 | 0.82 | 0.92 | 0.85 | 0.80 | 0.89 |
| 3 | परभणी | 1.76 | 1.70 | 1.49 | 1.62 | 1.76 | 1.63 | 1.46 | 1.57 |
| 4 | हिंगोली | - | - | - | -- | - | - | - | - |
| 5 | बीड | 1.41 | 1.55 | 1.42 | 1.55 | 1.41 | 1.42 | 1.27 | 1.40 |
| 6 | नांदेड | 1.75 | 1.67 | 1.70 | 1.70 | 1.75 | 1.64 | 1.61 | 1.65 |
| 7 | उस्मानाबाद | 0.93 | 0.87 | 0.81 | 0.92 | 0.93 | 0.85 | 0.81 | 0.92 |
| 8 | लातूर | 1.27 | 1.27 | 1.15 | 1.28 | 1.27 | 1.25 | 1.13 | 1.23 |
| 9 | मराठवाडा | 10.59 | 10.48 | 9.78 | 10.29 | 10.51 | 10.21 | 9.38 | 10.02 |
| 10 | महाराष्ट्र | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 |

संदर्भ : मानव विकास अहवाल : महाराष्ट्र (2002) तक्ता क्र. 16, पान क्र. 160

टिप : 1) हिंगोली जिल्ह्याच्या आकडेवारीचा परभणी जिल्ह्याच्या आकडेवारीमध्ये समावेश आहे.

विभागाचा राज्य उत्पन्नातील वाटा 1993-1994, 1995-1996 व 1997-1998 या वर्षाच्या टक्केवारीवर प्रकाश टाकल्यास तो सातत्याने घटत असल्याचे दिसते. यावरून मराठवाड्याचे आर्थिक मागासलेपण लक्षात येते. केवळ 1997- 1998 च्या तुलनेत (9.98 टक्के) हा वाटा 1998-1999 मध्ये (10.29 टक्के) वाढल्याचा दिसतो. जिल्हानिहाय स्थितीचा विचार केल्यास आर्थिक वृद्धीमध्ये खूपच असमतोल दिसून येतो. चालू किंमतीनुसार मराठवाड्यात राज्य उत्पन्नातील वाटा हा 1993-1994, 1995-1996, 1997-1998 व 1998-1999 या सर्वच वर्षासाठी औरंगाबाद जिल्ह्याचा (अनुक्रमे 2.47 टक्के, 2.55 टक्के, 2.29 टक्के व 2.40 टक्के) सर्वोच्च आढळतो.

मराठवाड्याची राजधानी मानल्या जाणाऱ्या औरंगाबाद जिल्ह्यात औद्योगिकीकरणाचा झालेला विस्तार व नागरीकरणाची पातळी याचा परिणाम म्हणून या जिल्ह्याच्या उत्पन्नाचा राज्य उत्पन्नातील वाटा सर्वाधिक दिसून येतो. इतर जिल्ह्यांच्या बाबतीत परिस्थिती खूपच चिंताजनक असल्याचे लक्षात येते. विभागातील उस्मानाबाद जिल्ह्याचा वाटा 1993-1994, 1995-1996 व 1997-1998 या वर्षांकरिता सर्वांत कमी (अनुक्रमे 0.93 टक्के, 0.87 टक्के व 0.81 टक्के) असल्याचे दिसते. यावरून मराठवाड्यात उस्मानाबाद जिल्हा आर्थिक वृद्धीच्या दृष्टीने सर्वाधिक मागास असल्याचे दिसून येते.

स्थिर किंमतीनुसार विभागातील सरासरी उत्पन्नाचा राज्य उत्पन्नातील वाटा हा चालू किंमतीप्रमाणेच असमाधानकारक असल्याचे दिसते; जो 1993-1994,1995-1996, 1997-1998 या वर्षांसाठी सातत्याने कमी होत असल्याचे (अनुक्रमे 10.51 टक्के, 10.21 टक्के व 9.38 टक्के) दिसते. केवळ 1998-99 या वर्षाकरिता राज्य उत्पन्नातील वाटा 1997-98 च्या तुलनेत काहीसा (10.2 टक्क्यांपर्यंत) वाढल्याचा दिसतो. मात्र हा वाटा एकूण कालावधीचा विचार करता कमी दिसतो.

स्थिर किंमतीनुसार जिल्हा उत्पनाचा राज्य उत्पन्नातील विभागातील औरंगाबाद जिल्ह्याचा वाटा सर्वाधिक (सर्वच वर्षांकरिता) दिसून येतो; मात्र मराठवाड्यातील उस्मानाबाद, जालना या जिल्ह्यांचा वाटा अगदीच कमी असल्याचे दिसते.

एकूणच चालू व स्थिर किंमतीनुसार मराठवाड्यातील जिल्हा उत्पन्नाचा राज्य उत्पन्नातील वाटा सर्वच जिल्ह्यांकरिता (केवळ बीड व लातूरचा अपवाद वगळता) 1993-1994 च्या तुलनेत 1998-1999 मध्ये कमी झाल्याचे दिसते. यावरून मराठवाड्यात अजूनही आर्थिक वृद्धीला अनुकूल वातावरण निर्माण झालेले दिसत नाही. विशेषत: जिल्हा निहाय असमतोल खूपच चिंतेचा आहे. मराठवाड्यातील मानवी विकास साध्य करण्यासाठी आर्थिक वृद्धी या साधनाची प्रगती देखली समाधानकारक असणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून औरंगाबाद जिल्ह्याचा अपवाद वगळता नियोजनकर्ते व धोरणकर्त्यांनी मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज लक्षात येते.

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय मानव विकास**

**निर्देशांक :**

देशातील सर्वांत पुरोगामी आणि कुशल प्रशासन असलेले राज्य अशी महाराष्ट्राची ओळख आहे. महाराष्ट्राने राज्य निर्मितीपासून वेगवेगळ्या क्षेत्रांत केलेली प्रगती व राज्यातील लोकांच्या कल्याणाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे महाराष्ट्राचा 2002 मधील मानव विकास अहवाल होय.

महाराष्ट्र राज्याचा हा पहिला मानव विकास अहवाल म्हणजे एक प्रकारे राज्यातील लोकांच्या दृष्टीने विकास प्रक्रियेचा आराखडा होय. महाराष्ट्र शासनाने संयुक्त राष्ट्र विकास प्रकल्पाच्या (यू.एन.डी.पी.) 2000 या वर्षासाठीची मार्गदर्शक तत्त्वे आणि निकषांचा आधार घेऊन राज्याच्या परिस्थितीनुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांचे मानव विकास निर्देशांक तयार केले आहेत. मराठवाड्यातील जिल्हा निहाय मानव विकास निर्देशांकाचे मूल्य आणि राज्यातील गुणानुक्रम तक्ता क्र. 6 मध्ये दर्शविला आहे.

तक्ता क्र. 6 नुसार मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांकाचे सरासरी मूल्य 0.42 असल्याचे दिसते, जे राज्य सरासरीपेक्षा (0.58) खूपच कमी आढळते. मराठवाड्यातील आरोग्य, शिक्षण, आर्थिक वृद्धी व लोकसंख्या या क्षेत्रातील

**तक्ता क्र. 6**

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक व दरडोई जिल्हा उत्पन्न**

| अ. क्र. | जिल्हा/ विभाग/ राज्य | HDI मूल्य (2000) | HDI क्रम | जिल्हा दरडोई उत्पन्न (1993-1994) चालू बाजार किंमती प्रमाणे | जिल्हा दरडोई उत्पन्न क्रम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | औरंगाबाद | 0.57 | 12 | 19,365 | 11 |
| 2 | जालना | 0.27 | 33 | 12,047 | 33 |
| 3 | परभणी | 0.43 | 24 | 13,827 | 26 |
| 4 | हिंगोली | 0.43 | 25 | 13,827 | 27 |
| 5 | बीड | 0.47 | 18 | 15,303 | 21 |
| 6 | नांदेड | 0.37 | 29 | 13,068 | 31 |
| 7 | उस्मानाबाद | 0.38 | 28 | 12,905 | 32 |
| 8 | लातूर | 0.47 | 19 | 13,677 | 29 |
| 9 | मराठवाडा | 0.42 | - | 14,252 | - |
| 10 | महाराष्ट्र | 0.58 | - | 22,763 | - |

संदर्भ : मानव विकास अहवाल : महाराष्ट्र (2002) तक्ता क्र. 8.2, पान क्र. 117

टिप : 1) मराठवाड्याचे HDI मूल्य व दरडोई उत्पन्न सरासरीने काढलेले आहे.

अपयशामुळे मराठवाड्याचे मानव विकास निर्देशांक मूल्य खूपच कमी असल्याचे दिसते. जिल्हा निहाय मानव विकास निर्देशांकांची तुलना केल्यास, मराठवाड्यातील एकाही जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक हा राज्य सरासरीपेक्षा (0.58) अधिक असल्याचे दिसत नाही. केवळ औरंगाबाद जिल्हा (0.57) राज्य सरासरीच्या जवळपास असल्याचे दिसते. औरंगाबाद जिल्ह्याचा राज्यातील गुणानुक्रम त्यामुळे 12 आहे. इतर सर्व जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकाचे मूल्य कमी असल्याचे दिसते. सर्वात कमी मूल्य जालना जिल्ह्याचे (0.27) दिसते. त्यामुळे जालन्याचा राज्यातील गुणानुक्रम शेवटच्या तीन जिल्ह्यांमध्ये म्हणजेच 33 असल्याचे दिसते.

मराठवाड्यातील नांदेड (0.37), उस्मानाबाद (0.38), हिंगोली (0.43), परभणी (0.43), लातूर (0.47), बीड (0.47) जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांकानुसार या जिल्ह्यांचा राज्यात अनुक्रमे 29, 28, 25, 24, 19 व 18 या गुणानुक्रम असल्याचे लक्षात येते.

यावरून मानवी विकासाच्या दृष्टिकोनातून मराठवाड्यातील सर्वच जिल्हे मागासलेले आहेत असा निष्कर्ष काढता येते.

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय आर्थिक वृद्धी व मानवी विकासाची तुलना :**

तक्ता क्र. 6 मध्ये मराठवाड्यातील जिल्हा निहाय दरडोई उत्पन्न व त्यानुसार राज्यातील क्रम दर्शविलेला आहे. चालू किमतीनुसार विभागातील सरासरी दरडोई उत्पन्न 14,252 रू. असल्याचे दिसते, जे राज्य सरासरीपेक्षा (22,763 रू.) खूप कमी दिसून येते. जिल्हा निहाय दरडोई उत्पन्नाची तुलना केल्यास मराठवाड्यातील एकाही जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न राज्य सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा (22,763 रू.) अधिक दिसून येत नाही. विभागात सर्वाधिक दरडोई उत्पन्न औरंगाबाद जिल्ह्याचे (19,365 रू.) असून या जिल्ह्याचा राज्यातील क्रम 11 असल्याचा दिसतो. मराठवाड्यातील सर्वात कमी दरडोई उत्पन्न जालना जिल्ह्याचे असून (12,047 रू.) जिल्ह्याचा राज्यातील क्रम 33 असल्याचा दिसतो. इतर सर्व जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नाच्या असमाधानकारक स्थितीमुळे मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्याचा अपवाद वगळता सर्व जिल्ह्याचा राज्यातील क्र. 20 नंतरचा असल्याचे आढळते.

दरडोई उत्पन्न व मानवी विकास याची तुलना केल्यास विभागातील जो जिल्हा दरडोई उत्पन्नाच्या दृष्टीने सर्वाधिक मागासलेला आहे, तोच जिल्हा मानवी विकासाच्या दृष्टीनेही सर्वाधिक मागासलेला असल्याचे दिसते. मराठवाड्यातील असा जिल्हा म्हणजे जालना जिल्हा होय. जालना जिल्ह्याच्या या मागासलेपणामुळे दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांक या दोन्हीनुसार जिल्ह्याचा राज्यात 33 वा क्रम असल्याचे दिसते.

औरंगाबाद जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न विभागात सर्वाधिक असून मानवी विकास निर्देशांकाचे मूल्यसुद्धा याच जिल्ह्याचे सर्वाधिक असल्याचे दिसते. औरंगाबादचा दरडोई उत्पन्नाच्या दृष्टीने राज्यात 11 वा, तर मानवी विकास निर्देशांकानुसार 12 वा क्रम लागतो.

मराठवाड्यातील लातूर हा असा जिल्हा

आहे, ज्याची दरडोई उत्पन्नातील कामगिरी फारशी समाधानकारक नसतानादेखील (राज्यातील क्रम 29 वा) या जिल्ह्याची मानवी विकासातील कामगिरी उल्लेखनीय (राज्यातील क्रम 19 वा) असल्याचे दिसते.

एकूणच मराठवाड्यातील औरंगाबाद हा एकमेव जिल्हा आहे, की ज्या जिल्ह्याच्या बाबतीत मानवी विकासाच्या तुलनेत दरडोई उत्पन्नाची स्थिती उच्च आढळते. तर जालना हा एकमेव जिल्हा आहे, की ज्या जिल्ह्यातील मानवी विकास व दरडोई उत्पन्नाची स्थिती सारखीच असल्याचे दिसते. या व्यतिरिक्त इतर सर्व जिल्ह्यातील मानवी विकासाची स्थिती ही दरडोई उत्पन्न स्थितीपेक्षा उच्च आढळते. यावरून केवळ दरडोई उत्पन्नाच्या आधारावर मानवी विकास साधता येत नाही, असा संमिश्र स्वरूपाचा निष्कर्ष काढता येईल.

**मराठवाड्यातील जिल्ह्यांचे मानव विकासाचे आढावा पत्रक (निष्कर्ष रूपात) :**

तक्ता क्र. 7 मध्ये मराठवाड्यातील जिल्ह्यांचे मानव विकासाचे आढावा पत्रक निष्कर्ष रूपात तयार केले आहे. या आढावा पत्रकावरून मराठवाड्यातील अनेक क्षेत्रांतील प्रगती जरी समाधानकारक असली, तरी जवळपास सर्वच क्षेत्रांतील अधोगती हीच मराठवाड्यातील जिल्ह्याच्या अल्प मानव विकास निर्देशांकास कारणीभूत ठरल्याचे दिसते.

ज्या क्षेत्रात मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये अधोगती दिसून येते, त्या क्षेत्रात भविष्यात भरीव स्वरूपाचे कार्य करण्याची गरज लक्षात येते. तरच भविष्यात मराठवाड्यातील जिल्ह्यांना मानवी विकासाच्या पातळीत राज्यात वरचा क्रम प्राप्त करता येऊ शकेल.

मराठवाड्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमधून लोकसंख्येची सुप्त गुणवत्ता अजूनही पूर्णत: विकसित झाल्याची दिसत नाही. मानवी भांडवलाच्या उभारणीतील लोकसंख्येच्या गुणवत्तेचे महत्त्व लक्षात घेता, मराठवाड्यातील लोकसंख्येची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने अजूनही आरोग्य, शिक्षण या क्षेत्रांत भरीव स्वरूपाच्या कामगिरीची अपेक्षा प्रतिपादित करता येईल. विशेषत: मराठवाड्यातील लोकसांख्यिकीय संक्रमण हे राज्यातील सर्व विभागांच्या तुलनेत खूपच धीमे (संथ) असल्याचे दिसून येते, जे अनेक प्रश्नांचे मूळ असल्याचे तज्ज्ञांद्वारे सांगितले जाते. जोपर्यंत मराठवाड्यातील लोकसांख्यिकीय संक्रमणाचा वेग वाढणार नाही, तोपर्यंत मराठवाड्यास सर्वच क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करता येईल असे म्हणण्यात शंका आहे. एकूणच मराठवाड्यातील मानवी विकासाच्या पातळीत सुधारणा घडवून अणण्याच्या दृष्टीने लोकसंख्येबरोबरच शिक्षण, आरोग्य, अर्थव्यवस्था इत्यादी क्षेत्रांत प्रगती घडून येणे व घडवून आणणे क्रमप्राप्त ठरते. यापुढे जाऊन शासनाने मराठवाडा, महाराष्ट्र व देश पातळीवर मानवी विकासाच्या बाबतीत असे कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे की ज्यामुळे आर्थिक वाढ ही मानवी विकासातील वाढीशी जुळली पाहिजे की ज्यामुळे मानवी विकासाची फळे उच्च उत्पादकतेसह प्राप्त होऊ शकतील. 1996 च्या मानवी विकास अहवालाने सूचित केल्यानुसार भारताने पर्यायाने महाराष्ट्र व

तक्ता क्र. ७

मराठवाड्यातील जिल्ह्यांचे-मानव विकासाचे आढावा पत्रक

| अ.क्र. | चल | प्रगती | अधोगती |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | कृषी | मराठवाड्यातील बीड जिल्ह्याच्या उत्पन्नातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा 1993-94 मध्ये 43.27 टक्के होता, जो 1998-99 मध्ये 44.17 टक्क्यांपर्यंत वाढल्याचे दिसते. | मराठवाड्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये बीडचा अपवाद वगळता जिल्हा उत्पन्नातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा कमी होत असल्याचे दिसते. |
| 2 | उद्योग | मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांमधून जिल्हा उत्पन्नातील द्वितीय क्षेत्राचा वाटा सातत्याने वाढताना दिसतो. 1993-94 मध्ये मराठवाड्याच्या एकूण उत्पन्नात द्वितीय क्षेत्राचा सरासरी वाटा 17.98 टक्के होता, जो 1998-99 मध्ये 18.03 टक्के झाल्याचे दिसते. | मराठवाड्याचे औद्योगिक केंद्र मानल्या जाणाऱ्या औरंगाबाद जिल्ह्याचा जिल्हा उत्पन्नातील द्वितीय क्षेत्राचा वाटा 1993-94 मध्ये 40.45 टक्के होता. जो 1998-99 मध्ये उल्लेखनीयरीत्या 36.84 टक्क्यांपर्यंत कमी झाल्याचा दिसतो. यावरून आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्र प्रभावित होऊन या क्षेत्रातील उत्पन्न वृद्धी एक प्रकारे मंदावलेली दिसते. |
| 3 | दारिद्र्य | मराठवाड्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची टक्केवारी 1997-98 च्या माहितीनुसार कमी होऊन 27.21 टक्क्यांपर्यंत आल्याची दिसते, जी राज्य सरासरीपेक्षाही (34.55 टक्के) कमी असल्याचे दिसते. | मराठवाड्यातील जिल्ह्यांना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या काही प्रमाणात कमी करण्यात यश आले तरी दुसऱ्या बाजूने विभागात बेकारीचे प्रमाण सातत्याने वाढताना दिसते. एप्रिल 2004 च्या माहितीनुसार मराठवाड्यातील नोंदणीकृत बेकारांची संख्या ही 5 लाख 83,484 एवढी आहे. वास्तविक आकडा यापेक्षाही मोठा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. |

| अ.क्र. | चल | प्रगती | अधोगती |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 4 | अर्थ–व्यवस्था | मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न विभागात सर्वाधिक असून राज्यात यानुसार जिल्ह्याचा 11 वा क्रम लागतो. | औरंगाबाद जिल्ह्याचा अपवाद वगळता इतर सर्व जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न अल्प असून त्यांचा राज्यातील क्रम हा 20 नंतर असल्याचे आढळले. |
| 5 | लोक–संख्या | मराठवाड्यातील लोकसंख्येचा दशवर्षीय वृद्धिदर जो 1971-81 या दशकात 24.16 टक्के होता, तो 1991 ते 2001 या दशकात कमी होऊन 18.23 टक्क्यांपर्यंत आल्याचे दिसते. | मानवी विकास निर्देशांकाच्या बाबतीत मराठवाड्यातील जिल्ह्याची गणना मागास जिल्ह्यांमध्ये होते. विभागाच्या मानवी विकास निर्देशांकाचे सरसरी मूल्य केवळ (0.42) असल्याचे दिसते, जे राज्य सरासरी पेक्षा (0.58) खूपच कमी आहे. 18 वर्षाखालील मुलींच्या विवाहाचे प्रमाण मराठवाड्यात सर्वाधिक (50.54 टक्के) आढळते.3+ या स्तरात मोडणाऱ्या जन्मांचे प्रमाणदेखील (41.91 टक्के) उच्च आढळते. अजूनही मराठवाड्यात 21.03 टक्के जोडपी ही संतती प्रतिबंधात्मक साधनांचा वापर न करणारी आहेत. राज्यात सर्वाधिक एकूण प्रजनन दर मराठवाड्यात आढळतो. औरंगाबाद जिल्ह्याचा (4.62) एकूण प्रजनन दर राज्यात सर्वोच्च दिसून येतो. |
| 6 | शिक्षण | मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्याचे साक्षरता प्रमाण विभागात (73.63 टक्के) सर्वाधिक आहे, तर स्त्री– साक्षरतेच्या बाबतीत देखील औरंगाबाद (61.28 टक्के) | मराठवाड्यातील एकाही जिल्ह्यातील स्त्री–साक्षरता, पुरुष–साक्षरता व एकूण साक्षरतेचे प्रमाण 2001 च्या |

| अ.क्र. | चल | प्रगती | अधोगती |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | व लातूर (60.28 टक्के) जिल्ह्यातील प्रगती समाधानकारक आहे. | जनगणनेनुसार राज्य सरासरीपेक्षा अधिक असल्याचे दिसत नाही. त्यामुळे साक्षरतेनुसार मराठवाड्यातील जिल्ह्यांचा राज्यातील क्रम हा 22 नंतर असल्याचा आढळतो. 2001 च्या जनगणनेनुसार मराठवाड्यात अजूनही 31.05 टक्के लोक निरक्षर असल्याचे दिसते. शिवाय मराठवाड्यात सातवी व दहावीतील मुलींचे गळतीचे प्रमाण उच्च आढळते. |
| 7 | आरोग्य | मराठवाड्यात 1991 मध्ये राज्यातील एकूण प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी 18.84 टक्के प्राथमिक केंद्रे होती, ज्यामध्ये 2000 मध्ये वाढ होऊन ही टक्केवारी 19.02 टक्क्यांपर्यंत पोचल्याचे दिसते. | प्रति प्राथमिक आरोग्य केंद्रामागील लोकसंख्या 2000 च्या माहितीनुसार राज्यात मराठवाड्या मध्ये सर्वाधिक असल्याचे दिसते. विशेषत: विभागातील औरंगाबाद जिल्याची प्रति प्राथमिक आरोग्य केंद्रामागे असणारी लोकसंख्या (46,228 एवढी) ही राज्यात सर्वोच्च असल्याचे दिसते, तर दुसऱ्या बाजूने प्रति लाख लोकसंख्येमागे आरोग्य केंद्राची संख्यासुद्धा राज्यात मराठवाडा विभागात सर्वात कमी आढळते. राज्यात ही संख्या सर्वात कमी असणारे तिनही जिल्हे औरंगाबाद,जालना व लातूर मराठवाड्यातील (प्रति लाख लोकसंख्येमागे केवळ 2.2 प्राथमिक आरोग्य केंद्रे) असल्याचे दिसते. |

| अ.क्र. | चल | प्रगती | अधोगती |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 8 | बालक | 1991 च्या माहितीनुसार मराठवाड्यातील सरासरी एकूण बालक मृत्युदर (पाच वर्षाखालील) हा 86 (प्रति 1000) असून, तो राज्य सरासरीपेक्षा (91) कमी आढळतो. | राज्यात सरासरी एकूण बालक मृत्युदरापेक्षा (91) उच्च बालक मृत्यूदर आढळणारे जालना (94), परभणी (95), उस्मानाबाद (96) हे तीन जिल्हे मराठवाड्यातील दिसून येतात. विशेषत: उस्मानाबाद जिल्ह्यातील स्त्री-बालक मृत्यूदर (97), तर परभणी जिल्ह्यातील पुरूष-बालक मृत्यूदर (97) विभागात सर्वोच्च असल्याचे दिसते. |
| 9 | महिला | मानव विकास अहवाल 2002 च्या माहितीनुसार केंद्र, राज्य, स्थानिक संस्था, केंद्रीय निमशासकीय व राज्य निम शासकीय संस्थांमधून रोजगार प्राप्तीमध्ये मराठवाड्यातील स्त्रियांचे प्रमाण वाढताना दिसते. | मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तर म्हणजे दर 1000 पुरूषांमागील महिलांची संख्या सातत्याने, कमी होत असून 2001 च्या जनगणनेनुसार ती 937 असल्याचे दिसते. मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील दर 1000 पुरूषांमागे स्त्रियांची संख्या 919 ही राज्य सरासरीपेक्षा (922) कमी आढळते. |
| 10 | जिल्हा निहाय विषमता | आर्थिक वृद्धीच्या दृष्टीने औरंगाबाद, नांदेड हे जिल्हे आघाडीवर असल्याचे दिसते. | आर्थिक वृद्धी व लोकसांख्यिकीय संक्रमणाच्या दृष्टीने जालना, उस्मानाबाद, परभणी हे जिल्हे मागासलेले दिसतात. एकूणच सर्वच क्षेत्रांबाबत विभागात जिल्हा निहाय विषमता आढळते. |

मराठवाड्याने देखील विकासाचे असे प्रारूप स्वीकारणे क्रमप्राप्त ठरते की, जे न्याय वृद्धी (Equitable Growth), रोजगार उत्पन्न करणारी वृद्धी (Employment Generating Growth) व सहभागात्मक वृद्धी (Participatory Growth) यावर अधिक भर देते.

शेवटी 2007-08 च्या जागतिक मानवी विकास अहवालाने व्यक्त केलेल्या पर्यावरणीय बदलांच्या धोक्यांची भिती लक्षात घेता व बाकी **मुन** (2008) यांनी जागतिक पर्यावरण विषयक समस्येबाबत अपेक्षा केलेल्या सामुदायिक प्रयत्नांचा (Collective Responses) विचार करता मानवी विकासा बरोबरच सर्वसमावेशक व निरंतर विकासासाठी देखील सर्व पातळ्यांवर सामुदायिक प्रयत्न हेच आधार ठरतात.

**संदर्भ :**


1) 'ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट: 1990', यु. एन. डी. पी., ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, (1990)

2) 'ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट : 1996', यु. एन. डी. पी., ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, (1996)

3) क्लिंटन डब्ल्यू. जे. 'द हिंदू', डेली, 25 मार्च 2000 पान क्र.1.

4) 'मानव विकास अहवाल : महाराष्ट्र', महाराष्ट्र शासन, मुंबई, (2002).

5) 'द ह्युमन डेव्हलपमेंट पॅराडिया', महबूब-उल-हक, इन- 'रिडिंग्ज इन ह्युमन डेव्हलपमेंट', एडिटेड बाय, साकिको फुदा-पार अॅड ए.के. शिवकुमार, पेपर बॅक एडिशन, ओ. यू. पी. दिल्ली (2004)

6) 'अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट वीथ ए ह्युमन फेस : एक्सपेरियन्सेस अँड प्रॉस्पेक्टस्', राव व्ही. एम., इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली, व्हॉल्युम - 30, नं. 6, (जून 1996)

7) 'ह्युमन डेव्हलपमेंट : कन्सेप्टस् अँड मेजर्स्', प्रिपेअरड बाय. एस. के. मोहंती, लेक्चर नोट्स फॉर यू. जी. सी. रिफ्रेशर कोर्स ऑन पॉप्युलेशन स्टडीज/डेमॉग्राफी, 6 एप्रिल-26 एप्रिल, आय. आय. पी. एम., मुंबई (2002).

8) 'ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट : 2005', यू. एन. डी. पी. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, (2005)

9) 'स्टेट ऑफ ह्युमन डेव्हलपमेंट इन-स्टेट्स अँड डिस्ट्रिक्टस् ऑफ इंडिया', बाय एफ. राम. अँड एस. के. मोहंती, आय. आय. पी. एस. मुंबई, (2005)

10) 'डेव्हलपमेंट अॅज कॅपॅबिलिटी एक्सपॅन्शन', अमर्त्य सेन, इन-'रिडिंग्ज इन ह्युमन डेव्हलपमेंट', एडिटर्स-साकिको फुदा-पार अँड ए.के. शिवकुमार, पेपर बॅक एडिशन, ओ.यू.पी.दिली. (2004)

11) प्रो. अमर्त्य सेन-नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थशास्त्र : धवल कामगिरीची यशोगाथा, 'हिंदू' च्या सौजन्याने-'रॉयल स्विडीश अकादमी ऑफ सायन्स' लेखातील उतारे, योजना, मुंबई (जाने. 1999)

12) 'टेकिंग स्टॉक ऑफ विमेन्स प्रोग्रेस', बाय-

लॉरी अशफर्ड, इन-'ब्रीज', पॉप्युलेशन रेफ्रन्स ब्यूरो, वॉशिंग्टन, यू.एस.ए., (मे, 2005)

13) 'लोकसंख्या, गरिबी आणि मानवी गुणवत्तेचे इष्टतमीकरण : नव्या युगासाठी नवीन प्रतिमान' (उत्तरार्ध), डॉ. वसंत पेठे, अर्थसंवाद, खंड-27, अंक-1 (एप्रिल-जून 2003)

14) 'ह्युमन डेव्हलपमेंट अॅण्ड जन्डर', विभुती पटेल, सोशल अॅक्शन, ए क्वॉरटर्ली रिव्हयू ऑफ सोशल ट्रेडस्, ऑक्टोबर-डिसेंबर 2008, व्हॉल्युम 58, नं. 4

15) 'प्रोग्रेस ऑफ हयुमन डेव्हलपमेंट इन इंडिया', टी.कोट्टी रेड्डी, जर्नल ऑफ सोशल सायन्सेस, व्हॉल्युम 18, नं. 1 (जानेवारी 2009)

16) 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन' : मराठवाड्यातील सर्व जिल्हे (2000 ते 2007)

17) 'ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट : 2007-08', यू. एन. डी. पी., ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, (2008)


# मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

अर्थसंवाद

## जाहिरातीचे दर

| | | कृष्णधवल (B/W) | रंगीत |
|---|---|---|---|
| १) | समोरचे आतील पृष्ठ | रू.४,०००/- | रू.११,०००/- |
| २) | मागील पृष्ठ (आतील) | रू.४,०००/- | रू.११,०००/- |
| ३) | मागील शेवटचे पृष्ठ | रू.५,०००/- | रू.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर - डिझाईन - (1/5 = 150 X 210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नांवे काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच तो अंक आपल्याला मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद, कळावे.

आपले विश्वासू

**अनिल बाबुराव सूर्यवंशी**
कार्यवाह-खजिनदार
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर, बार्शी-४१३४११ जि.सोलापूर
फोन:(०२१८४)२२४२९४
भ्रमणध्वनी:९०११३३९९०६

# जागतिक घसरण व आर्थिक मंदीची सैद्धांतिक मीमांसा

**एम. एन. शिंदे**
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,
उरुण-इस्लामपूर, जि. सांगली
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद
मोबाईल : 9890114896

**डी. के. मोरे**
आर्टस्, कॉमर्स कॉलेज, आष्टा,
ता. वाळवा, जि. सांगली

**सैद्धांतिक बाजू :**

घसरण व आर्थिक मंदी या व्यापार चक्राच्या दोन अवस्था होत. अर्थव्यवस्थेत घसरणी अगोदर पुनरुज्जीवन व आर्थिक तेजी या अवस्था निर्माण होतात. त्यानंतर घसरण व आर्थिक मंदी या अवस्था येतात. याचा अर्थ असा होतो की, अर्थव्यवस्थेत घसरण निर्माण होण्यापूर्वी आर्थिक तेजी आलेली असते. आर्थिक तेजी-मंदीसाठी कोणते घटक कारणीभूत असतात याबाबत अनेक अर्थशास्त्रज्ञांनी व्यापार चक्रांच्या सैद्धांतिक बाजूचे विवेचन केले आहे.

व्यापार चक्रांच्या जुन्या दृष्टिकोनानुसार माल्थस, सिस्माँडी, मार्क्स व लॅडरेल यांच्या मते, अति बचत किंवा 'उपभोग न्युनता' व्यापार चक्रास कारणीभूत असते. याचा अर्थ अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीच्या कमतरतेमुळे व्यापार चक्रे निर्माण होतात. भांडवलदारी अर्थव्यवस्थेत भांडवलदार मोठ्या प्रमाणात नफा मिळविण्यासाठी अधिकाधिक उत्पादन करीत जातात व त्यामधून अतिरिक्त उत्पादन होते. अतिरिक्त नफ्याच्या आशेने भांडवलदार प्रचंड गुंतवणूक करतात. ही गुंतवणूक करताना त्यांना मागणीचे भान नसते. परिणामी मागणीपेक्षा जास्त उत्पादन होते ($S > D$). मागणीची कमतरता निर्माण होऊन किंमतीत घसरण सुरू होते व ती तीव्र झाल्यास आर्थिक मंदी येते. मार्क्सच्या मते, भांडवलदारीतील 'उत्पन्न विषमता' व भांडवलदारांच्या हातात होणारे संपत्तीचे केंद्रीकरण यामुळे उपभोग न्यूनता व अतिरिक्त उत्पादन निर्माण होते. परिणामी अर्थव्यवस्थेत आर्थिक मंदी निर्माण होते.

जे. हॉब्सन, डब्ल्यू. टी. फोस्टर, डब्ल्यू. कॅचिंग व ई. लॅडरेर यांनी या जुन्या सिद्धांताची पुनर्मांडणी केली. त्यांनी देखील अतिरिक्त बचत व उपभोग न्यूनतेवर भर दिला. फोस्टर-कॅचिंग यांच्या मते, लोकांच्या काटकसर करण्याच्या द्विधा मन:स्थितीमुळे (Dilema of Thrift) आर्थिक मंदी येते. अर्थव्यवस्थेत बचत दोन प्रकारे केली जाते; 1) 'लोकांची व्यक्तिगत बचत' याला ते लोकांची खर्चापासून दूर राहण्याची प्रवृत्ती असे म्हणतात, तर 2) कंपन्या व महामंडळांची बचत : कंपन्या व महामंडळे स्वत:चा नफा लोकांना वितरीत न करता स्वत:जवळ ठेवून घेण्याची प्रवृत्ती. ही दोन प्रकारची बचत, लोकांची व्यक्तिगत बचत व कंपन्या आणि महामंडळाची बचत अर्थव्यवस्थेत गुंतविली जाते. ही गुंतवणूक उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवली वस्तूंमध्ये केली जाते, परिणामी उपभोग्य वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढते. लोक व कंपन्या - महामंडळे म्हणजेच उत्पादक (Producers) यांच्याकडून वाढीव उत्पादनास आवश्यक असलेली मागणी उत्पादनातील वाढीच्या प्रमाणात वाढत नाही. अर्थव्यवस्थेत उपभोग्य वस्तूंचे उत्पादन व मागणी (S>D or D<S) या दोहोंत असमतोल निर्माण होतो. खरेदीशक्ती अथवा मागणीच्या कमतरतेमुळे अतिरिक्त उत्पादन निर्माण होते. अतिरिक्त उत्पादनांमुळे किंमती कमी होऊ लागतात व अर्थव्यवस्थेत घसरण (Recession or Meltdown) सुरू होते व आर्थिक मंदी येते.

**जे. अे. हॉब्सनचा दृष्टिकोन :**

हॉब्सनच्या मते, अर्थव्यवस्थेतील उपभोग फलन स्थिर असते. कारण लोकांच्या सवयी, रुढी, टोकाच्या संकुचित कल्पना या घटकांवर ते अवलंबून असते. परिणामी अर्थव्यवस्थेत लोकांचा उपभोग स्थिर असतो. तर दुसऱ्या बाजूला तांत्रिक प्रगती व व्यावसायिक उपक्रमशीलता यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होते. यामधून अतिरिक्त उत्पादन, अतिरिक्त बचत व उपभोग न्यूनता निर्माण होऊन आर्थिक संकट निर्माण होते.

उपभोग न्यूनतेबाबत लॅडरेर, हंसनेईतर, ई. प्रेजर व अॅफ्लेशन यांच्या मते, ''उत्पादन संरचनेतील परिस्थितीशी जुळवून न घेता येणारी स्थिती, उपभोग्य वस्तूंच्या मागणीची कमतरता, अतिरिक्त बचत वगैरे घटकांमुळे आर्थिक तेजी नाहीशी होऊन अर्थव्यवस्थेत आर्थिक संकट निर्माण होते.''

अशा रीतीने, उपभोग न्यूनता व अतिरिक्त बचतीमुळे अर्थव्यवस्थेत आर्थिक संकट निर्माण होते. या मताचा पुरस्कार करणारा अर्थशास्त्रज्ञांचा एक गट आहे. त्यांनी या सिद्धांतात अतिरिक्त बचत व उपभोग न्यूनता निर्माण करणाऱ्या घटकांचा ऊहापोह केला.

व्यापार चक्र विषयक मानसशास्त्रीय सिद्धांताची मांडणी प्रा. पिगू, मार्शल, लॅव्हींग्स्टन वगैरेंनी केली. त्यांच्या मते, अर्थव्यवस्थतेतील व्यावसायिक (उलाढाली) स्थिती लोकांच्या अपेक्षा व अनुमान या मानसिक घटकांवर अवलंबून असतात. या सिद्धांतानुसार उद्योजक व व्यापाऱ्यांच्या मनात आशावाद व निराशावाद निर्माण झाल्यामुळे अर्थव्यवस्थेत व्यापार चक्रे निर्माण होतात. जेव्हा हे लोक भविष्यकालीन

आर्थिक परिस्थितीबाबत आशावादी असतात तेव्हा अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करतात. त्या मधून अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी येते. या उलट, उद्योजक व व्यापारी भविष्यकालीन आर्थिक परिस्थितीबाबत जेव्हा निराशावादी असतात, तेव्हा अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक, उत्पादन कमी होऊन अर्थव्यवस्थेत घसरण सुरू होते व आर्थिक मंदी येते.

अशा रीतीने, उद्योग जगतामधील आशावाद व निराशावादाच्या लाटा संपूर्ण अर्थव्यवस्थेत पसरुन आर्थिक तेजी–मंदीचे चक्र निर्माण होते.

समाजवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते, अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनामुळे व्यापार चक्रे निर्माण होतात. भांडवलदारीत अनेक उत्पादन संस्था एक सारखेच उत्पादन करीत असतात. त्यांच्यामध्ये वस्तू विक्रीची स्पर्धा असते. प्रत्येक जण आपली बाजारातील विक्री वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो. या स्पर्धेत भांडवलदारांना वस्तू उत्पादनाचे भान राहत नाही. त्यामुळे मागणीपेक्षा जास्त वस्तूंचे उत्पादन होते. परिणामी, अतिरिक्त उत्पादन होऊन किंमती कमी होतात व अर्थव्यवस्थेत आर्थिक मंदी येते.

अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ जोसेफ शुंपीटरच्या मते, भांडवलदारी अर्थव्यवस्थेत नव प्रवर्तनामुळे व्यापार चक्रे येतात. उत्पादक नवनवीन यांत्रिक शोध, नव्या उत्पादन व व्यवस्थापनाच्या पद्धती, नवीन बाजारपेठांचा शोध, नवीन कच्चा माल वगैरेंचे शोध लावून ते अंमलात आणतात. या नाविन्यशीलतेमुळे व्यापार चक्रे निर्माण होतात. या नवीन शोधांमुळे अर्थव्यवस्थेत नवीन वस्तू उत्पादित केल्या जातात. जुन्या व नव्या वस्तूंमध्ये स्पर्धा निर्माण होते. त्यामध्ये लोक नव्या वस्तूंची खरेदी करतात. जुन्या वस्तूंची मागणी कमी होते, त्यांच्या किंमती कमी होतात. नवीन उद्योग संस्था बँकांच्या कर्जाची परतफेड करु लागतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा कमी होतो. जुन्या उद्योग संस्था उत्पादन कमी करतात, कामगारांना कामावरुन काढून टाकतात. त्यामुळे बेकारी वाढत जाते. कामगारांची खरेदीशक्ती कमी होऊन जुन्या व नव्या वस्तूंची मागणी घटते. परिणामी अर्थव्यवस्थेत आर्थिक मंदी येते.

मुद्रावादी अर्थशास्त्रज्ञ हॉट्रे व हायेक यांच्या मते, व्यापार चक्राच्या निर्मितीला अर्थव्यवस्थेतील चलनविषयक घटक कारणीभूत ठरतात.

हॉट्रे व्यापारचक्राला चलनविषयक घटना असे संबोधतो. त्याच्या मते, अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा लवचिक असतो, त्यामुळे अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी मंदीची चक्रे निर्माण होतात. बँकांचा पतपुरवठा, व्याजदर व पैशाचा पुरवठा हे घटक व्यापार चक्राला कारणीभूत असतात. व्याज दर कमी झाल्यामुळे उद्योजक व व्यापारी मोठ्या प्रमाणात कर्जाची मागणी करतात. परिणामी बँकांच्या पत पुरवठ्यात वाढ होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक, उत्पादन, रोजगार व उत्पन्नात वाढ होऊन अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी येते. आर्थिक तेजीच्या काळात लोकांचे उत्पन्न वाढलेले असते. त्यामुळे त्यांचा उपभोग खर्च वाढतो. बँकांकडून चलनात मोठ्या प्रमाणात पैसा येतो. देशातील उद्योजक व व्यापारी आपल्या हातात रोख स्वरुपात पैसा जवळ बाळगतात (रोखता

वाढते). तर बँकांकडून पैसा बाहेर जाण्यामुळे बँकांची रोखता धोक्यात येते (राखीव निधी). हा धोका टाळण्यासाठी बँका व्याज दरात वाढ करतात व कर्ज देण्याचे प्रमाण कमी करतात. तसेच व्यापारी व उद्योजकांना दिलेली मागणी कर्जे, अल्पकालीन कर्जे वसूल करतात. उत्पादकही कर्जे फेडण्यासाठी, असेल त्या किंमतीला वस्तूंची विक्री करतात, परिणामी किंमती कमी होतात. लहान उद्योग संस्था आपल्या दैनंदिन आर्थिक गरजांची पूर्तता करु न शकल्याने बंद पडतात. त्यामुळे उत्पादन क्षेत्रात उदासीनता येते. उत्पादक उत्पादन कमी करतात, बेरोजगारी वाढते. त्यामुळे वस्तूंची मागणी कमी होते, किंमती कमी होत जातात, नफा कमी होतो, गुंतवणूक कमी होते व अर्थव्यवस्थेची घसरण सुरू होऊन आर्थिक मंदी येते.

हायेकच्या मते, अर्थव्यवस्थेतील अति गुंतवणूकीमुळे व्यापार चक्रे निर्माण होतात. त्यांच्या मते, बँकांची जादा पतनिर्मिती व व्याज दारात त्यांनी केलेली घट व्यापार चक्रास कारणीभूत असतात. विकसेलचा सिद्धांत हायेकने अधिक स्पष्ट करून सांगितला. हायेकने व्याज दराचे दोन प्रकार सांगितले. नैसर्गिक व्याजदर व बाजारी व्याजदर. जोपर्यंत हे दोन्ही व्याज दर समान असतात तोपर्यंत व्यापार चक्रे निर्माण होत नाहीत. जेव्हा या दोन्ही व्याज दरात असमानता निर्माण होते, तेव्हा अर्थव्यवस्थेत व्यापार चक्रे उद्‌भवतात. बाजारी व्याजदर नैसर्गिक व्याज दरापेक्षा कमी झाल्यास कर्जाची मागणी वाढते, पत पुरवठा वाढतो व अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी येते. याउलट, बाजारी व्याजदर नैसर्गिक व्याज दरापेक्षा जास्त झाल्यास कर्जाची मागणी कमी होते, पत पुरवठा, गुंतवणूक कमी होते व अर्थव्यवस्थेत घसरण सुरू होऊन आर्थिक मंदी येते.

अशा रीतीने, हॉट्रे व हायेक या मौद्रिक अर्थशास्त्रज्ञांनी पैशाचा पुरवठा, पत पुरवठा, व्याज दर, गुंतवणूक या चलनाशी संबंधित घटकांमुळे व्यापार चक्रे निर्माण होतात असे स्पष्ट केले.

प्रो. अे. स्पाईथॉफ, जी. कॅसल, रॉबर्टसन, थुगन बर्नोस्की या अमुद्रावादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते, व्यापार चक्रास मौद्रिक नव्हे, तर अमौद्रिक घटक कारणीभूत असतात. त्यांच्या मते, चलन पद्धती व्यापार चक्र प्रक्रियेतील प्रतिसाद देणारी यंत्रणा, जी व्यापार चक्रास कारणीभूत नसते. स्पेईथॉफच्या मते, अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राचा असमान विकास व्यापार चक्रास कारणीभूत होतो. त्याने आर्थिक प्रक्रियेची विभागणी चार क्षेत्रात केली. 1) टिकाऊ नसलेल्या उपभोग्य वस्तू निर्मिती उद्योग, 2) टिकाऊ व मध्यम टिकाऊ वस्तू निर्मिती उद्योग, 3) टिकाऊ वस्तूंची निर्मिती करणारे उद्योग, 4) भांडवली वस्तू उद्योगांना लागणाऱ्या वस्तूंची निर्मिती करणारे उद्योग. ही चार क्षेत्रे एकमेकांशी संबंधित असतात. एका क्षेत्रातील बदल त्वरीत दुसऱ्या क्षेत्रात परावर्तित होतात. प्रथम टिकाऊ वस्तू निर्मिती उद्योगात गुंतवणूक होते, त्यामुळे त्या क्षेत्राला वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या क्षेत्रातील वस्तूंना मागणी येते, त्यामधून आर्थिक तेजी निर्माण होते. त्या क्षेत्रातील उत्पन्न, रोजगार व उपभोग्य वस्तूंची मागणी वाढते. स्पाईथॉफच्या मते, उपभोग न्यूनतेमुळे नव्हे तर भांडवलाच्या कमतरतेमुळे आर्थिक मंदी येते. याबाबत हेबरलर म्हणतो,

आर्थिक मंदी अतिरिक्त बचतीमुळे नव्हे, तर बचतीच्या कमतरतेमुळे येते. तसेच उपभोग न्यूनतेमुळे नव्हे तर अतिरिक्त उपभोगामुळे भांडवलाची कमतरता निर्माण होऊन आर्थिक संकट निर्माण होते.

अर्थव्यवस्थेत घसरणीची सुरुवात निराशावादी दृष्टिकोन व गुंतवणूक करण्यास नाखूष असणे, या दोन कारणांमुळे होते. जेव्हा भांडवली वस्तू निर्मिती उद्योगात अतिरिक्त उत्पादन क्षमता वाढत जाते, तेव्हा गुंतवणूक व उत्पादन घटत जाते. भविष्यात आर्थिक मंदी येईल अशा मानसिकतेमुळे उद्योजकांत निराशावादी दृष्टिकोन निर्माण होतो. तो इतर सर्व क्षेत्रात पसरतो व सर्व क्षेत्रात घसरण सुरू होऊन आर्थिक मंदी येते.

आर्थिक मंदीची तीव्रता व कालावधी किती राहील याबाबत तो म्हणतो, आर्थिक तेजी कमी होण्याचा वेग, वित्तीय क्षेत्रातील घबराट व दिवाळखोरांची संख्या किती आहे या घटकांवर किंवा आर्थिक तेजी ज्या वेगाने (अति किंवा कमी) कमी झाली त्यावर आर्थिक मंदीची तीव्रता व कालावधी अवलंबून असतो. जर आर्थिक तेजी परकीय भांडवलामुळे निर्माण झाली असेल तर गुंतवणूक थांबण्याची तीव्रता कमी असते. कारण भांडवलाची निर्यात करणाऱ्या देशाला अनेक अडचणींना ज्या प्रमाणात तोंड द्यावे लागते, तेवढ्या प्रमाणात भांडवलाची आयात करणाऱ्या देशांची मुक्तता होते.

तो पुढे म्हणतो, अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन उपभोग्य वस्तूंच्या मागणीत वाढ करण्यामुळे होत नाही, तर गुंतवणूकीत वाढ केल्यामुळे होते. त्यासाठी भांडवली वस्तूंवरील खर्च कमी करणे, वेतन कपात, किंमती, व्याज दर कमी करणे आणि उत्पादनाच्या नव्या पद्धतींचा अवलंब करणे इत्यादी उपाय योजावे लागतात.

गुस्तॉव कॅसलने देखील व्यापार चक्राबाबत स्पेईथॉफ सारखाच दृष्टिकोन मांडला. दोघांच्या दृष्टिकोनात फक्त व्यापार चक्राच्या अवस्था कशा बदलतात या विवेचनात फरक आहे. कॅसलच्या मते, आर्थिक तेजी (वरचा बदल बिंदू) ही उपभोग वस्तू निर्मिती क्षेत्रातील अति गुंतवणूकीमुळे निर्माण होत नाही; तर ती सर्वसाधारण क्षेत्रातील अतिरिक्त गुंतवणूकीमुळे निर्माण होते. तसेच (खालचा बदल बिंदू) आर्थिक घसरण विविध घटकावरील खर्च कमी केल्यामुळे व उत्पादन पद्धतीत सुधारणा केल्यामुळे निर्माण होतो. कॅसलने व्याज दरातील घट या घटकावर इतर घटकांपेक्षा जास्त भर दिला. स्थिर भांडवली वस्तूंच्या मूल्यावर परिणाम करणारा व्याज दर हा शक्तिशाली घटक आहे असे तो म्हणतो.

डी. एच. रॉबर्टसनने, व्यापार चक्राच्या स्पष्टीकरणाबाबत वास्तव घटक व चलनविषयक घटकांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते, आर्थिक बदल दोन प्रकारचे असतात. 1) आवश्यक व इच्छित चढ उतार जे औद्योगिक प्रगतीच्या स्फोटक घटकांमध्येच समाविष्ट असतात, ते त्या स्फोटक घटकांपासून वेगळे करता येत नाहीत. 2) दुय्यम व प्रेरित चढ उतार म्हणजे अति आर्थिक तेजी व अनावश्यक भाव घट. हे घटक विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी उपयुक्त नसतात. ते योग्य त्या स्थिरीकरण उपायांचा अवलंब करुन

कमी करावेत.

रॉबर्टसन म्हणतो, अर्थव्यवस्थेत आशावाद व निराशावादाचे अनुमान करण्यात ज्या चुका होतात, त्यामुळे दुय्यम चढ उतार हे आवश्यक व इच्छित चढ उतारापेक्षा वरचढ ठरतात, परंतु प्राथमिक चढ उतार अर्थव्यवस्थेत चुका नसल्या तरी कायम असतात. रॉबर्टसनच्या मते, आर्थिक प्रगतीची अवस्था संथ व सातत्यपूर्ण नसते, तर ती खंडीत, तुटक व वेगाने बदल घडवून आणणारी असते. अर्थव्यवस्थेत गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होते. परंतु ती प्रमाणशीर नसते. गुंतवणूकीमुळे अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक घडामोडींत वाढ होते व अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात वाढ घडून येते. त्यानंतर कालांतराने अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात फेरजुळणी होते व पुन्हा अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊन वेगाने औद्योगिक वाढ घडून येते.

रॉबर्टसनच्या मते, आर्थिक तेजी व मंदीचे प्राथमिक कारण आर्थिक प्रगती व स्थैर्य या दोहोंत मेळ घालण्यात येणाऱ्या अडचणी होत. आर्थिक विकास प्रक्रियेत भांडवली वस्तूंमध्ये वेगाने वाढ होत जाते.

आर्थिक तेजीच्या काळात गुंतवणूकीचा दर सरासरी गुंतवणूक दरापेक्षा जास्त असतो. त्यामुळे भांडवली वस्तूंचा पुरवठा अतिरिक्त होतो. आर्थिक तेजीमुळे पैशाचा पुरवठा मोठ्या प्रमाणात वाढतो. तो पुढे गुंतवणूकीची अतिरिक्तता निर्माण करतो. गुंतवणूक साठून राहते. त्यामुळे आर्थिक संकट व असमतोल निर्माण होतो. अशा रीतीने रॉबर्टसनच्या मते, आर्थिक तेजीच्या काळातील अतिरिक्त गुंतवणूक व तिची फेरजुळणी करण्यात येणाऱ्या अडचणींमुळे अर्थव्यवस्थेची घसरण सुरू होते व आर्थिक मंदी येते.

**केन्सचा दृष्टिकोन :**

केन्सने आपल्या सर्वसाधारण रोजगार सिद्धांतामध्ये अर्थव्यवस्थेतील उत्पादन व रोजगार या घटकात कोणत्या घटकांमुळे बदल होतो हे स्पष्ट करतानाच आर्थिक चढ उताराचे स्पष्टीकरण दिले. त्याच्या मते, भांडवलाच्या सीमांत लाभ क्षमतेत बदल झाल्यामुळे, प्रेरित गुंतवणूकीच्या दरात बदल होतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेत आर्थिक चढ उतार घडून येतात. भांडवलाची सीमांत लाभ क्षमता कमी झाल्यास अर्थव्यवस्थेत घसरण निर्माण होते व आर्थिक मंदी येते; तर याउलट भांडवलाची सीमांत लाभ क्षमता वाढल्यास अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी येते. म्हणजेच, अर्थव्यवस्थेतील आर्थिक तेजी मंदीला गुंतवणूक हा घटक कारणीभूत असतो. भांडवलाच्या सीमांत लाभ क्षमतेत चढ उतार झाल्यास गुंतवणूकीच्या दरात बदल होतो, त्यामुळे व्यापार चक्रे निर्माण होतात.

मिचेलच्या मते, आधुनिक भांडवलदारी अर्थव्यवस्थेतील अंतर्गत अस्थिर प्रवृत्तीमुळे आर्थिक चढउतार निर्माण होतात. मिचेलने स्वयं निर्मितीत आर्थिक चढ उताराचा सिद्धांत मांडला. त्याच्या मते, स्वनिर्मित आर्थिक चढ उतार हे तंत्रज्ञान सुधारणा, लोकसंख्या वाढ, युद्ध, पिके, स्वयंपूर्ण मौद्रिक घटक वगैरे बाह्य घटकातील बदलामुळे घडून येत नाहीत, तर व्यापाराअंतर्गत प्रक्रियेमुळे घडून येतात. नफ्यातील चढ उतार हे मूलभूत घटक व्यापार चक्रांना कारणीभूत ठरतात.

मिचेलच्या मते, किंमती, उद्योग संस्थांचे उत्पन्न व खर्च, विक्रीचे आकारमान, चलनाची उपलब्धता, बँकांचा पत पुरवठा हे घटक व्यापार चक्रांना कारणीभूत असतात. मिचेलच्या मते, किंमती व खर्च या दोहोंतील दबावामुळे नफा कमी होतो. उत्पादन खर्च सतत वाढत जातो. परंतु किंमती वाढत नाहीत, कारण लोकांकडून सवयीने विशिष्ट किंमती निश्चित केल्या जातात. जास्त व्याज दर व बांधकाम खर्चातील वाढीमुळे बांधकाम गुंतवणूक व विविध भांडवली साधनातील गुंतवणूक कमी होणे, चुकीच्या आशावादी दृष्टिकोनामुळे उत्पादन व काही उद्योगात अतिरिक्त उत्पादन क्षमतेचा वापर होणे वगैरे कारणांमुळे नफ्याचे प्रमाण कमी होते. परिणामी घसरण व आर्थिक मंदी येते.

हेन्री शुल्झ, जान टिनबरजेन व ऑर्थर हॅन्यू यांनी आपल्या कोळ्याचे जाळे सिद्धांतात किंमत, उत्पादन व मागणी व पुरवठा या घटकांत बदल झाल्यामुळे केंद्राकडे येणारी व केंद्रापासून दूर जाणारी व्यापार चक्रे तयार होतात असे स्पष्ट केले.

लाईड मेटझर या अर्थशास्त्रज्ञाने व्यापार चक्राबाबत वस्तू साठा सिद्धांत मांडला. या सिद्धांतात त्याने अर्थव्यवस्थेतील कच्चा माल, अंतिम वस्तू, उत्पादन वाढीचा दर, भविष्यकालीन विक्री, वर्तमान विक्री, उपभोग्य वस्तूंची मागणी, भांडवली वस्तूंची मागणी, गुंतवणूक वगैरे घटकांत बदल झाल्यास व्यापार चक्रे येतात. अर्थव्यवस्थेतील उत्पादनाला आवश्यक असलेल्या वस्तूंच्या साठ्यात बदल झाल्यास व्यापार चक्रे येतात असे मेटझरने आपल्या वस्तू-साठा सिद्धांतात (Inventory Theory) म्हटले. तो पुढे म्हणतो, लोकांच्या सीमांत उपभोग प्रवृत्तीत बदल झाल्यास अर्थव्यवस्थेत आर्थिक चढ उतार घडून येतात. सीमांत उपभोग प्रवृत्ती वाढल्यास, उपभोग्य वस्तूंची मागणी वाढते. त्यामुळे भांडवली वस्तूंच्या साठ्यात वाढ होऊन अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी येते. याउलट, सीमांत उपभोग प्रवृत्ती कमी झाल्यास भांडवली वस्तू साठ्यात घट होऊन अर्थव्यवस्थेत घसरण सुरू होते. हे त्याने $C_t = \alpha Y_t$ हे समीकरण मांडून स्पष्ट केले. Ct = उपभोग्य वस्तूची मागणी किंवा विक्री, = सीमांत उपभोग प्रवृत्ती, $Y_t$ = त्या काळातील उत्पन्न स्वयंप्रेरित गुंतवणूक, प्रवेग, गुणक या घटकांचा विचार त्याने आपल्या सिद्धांतात करून सीमांत उपभोग प्रवृत्ती, व्यापाराबाबतच्या अपेक्षा व अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त उत्पादन क्षमता या घटकांत बदल झाल्यास उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू साठ्याच्या मागणीत बदल होऊन आर्थिक तेजी व मंदी येते असे मेटझलरने या सिद्धांतात प्रतिपादन केले.

प्रो. आर. सी. ओ. मॅथ्यूजने व्यापार चक्राबाबतचे साठा-मेळ प्रारुप मांडले. त्याच्या मते, अर्थव्यवस्थेत भांडवलाची एक विशिष्ट क्षमता असते, जी अर्थव्यवस्थेत उपलब्ध असणाऱ्या उत्पादनाला योग्य असते. भांडवलाची ही विशिष्ट क्षमता प्राप्त करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न व त्यामुळे निर्माण होणारा गुणक परिणाम यामुळे व्यापार चक्रे उद्भवतात.

अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक आर्थिक वाढीच्या दरावर अवलंबून असते, तसेच गुंतवणूकीसंबंधीचे निर्णय अस्तित्वात असणाऱ्या भांडवली साठ्याशी संबंधित असतात.

प्रो. मॅथ्यूने कलेकीच्या भांडवल साठा मेळ प्रारुपाचा आधार घेतला. मॅथ्यूच्या मते, गुंतवणूक व अस्तित्वात असणारा भांडवली साठा दोहोंत व्यस्त प्रमाण संबंध असतात, तर गुंतवणूक व राष्ट्रीय उत्पन्न या दोहोंत प्रत्यक्ष एक दिशा संबंध असतात. हे प्रारुप पुढे गुडवीन व कॅल्डोर यांनी काही बदल करुन मांडले. हॅन्सन, सॅम्यूलन्सन व हिक्स यांनी गुणक व प्रवेग या दोहोंतील आंतरक्रियेवर आधारित असलेली इतर प्रारुपे मांडली. या सर्व प्रारुपांचा एकत्रित विचार केल्यास त्यांच्यात काही समान वैशिष्ट्ये आढळून येतात.

1) अर्थव्यवस्थेत अस्तित्वात असलेली एकूण भांडवलाची क्षमता व उत्पादन अथवा उत्पन्न पातळी या दोहोंवर गुंतवणूक निर्णय अवलंबून असतात.

2) गुणक प्रक्रियेद्वारा गुंतवणूक उत्पन्न निर्माण करते.

प्रो. जे. आर. हिक्सने व्यापार चक्रविषयक आधुनिक सिद्धांतात स्पष्ट केले की, गुणक–प्रवेग आंतरक्रियेमुळे व्यापार चक्रे निर्माण होतात. हिक्सच्या मते, लोकसंख्या वाढ, स्वयंचलित गुंतवणूक, तांत्रिक प्रगतीमुळे आर्थिक तेजी येते. गुंतवणूकीमुळे गुणक कार्यान्वित होऊन उत्पन्नात वाढ होते. उत्पन्नातील ही वाढ प्रवेगाद्वारे प्रेरित गुंतवणूकीत वाढ घडवून आणते. अशा रीतीने गुंतवणूकीमुळे गुणक प्रक्रियेद्वारे अर्थव्यवस्थेच्या उत्पन्नात वाढ होते. तर उत्पन्न वाढीमुळे प्रवेगाद्वारे प्रेरित गुंतवणूकीत वाढ होते. परिणामी अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी येते. कालांतराने गुणक प्रवेगाद्वारे अर्थव्यवस्थेतील उत्पन्न व उत्पादन वाढीची क्रिया मंदावते. उत्पन्न व उत्पादन वाढ ही अर्थव्यवस्थेच्या पूर्ण रोजगार पातळी (Ceiling Limit) बरोबर स्थिर असते. प्रेरित गुंतवणूक व उत्पन्न वाढ यांच्यात अंतर पडते. जोपर्यंत ह्या दोहोंत हे अंतर असते. तोपर्यंत अर्थव्यवस्थेतील पूर्ण रोजगार पातळी इतकी वाढ उत्पन्नात होते. जेव्हा प्रेरित गुंतवणूक व उत्पन्न या दोहोंतील हे अंतर नाहीसे होते तेव्हा उत्पन्नात घट सुरू होऊन अर्थव्यवस्थेत घसरण सुरू होते. उत्पन्नात घट सुरू झाल्यास प्रेरित गुंतवणूकीतदेखील घट सुरूहोते. घसरणीच्या काळात प्रवेग कार्यान्वित राहत नाही. परिणामी गुणक–प्रवेग कार्यान्वित न राहून अर्थव्यवस्थेत घसरण सुरू होते व आर्थिक मंदी येते. याचा अर्थ हिक्सने आपल्या सिद्धांतात गुंतवणूक, उत्पन्न, उपभोग, प्रेरित गुंतवणूक या घटकांमुळे आर्थिक तेजी व मंदी येते असे म्हटले.

सॅम्युलसनने आपल्या व्यापारचक्रविषयक सिद्धांतात स्पष्ट केले की, अर्थव्यवस्थेतील गुणक–प्रवेग आंतरसंबंधातून व्यापार चक्रे उद्‌भवतात. त्याच्या मते, प्रथम गुणक प्रक्रिया कार्यान्वित होते. त्याने गुंतवणूकीचे दोन प्रकार सांगितले. 1) स्वयंचलित गुंतवणूक, 2) प्रेरित गुंतवणूक. जेव्हा अर्थव्यवस्थेत स्वयंचलित गुंतवणूक होते, ती गुणक प्रक्रियेद्वारा अर्थव्यवस्थेतील उत्पन्नात वाढ घडवून आणते. परिणामी अर्थव्यवस्थेतील उत्पन्नात वाढ होते. उत्पन्न वाढल्यामुळे लोकांचा उपभोगावरील खर्च वाढतो, प्रेरित उपभोग खर्च, प्रेरित गुंतवणूक निर्माण करतो. परिणामी प्रवेग प्रक्रिया निर्माण होते व अर्थव्यवस्थेच्या एकूण उत्पन्नात वाढ घडून येते व व्यापार चक्रे निर्माण

होतात.

गुडवीनने आपल्या व्यापार चक्र प्रारुपात भांडवल संचयन प्रारुप मांडले. त्याने अर्थव्यवस्थेतील निव्वळ गुंतवणूकीचे स्पष्टीकरण देताना प्रवेग तत्वाचा आधार घेतला. त्याच्या मते, अर्थव्यवस्थेतील उत्पादनात बदल झाला की निव्वळ गुंतवणूकीत बदल होतो. त्यामुळे आवश्यक भांडवल गुंतवणूकीत बदल होतो.

गुडवीनच्या प्रारुपात त्याने सरल रेषीय उपभोग फलन $C = Co + by$ गृहीत धरले. C= उपभोग फलन, Co= स्वयंचलित उपभोग, by= उपभोग – उत्पन्न गुणोत्तर व निव्वळ गुंतवणूक हे भांडवल साठ्याच्या दरातील बदलाबरोबर असतात असे म्हटले. प्रत्यक्ष भांडवल = K व आवश्यक भांडवल $\bar{K}$ = या दोहोंतील मेळावर (adjustment) निव्वळ गुंतवणूक अवलंबून असते. K व $\bar{K}$ हे एकूण उत्पादनांशी प्रमाणशीर असतात ( $\bar{K} = \alpha\ y + b$ ) त्याने प्रवेग गुणांक निव्वळ गुंतवणूकीचे स्पष्टीकरण देण्यासाठी वापरला. निव्वळ गुंतवणूकीत बदल झाल्यास, एकूण उत्पादनात बदल होतो. एकूण उत्पन्नात बदल झाल्यास आवश्यक भांडवल पातळीत बदल होतो. अशा रीतीने सरल रेषीय प्रवेग उत्पादनातील बदलावर अप्रत्यक्षपणे गुंतवणूक अवलंबून असते. तो म्हणतो, समजा, $K = \bar{K}$ ही अर्थव्यवस्थेची समतोल अवस्था आहे. त्यावेळी समतोल उत्पन्न पातळी खालील सूत्रात दर्शविल्याप्रमाणे आहे. –

$Y = \frac{1}{(1-b)} ( Co + \bar{I} )$ व स्वयंचलित गुंतवणूक $\bar{I} = a$ समजा, $K = \frac{\bar{K}}{\text{------}}$ या समतोल अवस्थेत गुंतवणूकीत वाढ झाली, तर गुणक–प्रवेग प्रक्रिया निर्माण होऊन अर्थव्यवस्थेत आर्थिक वाढीची प्रक्रिया निर्माण होते. आर्थिक वाढीच्या काळात K हा घटक $\bar{K}$ या घटकापेक्षा कमी असतो. परंतु जेव्हा आर्थिक तेजी येते तेव्हा K व $\bar{K}$ हे दोन्ही घटक समान असतात. $K = \bar{K}$ याचे कारण म्हणजे अर्थव्यवस्थेतील गुंतवणूकीचा दर कमी झालेला असतो, जेव्हा $\bar{K} < K$ कमी होतो तेव्हा अर्थव्यवस्थेत घसरण होते. याउलट $K > \bar{K}$ तेव्हा अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी येते.

थोडक्यात, प्रत्यक्ष गुंतवणूक, आवश्यक गुंतवणूक, उपभोग उत्पादन या घटकात बदल झाल्यास गुणक–प्रवेग प्रक्रिया निर्माण होऊन भांडवली साठ्यात बदल होतो व अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी व मंदी येते असे गुडवीनने स्पष्ट केले.

रॅग्नर फ्रिशने व्यापार चक्राबाबत बहिर्गत घटक सिद्धांत मांडला. त्याच्या मते, बाह्य घटकांच्या परिणामामुळे अर्थव्यवस्थेत कंपने निर्माण होऊन व्यापार चक्रे निर्माण होतात. याला ड्यूसेनबरी व फेलनरने देखील दुजोरा दिला. अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक ताठरता व संस्थात्मक अडथळे यामुळे साधन सामग्रीच्या वाटपात समस्या निर्माण होतात. अर्थव्यवस्थेच्या गरजेप्रमाणे साधन सामग्रीत मेळ घातला जात नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. भांडवलदारी अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक घटकात बदल होतो. हे घटक म्हणजे अर्थव्यवस्थेतील विकसित होणाऱ्या क्षेत्रांचे महत्त्व कमी होते. घर बांधणी क्षेत्रातील गुंतवणूक कमी

होणे, लोकसंख्यावाढीचा दर कमी होणे, शेअर बाजारातील शेअर्सच्या किंमतीत चढ-उतार होणे या घटकांमुळे अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. हे घटक अर्थव्यवस्थेला व्यापार चक्राबाबत संवेदनशील बनवतात. तंत्रज्ञानातील बदल, राजकीय घटक, कामगार तुटवडा, कामगारांचे स्थलांतर, आंतरराष्ट्रीय व्यापार व व्यापारतोलावर परिणाम करणारे घटक इत्यादींमुळे अर्थव्यवस्थेला धक्के (असमतोल) बसतात. परिणामी अर्थव्यवस्था अस्थिर होते. या बाह्य घटकांच्या धक्क्यामुळे अर्थव्यवस्थेतील काही उद्योगात आर्थिक तेजीस सुरुवात होते, त्यामुळे उत्पादन व रोजगारात वाढ होते. परिणामी उत्पादन खर्च व किंमत वाढते, नफा वाढतो. हा नफा इतर उद्योग व क्षेत्रात गुंतविला जातो आणि अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी येते. जेव्हा गुंतवणूक उत्पादन कमाल अवस्थेला पोहोचते, तेव्हा कामगार व इतर उत्पादन घटकांची टंचाई निर्माण होते किंवा कडक चलनविषयक धोरण अथवा आर्थिक धोरण भाववाढ कमी करण्यासाठी स्वीकारले जाते किंवा किंमत वाढ व उत्पादन घटकांची टंचाई सोबत राजकीय अस्थिरता निर्माण होते. या परिस्थितीमुळे व्यापार व व्यावसायिक अपेक्षा वेगाने प्रतिकूल बनतात, त्याचे रुपांतर निराशावादात होते, गुंतवणूक मंदावते, उत्पादन कमी होते, कामगारांना कामावरुन काढून टाकले जाते व अर्थव्यवस्थेत घसरण सुरू होते.

अशा रीतीने फेलनरच्या मते, अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक घटक व संस्थात्मक ताठरता अर्थव्यवस्थेच्या अस्थिरतेला कारणीभूत ठरते. साधन सामग्रीच्या वाटपाची समस्या व साधन सामग्रीच्या उपलब्धतेची अलवचिकता यामुळे काही काळ आर्थिक तेजी येते; तर अति विस्तारित पत पुरवठ्याची यंत्रणा अयशस्वी झाल्यामुळे अर्थव्यवस्थेत घसरण सुरू होते. म्हणजेच अर्थव्यवस्थेतील विकसित होत जाणारी क्षेत्रे, गुंतवणूक, लोकसंख्या, शेअर बाजारातील किंमती, तंत्रज्ञानातील बदल, राजकीय परिस्थिती, कामगार संख्या, त्यांचे स्थलांतर, मौद्रिक यंत्रणा, साधन सामग्रीचे वाटप व उपलब्धता या घटकांमुळे व्यापार चक्रे निर्माण होतात असे रॅग्नर फ्रिशने स्पष्ट केले.

कॅल्डोरने व्यापार चक्रविषयक प्रारुपात उत्पन्न पातळीशी निगडीत असणाऱ्या भांडवली वस्तूंच्या मागणीचा विचार केला. कॅल्डोरचे प्रारुप केन्स्च्या उत्पन्न निर्धारण विश्लेषणावर आधारलेले आहे. कॅल्डोरच्या मते, अर्थव्यवस्थेतील आर्थिक घडामोडी पूर्व काळातील बचत व गुंतवणूकीवर अवलंबून असतात. जेव्हा बचत गुंतवणूकीपेक्षा जास्त असते, तेव्हा उपभोक्त्यांचा खर्च कमी होतो. गुणक लहान राहून आर्थिक घडामोडी मंदावतात व आर्थिक घसरण सुरू होते. याउलट, बचत गुंतवणूकीपेक्षा कमी असेल तर उपभोग खर्च वाढतो, आर्थिक घडामोडी वाढतात व आर्थिक तेजी येते. अशा रीतीने कॅल्डोरने पूर्वकाळातील बचत व गुंतवणूक आर्थिक घडामोडींत वाढ घडवून आणतात. तसेच बचत व गुंतवणूक अर्थव्यवस्थेतील उत्पादन पातळी व भांडवलाचा साठा या घटकांवर अवलंबून असते.

सन 2007 मध्ये जी आर्थिक मंदी आली तिची कारण मीमांसा पुढीलप्रमाणे केली जाते. सन 2000-2001 या वर्षात अमेरिकन

अर्थव्यवस्था मजबूत होती. घरांच्या व जमिनीच्या किंमती वाढत होत्या. बँका व वित्तीय संस्थांना घरासाठी कर्जे देणे सुरक्षित वाटत होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नफा मिळविण्यासाठी अमेरिकन बँका व वित्तीय संस्थांनी सबप्राईम लोन म्हणजेच दुय्यम दर्जाची कर्जे ही संकल्पना शोधली. दुय्यम दर्जाची कर्जे म्हणजे ज्या व्यक्तीची कर्ज फेडण्याची आर्थिक कुवत नाही, कर्ज फेडण्याची त्याची पत नाही, ज्यांच्याकडे कर्ज फेडीसाठी आवश्यक उत्पन्न नाही अशा व्यक्तींना कर्ज देणे होय. थोडक्यात, कर्ज फेडीची आर्थिक क्षमता नसताना भरमसाठ व्याज मिळविण्याच्या लालसेने दिलेली कर्जेही दुय्यम दर्जाची कर्जे होत. तसेच या कर्जासाठी दुय्यम दर्जाचे तारण स्वीकारणे होय.

घरांच्या किंमती वाढत जाणार या गृहीतावर (आशावाद) अमेरिकेत बँका व वित्तीय संस्थांनी मोठ्या व्याज दराने घरासाठी दुय्यम दर्जाची कर्जे दिली. अमेरिकन अर्थव्यवस्था खुली असल्यामुळे (जागतिकीकरण) या बँका व वित्तीय संस्थांच्या व्यवहारावर अमेरिकेच्या फेडरल बँकेचे (अमेरिकेची मध्यवर्ती बँक) नियंत्रण नव्हते. त्यामुळे अमेरिकेतील बँकांनीही दुय्यम दर्जाची कर्जे दिली. घरांच्या किंमती सतत वाढत असल्याने सट्टेबाजीसाठी लोकांनी बँकाकडून कर्जे घेऊन घरांमध्ये प्रचंड गुंतवणूक केली. या कर्जात जास्त जोखीम व धोका आहे हे अमेरिकेतील बँका व वित्तीय संस्थांना माहीत होते, म्हणून या कर्जावर त्यांनी व्याजाचे मोठे दर आकारले, व्याज दरात वाढ केली.

या कर्जाच्या दोन पद्धती होत्या. पहिल्या पद्धतीत कर्जदारावर कर्जाचा मोठा बोजा पडू नये म्हणून सुरुवातीची 3 ते 4 वर्षे हप्ता कमी ठेवायचा व तो फरक पुढील हप्त्यात समाविष्ट करुन त्याची वसूली करावयाची. याला 'ॲडजेस्टेबल रेट मॉर्गेज' असे म्हटले जात असे. तर दुसऱ्या पद्धतीत सुरुवातीची काही वर्षे फक्त व्याज भरावयाचे व उर्वरित रक्कम पुढील कालावधीत ॲडजेस्ट करावयाची.

ही कर्जे अस्तित्वात असणाऱ्या घराच्या तारणावर दिली जात होती (घरांच्या किंमती सतत वाढत जाणार हे गृहीत धरुन). या घरांच्या किंमती प्रत्यक्ष किंमतीपेक्षा किती तरी जास्त फुगवून सांगितल्या होत्या. अशी घरे तारण ठेवून घर खरेदीदारांना मोठ्या प्रमाणात कर्जे दिली. या कर्जांना विमा कंपन्यांनी विम्याचे संरक्षण दिले. त्यामुळे ही सर्व कर्जे सुरक्षित आहेत असे समजून प्रचंड कर्ज पुरवठा करण्यात आला. सब प्राईम कर्जांमुळे घरांचे ग्राहक वाढले, घरांची गरज नसताना सट्टेबाजीद्वारे नफा मिळविण्यासाठी लोकांनी घरांची मोठ्या प्रमाणात खरेदी केली. लोकांची घर खरेदीसाठी कर्जाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. परिणामी बँकांना कर्ज देण्यासाठी पैसा कमी पडू लागला. म्हणून अमेरिकन बँकांनी 'मॉर्गेज बाँड'ची शक्कल लढविली. बँका व वित्तीय संस्थांकडे पूर्वीच कर्जापोटी जी घरे बँकांकडे तारण होती, तीच घरे पुन्हा तारण ठेवून 'मॉर्गेज बाँड' काढले व त्यांची विक्री केली. या बाँडचा पत दर्जा खाजगी पत दर्जा कंपन्यांनी उत्कृष्ट म्हणून ठरविला. हे बाँड जगातील अनेक बँका व वित्तीय संस्थांनी खरेदी केले. 'मॉर्गेज बाँड' हे नवे पत

साधन (Derivative) अमेरिकन बँकांनी शोधून काढले व प्रचंड पैसा त्यांच्या विक्रीतून गोळा केला. हा पैसा पुन्हा गृह कर्जे देण्यासाठी वापरला. परिणामी, घरांच्या सट्टेबाजीला उधाण आले. या व्यवहारावर अमेरिकेचे सरकार अथवा मध्यवर्ती बँकेचे नियंत्रण नव्हते, त्यामुळे घरांची मागणी प्रचंड वाढली (Housing Bubble).

सन 2006-2007 मध्ये, अमेरिकन बँकांच्या घरांच्या किंमती सतत वाढत जातील या गृहीताला तडा गेला. गेल्या 15 वर्षांत प्रथमच 2006-2007 मध्ये घरांच्या किंमती कमी झाल्या व घरांचा बुडबुडा (Housing Bubble) फुटला.

घरांच्या किंमती कमी होत गेल्याने कर्जदारांनाही कर्जे फेडणे शक्य झाले नाही. कर्जे मोठ्या प्रमाणात थकली. बँका व वित्तीय संस्थांनी तारण घेतलेल्या घरांची विक्री सुरू केली. घरांचा पुरवठा वाढला. ग्राहक नसल्याने घरांची विक्री होत नव्हती. तसेच कर्जदारांची कर्ज फेडण्याची कुवत नसल्याने कर्जे थकली. त्यामुळे बँका व वित्तीय संस्थांचा घरात गुंतविलेला पैसा बुडाला. तसेच मॉर्गेज बाँडच्या किंमती कोसळल्या. ज्यांनी पैसा गुंतविला होता, त्यांना प्रचंड नुकसान झाले. बँकांकडे पैशांची चणचण (रोखतेची समस्या) (Liquidity Crunch) निर्माण झाली. अमेरिकेत रोखतेची समस्या निर्माण झाल्यामुळे अमेरिकेने इतर देशात गुंतविलेला पैसा काढून घेतला. परिणामी जागतिक पातळीवर रोखतेची समस्या निर्माण झाली, त्यामधून आर्थिक मंदी निर्माण झाली.

अलीकडच्या काळातील जागतिक मंदीच्या कारणाचे विवेचन केल्यास पुढील कारणे या जागतिक मंदीस कारणीभूत ठरली

1) दुय्यम दर्जाची कर्जे

2) चुकीचा आशावाद

3) अनियंत्रित बँकींग पद्धती

4) जागतिकीकरण

5) बँका व वित्तीय संस्थांचे बेजबाबदार वित्तीय धोरण व धोका पत्करण्याचे साहस

6) अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक असमतोल

7) आभासी वित्त पुरवठा

8) रोखतेची कमतरता

9) परकीय भांडवल

10) चंगळवाद

या कारणांपैकी चुकीचा आशावाद याचा उल्लेख प्रा.पिगू, मार्शल व लॅव्हींगस्टन यांनी आपल्या मानसशास्त्रीय सिद्धांतात केला आहे. तर रॉबर्टसनने आपल्या व्यापार चक्रविषयक सिद्धांतात देखील आशावाद व निराशावादाचे अनुमान करण्यातील चूकांमुळे व्यापार चक्रे उद्भवतात असे म्हटले आहे. तसेच स्पाईथॉपने आपल्या सिद्धांतात अतिरिक्त उपभोगामुळे (चंगळवाद) भांडवलाची टंचाई निर्माण होऊन घसरण व आर्थिक मंदी येते असे प्रतिपादन केले. स्पाईथॉपचे म्हणणे या आर्थिक मंदीच्या काळात खरे ठरले. कारण घरांची मागणी प्रचंड वाढली (अतिरिक्त उपभोग)त्यामुळे रोखतेची टंचाई (भांडवल टंचाई) जागतिक पातळीवर निर्माण झाली. तसेच जोसेफ शुंपीटरने व्यापार चक्रविषयक नव प्रवर्तन सिद्धांतात म्हटले आहे की, आर्थिक तेजीच्या काळात लोक आपल्या हातात मोठ्या प्रमाणात रोख पैसा जवळ

बाळगतात, त्यामुळे बँकांची रोखता धोक्यात येते. बँकांची रोखता अतिरिक्त पत पुरवठ्यामुळे धोक्यात येते असे शुंपीटर म्हणतो. त्यामुळे व्यापार चक्रे उद्‌भवतात. परंतु दुय्यम दर्जाच्या कर्जांमुळे बँकांची रोखता धोक्यात येते असे त्याने म्हटले नाही.

थोडक्यात, व्यापार चक्रविषयक जुन्या सिद्धांतापासून ते आधुनिक सिद्धांतापर्यंत जुन्या व नव्या अर्थशास्त्रज्ञांनी चुकीचा आशावाद, आशावाद निराशावादाचे चुकीचे अनुमान, अति उपभोगामुळे रोखतेची टंचाई हे तीन घटक व्यापार चक्रास कारणीभूत ठरतात. परंतु दुय्यम दर्जाची कर्जे, अनियंत्रित व बेजबाबदार बँकिंग पद्धती, जागतिकीकरण, अभासी वित्त पुरवठा, हाऊसिंग बबल, परकीय भांडवल, सबप्राईम लोन व मॉर्गेज बाँड यांमुळे आर्थिक मंदी येते या घटकांचा उल्लेख कोठेही आढळून येत नाही. वरील घटकांमुळेदेखील आर्थिक मंदी येते हे सन 2007 च्या आर्थिक मंदीने दाखवून दिले.

**निष्कर्ष :**

सन 2007 च्या आर्थिक मंदीने दुय्यम दर्जाची कर्जे, अनियंत्रित व बेजबाबदार बँकिंग पद्धती, सट्टेबाजीसाठी घरामध्ये केलेली गुंतवणूक, परकीय भांडवल, जागतिकीकरण, चुकीचे वित्तीय धोरण या कारणांची भर घातली.

**संदर्भ :**


1) Dr. B. N. Ghosh & Dr. Rama Ghosh, "Modern Macro-Economics, Theory and Practice, Himalaya Publishing House, New Delhi.
2) Rana, Verma, "Macro-Economic Analysis", Vishal Publicatons, Delhi.
3) D. N. Mithani, "Money Banking : International Trade and Public Finance", Himalaya Publishing House, New Delhi.
4) H. L. Ahuja, "Macro-Economics : Theory and Policy", S. Chand & Co. Ltd., New Delhi.
5) K. K. Dewett, "Modern Economic Theory", S. Chand & Co. Ltd., New Delhi.
6) M. L. Jhingan, "Monetary Economics", Vrinda Publications (P) Ltd., Delhi - 1
7) Datta Sundaram, "Indian Economy", S. Chand & Co. Ltd., New Delhi
8) 'Arthajagat', National Conference at Chh. Shivaji College, Satara.
9) http://www.fineprint.com
10) 'शिवार्थ', शिवाजी विद्यापीठ इकॉनॉमिक असोसिएशन, कोल्हापूर.
11) दै. सकाळ (सांगली), दि. 21 नोव्हेंबर 2008.
12) दै. लोकसत्ता, दि. 8 डिसेंबर 2008.

# गोवा राज्याच्या पर्यटनातील समस्या

**वासुदेव नारायण सावंत**
फोंडा

गोव्यातील पोर्तुगीज राजवट 1961 मध्ये संपुष्टात आल्याने हे राज्य 1962 - 63 या आर्थिक वर्षापासून भारतातील नियोजित आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत समाविष्ट झाले. उर्वरीत भारतात त्यावेळी तिसरी पंचवार्षिक योजना सुरू होती. गोवा मुक्तीनंतरच्या चार दशकात राज्याचा आर्थिक विकास इतर राज्यांच्या तुलनेत फार जलद गतीने झाल्याचे निदर्शनास येते. तसेच आर्थिक विकासाबरोबरच उत्पन्नाच्या क्षेत्रनिहाय रचनेतही महत्त्वपूर्ण बदल झाल्याचे पुढील तक्ता क्र. 1 वरून निदर्शनास येते.

**तक्ता क्र. 1**

**गोवा राज्य उत्पन्नाचे क्षेत्रनिहाय योगदान 1993 - 94 च्या स्थिर किंमतीनुसार कालखंड 1970 - 71 ते 2000 - 2001**

| वर्ष | प्राथमिक क्षेत्र | द्वितीय क्षेत्र | सेवा क्षेत्र | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1970-1971 | 42.6 | 14.9 | 42.5 | 100 |
| 1980-1981 | 28.5 | 29.7 | 41.8 | 100 |
| 1990-1991 | 21.7 | 30.4 | 47.9 | 100 |
| 2000-2001 | 13.7 | 33.5 | 52.8 | 100 |

स्रोत : आर्थिक पाहणी, २००० वित्त मंत्रायल, नवी दिल्ली.

गोवा राज्याच्या आर्थिक विकासात पर्यटन विकास हा महत्त्वाचा स्रोत मानला जातो. या व्यवसायाच्या विकासामुळे राज्यात विदेशी विनिमय प्राप्ती, रोजगार संधी, उत्पन्न निर्मिती इत्यादी आर्थिक लाभ होत आहेत. तथापि या राज्यातील पर्यटन विकास अनियोजित स्वरूपाचा असल्याने अनेक समस्या निर्माण करीत आहे.

प्रस्तुत शोध निबंधात गोवा राज्याच्या पर्यटन विकासातून निर्माण झालेल्या विविध आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक समस्यांचा ऊहापोह केला आहे. यासाठी दुय्यम सामग्रीचा वापर केला असून त्यामध्ये प्रकाशित साहित्य, संशोधित साहित्य आणि विविध अभ्यास गटांचा अहवाल यांचा समावेश आहे.

गोवा राज्याच्या लोकसंख्येपेक्षा भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त आहे. 2001 मध्ये सुमारे 13.8 लाख पर्यटकांनी भेट दिली होती. यावरून गोवा राज्यातील पर्यटनाचे योगदान लक्षात येते. भेट देणाऱ्या पर्यटकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा व सुविधा यामध्ये विकास होणे आवश्यक आहे. पर्यटकांचा राज्यातील सेवा व सुविधांवरील ताण वाढत असल्याने अनेक समस्या निर्माण होत आहेत. यावर वेळीच उपाययोजना न झाल्यास अनेक गंभीर स्वरूपाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक समस्या निर्माण होऊ शकतात. गोवा राज्यातील पर्यटन विकासामध्ये निर्माण झालेल्या समस्यांचे वर्गीकरण पुढील प्रकारे करता येईल

1. पर्यावरण समस्या
2. आर्थिक समस्या
3. पर्यटकांच्या समस्या

## १. पर्यावरणात्मक समस्या

हंटर कोलीन आणि ग्रीन हॅवॉर्ड यांनी पर्यावरणात्मक घटकांचे वर्गीकरण भौतिक, जैविक, सामाजिक व आर्थिक (सांस्कृतिक) असे केले आहे. हेच घटक नैसर्गिक, मानवनिर्मित आणि सांस्कृतिक असे विभागता येतील.

गोवा राज्यातील पर्यटनाचे केंद्रीकरण विशेषतः बारदेझ, तिसवडी, मार्मागोवा आणि साळशेत या चार किनारपट्टीच्या तालुक्यात मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले आहे. गोव्यातील लोकांना पर्यटन विकास होण्यापूर्वी या समस्या पूर्णपणे अनभिज्ञ होत्या. सिंग पार्सिक यांनी 1998 मध्ये ''निसर्ग संस्कृती आणि पर्यावरण यांचे संधारण'' या विषयी गोवा राज्याच्या पर्यटन विकासातून उद्‌भवलेल्या पर्यावरणविषयक समस्या पुढीलप्रमाणे नमूद केल्या आहेत.

1. प्रमुख रस्ते, नदी आणि सागर किनारे यांच्या बाजूने झालेले बेशिस्त बांधकाम.
2. मोठ्या प्रमाणावरील जंगलतोड आणि पर्वत उतारावरील उत्खनन यामुळे पर्यावरणाचा झालेला ऱ्हास.
3. शहरात वाढलेला गजबजाट.
4. शहरातील स्थापत्य शास्त्रानुसार सदोष बांधकाम, चर्च, देवालये इत्यादी ऐतिहासिक स्मारकांच्या आजूबाजूने झालेला अनैच्छिक विकास.
5. सागर किनारे, नदीच्या पात्रातील वाळूचे उत्खनन. त्यामुळे उद्‌भवलेली जमिनीची धूप आणि नापिकता.

राज्यातील नदी किनारे आणि सागर किनारे या ठिकाणी विनानियोजन होणारे इमारती बांधकाम सातत्याने वाढत आहे. त्यामुळे निसर्ग सौंदर्य नष्ट होऊन हवा आणि पाणी यांचे प्रदूषण वाढत आहे. शहरातील काही सुंदर इमारती पाडून त्या ठिकाणी हॉटेल्स, सदनिका, दुकान गाळे यांचे बांधकाम करण्यात आले आहे. नवीन बांधकाम करताना

वास्तू शास्त्राचे नियम पाळले जात नाहीत. तसेच गोव्याची स्वतःची अशी इमारत बांधकामाची खास पुरातन शैली नष्ट होत आहे. राज्यातील नागरी वस्तीमध्ये निवासी आणि व्यावसायिक प्रयोजनाचे उंची मनोरे उभारताना आजूबाजूच्या वस्तीचा विचार होत नाही. नदी आणि समुद्र किनाऱ्यानजीक बांधलेल्या इमारती चुकीच्या पध्दतीने बांधल्या असल्याने सदर इमारती अनेक प्रश्न निर्माण करतात. याचे उदाहरण म्हणजे पणजी येथील मांडवी नदीच्या दोन्ही किनाऱ्यानजीक बांधलेल्या इमारती ह्या एका बाजूने निसर्ग सौंदर्य नष्ट करीत आहेत. आणि त्यापेक्षा वाईट म्हणजे प्रदूषण निर्माण करीत आहेत. डोंगर उतारावर बेछूट वृक्षतोड करून त्या ठिकाणी हॉटेल्स आणि निवासी इमारती बांधल्या जात आहेत. त्यामुळे त्या ठिकाणच्या जमिनीची बेसुमार धूप होत आहे.

पर्यटनाच्या हंगामात गोवा राज्यात सर्वत्र एकच गर्दी होत असते. त्यामुळे ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात निर्माण होते. नजिकच्या राज्यातून येणारे पर्यटक पर्यटनासाठी येताना आपली वाहने आणत असतात. यामुळे रस्त्याच्या क्षमतेपेक्षा जास्त वाहने रस्त्यावर येतात. त्यामुळे आपोआपच हवा प्रदूषण निर्माण होते. ऐतिहासिक वास्तूंच्या आजूबाजूने होणारे इमारती बांधकाम त्या वास्तूचे सौंदर्य नष्ट करीत आहेत आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे या वाढणाऱ्या वस्तीमधून गोव्याची मूळ संस्कृती नष्ट पावत आहे. पॉल रॉटलेग्ज यांनी 2000 मध्ये असे निदर्शनास आणून दिले की गोव्याच्या पर्यटन विकास गोव्याच्या किनारपट्टीच्या पर्यावरणाचा ऱ्हास करीत आहे. त्यांच्या मते पर्यावरणाचा ऱ्हास पुढील कारणांनी होत आहे.

1. किनारपट्टीवरील वाळूच्या टेकडयाचा नाश होणे.
2. वृक्षाच्छादन नष्ट होणे
3. भूगर्भ पाण्याची पातळी 500 मी. पेक्षा जास्त खालावणे.
4. किनारपट्टीच्या प्रदूषणात वाढ उदा. प्लॅस्टीक बाटल्या, सांडपाणी समुद्रात टाकणे इत्यादी.
5. सागर किनाऱ्यावरची जैविक विविधता नष्ट होणे.

या खेरीज पॉल रॉटलेग्ज यानी आपल्या अभ्यासातून असे निदर्शनास आणून दिले आहे की गोव्यात येणाऱ्या ''करारबध्द पर्यटकांमुळे'' (Charter Tourist) अनेक सांस्कृतिक समस्या निर्माण झाल्या आहेत. कारण या प्रकारचे पर्यटक कमी खर्चात विदेशी पर्यटन करणारे पर्यटक असतात. यामध्ये सहभागी असलेले बहुतेक पर्यटक हे युरोप खंडातील वाहयात प्रवृत्तीचे, वर्णभेदी, पराकोटीचे राष्ट्र वेडे, मद्यपी आणि हिंसक प्रवृत्तीचे लोक असतात. या पर्यटकांच्या माध्यमातून गोव्यात अनेक सांस्कृतिक उपद्रव मूल्ये येत आहेत. यामध्ये नग्नावस्था, रेव्हपार्टी, वेश्या व्यवसाय, अंमली पदार्थांचे सेवन इत्यादी अनेक अनिष्ट गोष्टी स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण करतात. तसेच याच कारणांमुळे स्थानिक जनता आणि विदेशी पर्यटक यांच्यात वारंवार संघर्षात्मक व तणावपूर्ण वातावरण निर्माण होते. एकूणच गोव्यातील पर्यटन विकासातून सामाजिक स्वास्थ बिघडत आहे.

गोवा राज्याच्या ''विलासी पर्यटन'' विषयक

अभ्यास मेनन यांनी केला (1998) आहे. त्यांच्या असे निदर्शनास आले आहे की गोवा राज्याच्या पर्यटनात फार मोठया प्रमाणात वेश्या व्यवसाय अंतर्भूत आहे. या व्यवसायात असलेल्या महिला कर्नाटक, आंध्र आणि महाराष्ट्र या निकटच्या राज्यातील असून त्यापैकी बऱ्याच महिला अल्पवयीन मुली आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा मोहिनी गिरी यांनी 1997 ला दिलेल्या गोवा भेटीच्यावेळी सुध्दा गोव्यामध्ये बाल वेश्या व्यवसाय फोफावला आहे असे जाहीर केले आहे.

गोवा राज्याच्या पर्यटन विकासातून निर्माण झालेल्या पर्यावरणविषयक समस्या एवढया गंभीर स्वरूपाच्या आहेत की 2002 पासूनच्या प्रत्येक विधानसभा निवडणूकीत हा प्रश्न ऐरणीवर येत असतो. त्याचा परिणाम म्हणून कलंगुट मतदार संघात (ता. बारदेझ) हा प्रश्न तेथील लोकप्रतिनिधीना युध्द पातळीवर सोडवावा लागला. या संदर्भात महत्त्वाच्या समस्या पुढील प्रमाणे आहेत.

1. सांडपाण्याची समस्या

2. भूजल साठ्याचे संधारण

3. ग्रामीण भागातील नागरी सुविधा पुरवठ्यातील सातत्य.

यामध्ये पाणी टंचाई, वीज टंचाई या समस्या असून पर्यटन हंगामात हॉटेल व्यवसायास अतिरिक्त प्रमाणात या सेवा पुरविल्यामुळे स्थानिकांना या सेवा मर्यादित प्राप्त होतात.

**2. आर्थिक समस्या**

रॉटलेग्ज यांच्या विवेचनात गोवा राज्यातील पर्यटन विकासामुळे निर्माण झालेला आर्थिक समस्यांचा ऊहापोह करण्यात आला आहे. त्यांच्या मते, गोव्यातील पर्यटन विकासामुळे उद्‌भवलेली भाववाढ आणि पारंपारिक व्यवसायाचे विस्थापन या दोन प्रमुख समस्या आहेत.

भाववाढीच्या संदर्भात सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे राज्यातील प्रमुख अन्न पदार्थांच्या किंमतीतील वाढ एवढी जास्त आहे की स्थानिक आणि विशेषतः गरीब जनतेला ती न परवडण्यासारखी आहे. या शिवाय राज्यातील जमिनीचे भाव पराकोटीचे वाढले आहेत. पर्यटन विकासाचा परिणाम राज्यातील हॉटेल व्यवसाय विकसित होण्यावर झाला आहे. हॉटेल सुरू करण्यासाठी हॉटेल मालक बाजार भावापेक्षा जमिनीला फार मोठी किंमत देऊ करीत असतात आणि या मोहाला बळी पडून स्थानिक लहान शेतकरी हळू हळू भूमिहीन होऊ लागले आहेत. सरतेशेवटी त्याना सीमांत वेतनावर काम करून जीवन व्यतित करावे लागत आहे.

पर्यटन विकासामुळे राज्यातील ग्रामीण भागातील साधन सामग्रीचा वापर पर्यटकांना सेवा पुरविण्यासाठी होतो. उदाहरणार्थ, गावातील पर्यटन व्यावसायिक गावातील विहिरीपेक्षा खोल विहिरी खोदून पाण्याचा वापर करतात. अशा प्रकारे पाण्याचा उपसा वाढल्याने गावातील विहिरींचे पाणी संपून त्या कोरड्या होतात. त्यामुळे स्थानिकांना पाण्याचा तुटवडा भासतो.

गोव्यातील पर्यटन विकासामुळे तेथील पारंपारिक व्यवसायाचा ऱ्हास होत चालला आहे. मासेमारी, ताडी काढणे हे प्रमुख पारंपारिक उद्योग होत. पर्यटन विकासापूर्वी हे पारंपारिक व्यवसाय लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. परंतु अलीकडे पर्यटन विकासामुळे या व्यवसायातील संसाधने पर्यटनाशी संबंधित उद्योगामध्ये वापरली गेल्याने हे उद्योग अडचणीत सापडले आहेत. गोव्यातील काही सागर किनाऱ्यांचा वापर पंचतारांकित हॉटेलसाठी केल्याने त्या ठिकाणांचा वापर करण्यास इतरांना बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिकांना पारंपारिक मासेमारी व मासे वाळविण्यासाठी करता येत नाही. शिवाय नारळ, सुपारी, काजू आणि ताडी यांच्या उत्पादनासाठीही करता येत नाही. त्यामुळे हे पारंपारिक व्यवसाय बंद होत आहेत. पर्यटन विकासाचा प्रतिकूल परिणाम गोव्यातील पारंपारिक शेती व्यवसायावरही झाला आहे. जमिनीची किंमत वाढल्यामुळे येथील शेतकरी शेतीत राबण्याऐवजी जमिनीची विक्री करणे अधिक पसंत करतो.

### 3. पर्यटकांच्या समस्या

राज्यातील पर्यटकांचा पर्यटन विकासाच्या संदर्भात अभ्यास करण्याचे प्रयत्न अनेक अभ्यासक व्यक्ती आणि स्वयंसेवी संस्था यांनी केले आहेत. त्यासाठी पर्यटकांचे राज्यातील वस्तू व सेवा यांच्या विषयी अभिप्राय आणि सूचना याची माहिती संकलीत करून संशोधन अहवाल तयार केले आहेत. यापैकी निवडक अभ्यासांच्या सहाय्याने पर्यटकांच्या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे नमूद करता येतील.

1. स्थानिक लोकांचे सहकार्य

2. अन्न पदार्थांच्या किंमती

3. पर्यटन स्थळांच्या ठिकाणची स्वच्छता

पेरीना इलाव्हीया (2001) यानी आपल्या संशोधनातून ''गोव्यातील स्थानिकांचे पर्यटकांना सहकार्य'' याविषयी असे मत नमूद केले आहे की स्थानिक जनतेचे पर्यटकांना सहकार्य पूर्णपणे चांगले आहे. परंतु परिवहन व्यावसायिक मात्र याला अपवाद आहेत. यामध्ये प्रामुख्याने प्रवासी वाहतूक करणारे टॅक्सी ड्रायव्हर, रिक्षा ड्रायव्हर आणि पायलट (प्रवास वाहतूक करणारे मोटर सायकल ड्रायव्हर) यांच्याकडून पर्यटकांची फसवणूक व गैरवर्तन होत आहे. काही वेळा यांच्याकडून पर्यटकांना लुबाडले जाते. गोवा राज्यातील अन्न पदार्थांच्या किंमतीच्या तुलनेने पर्यटन स्थळानजीक असलेल्या पुरवठादाराकडून अधिक किंमती आकारल्या जातात. प्रामुख्याने सागरकिनारे या पर्यटन स्थळा नजीकच्या किंमती अवास्तव असतात. पर्यटन स्थळांच्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारे टाकावू पदार्थ कचरा, प्लॅस्टिक बाटल्या यांचे ढिगारे रस्त्याच्या बाजूने टाकलेले आहेत. तसेच हे टाकावू पदार्थ जाळून नष्ट केले जात आहेत. त्यामुळे त्या ठिकाणांचे प्रदूषण वाढत आहे. याखेरीज पर्यटकाना नेहमी अनुभवाला येणाऱ्या सर्वसाधारण समस्या जगमोहन सिंग यांनी आपल्या संशोधनातून स्पष्ट केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

1. पर्यटन स्थळाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची गैरसोय.

2. सागर किनाऱ्याच्या ठिकाणी प्रसाधनांची

कमतरता.

3. रिक्षा टॅक्सी यांच्याकडून आकारण्यात येणारे अतिरिक्त भाडे.

4. रस्त्यांची वाईट अवस्था.

5. खाजगी बस वाहतूकीतील ध्वनी प्रदूषण

6. परिवहनाचे नियम पाळले जात नाहीत.

7. विदेशी पर्यटकांनी गोव्यातील पर्यटन कृत्रिम नसावे ते नैसर्गिक असावे असे सुचविले आहे.

**निष्कर्ष :**

पर्यटन विकासाबरोबर पर्यटकांना आवश्यक तेवढया आंतरिक सुविधा विकसित झाल्या नाहीत तर पाणी प्रदूषण, हवा प्रदूषण, ध्वनी प्रदूषण या पर्यावरणात्मक समस्या निर्माण होतात. तसेच सांस्कृतिक व नैतिक मूल्यांचे अधःपतन आणि पारंपारिक व्यवसायांचे विस्थापन होते.

**संदर्भ :**


1. Agarwal, A. P. 2001 Guide to Goa, New Delhi : Nest and Wings,
2. Angle, Prabhakar S. 2001 Goa An Economic Undate, Mumbai : Akshar Pratiroop Pvt.Ltd.
3. Fernandes, Joaquim 2002 Proper Tourism Management is a Key Issue, Navhind Times, 25 May, P. 6
4. Goa Tourism Policy 2002 Department of Tourism, Government of Goa P. P. 1.7
5. Hunter, Colin and Green Howard 1995 Tourism and Environment, London Routledge,II New Fetter Lane.
6. III avia, Perin 2000 Taxis taking Goa tourism for a Rough Ride.Gomantak Times Weekender, 21 January, P. 17

# टाटांची कामगिरी : एक पुनरावलोकन

वसुधा जोशी

**प्रस्तावना**

भारतातील कारखानदारीला आता पावणे दोन शतकांची परंपरा लाभली आहे. देशाच्या आर्थिक नियोजनामध्ये व प्रगतीमध्ये या क्षेत्राचा मोठा वाटा आहे. ही कारखानदारी कशी घडत गेली, ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतीय व्यवसायांची घडी कशी बसली हा इतिहास महत्त्वाचा आहे.

मात्र आपल्या इतिहास लेखनात हा तसा दुर्लक्षित विषय राहिलेला आहे. त्या मानाने विशिष्ट पेढ्या किंवा मोठी औद्योगिक घराणी यांच्या बद्दलचे चरित्रात्मक लेखन बऱ्याच प्रमाणावर उपलब्ध आहे. ते त्या त्या विषयाची संगतवार माहिती देते. मात्र हे लिखाण लिहवून घेतलेले आणि चरित्र वास्तू/चरित्र नायक यांची भलावण करणारे आहे. त्यात तत्कालीन परिस्थितीचे अपुरे प्रतिबिंब उमटलेले दिसते. हे लिखाण सामान्यत: असे दर्शविते की, अंगभूत गुण आणि मोठा दूरदर्शीपणा यांच्या बळावर चरित्र नायकांनी त्यांच्या पुढे असलेले अनेक प्रश्न सोडवले आणि आपल्या क्षेत्रात पथदर्शक असे काम केले. बाह्य परिस्थितीतील घटक व विशेषत: सरकारी धोरणे यांचे महत्त्व त्यात डावलण्यात येते.

या पद्धतीचे व्यष्टी (सूक्ष्मलक्षी–Micro) निवेदन आणि समष्टी (समग्रलक्षी–Macro) इतिहास यांची सांगड घालताना दोहोंमध्ये मोठेच अंतर शिल्लक राहते. भारतामध्ये भांडवलशाही कशी रूजली, उद्योजकतेची जडणघडण कशी झाली यांचा अभ्यास करताना हे अंतर त्रासदायक ठरते. ते कमी करण्याचा एक अल्पसा प्रयत्न या लेखात केला आहे. त्यासाठी

भारतीय कारखानदारीमध्ये अग्रस्थानी असलेल्या टाटा उद्योग समुहाची निवड केली आहे. लेखाची मांडणी याप्रमाणे : 1840 ते 1960 या 120 वर्षांच्या कालावधीमधील – त्यातही प्रामुख्याने स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत–टाटांच्या कामागिरीकडे प्रथम एक धावता दृष्टिक्षेप टाकला आहे. नंतर तत्कालीन अर्थ–राजकारणातील प्रमुख घटकांबद्दल विवेचन केले आहे. टाटांची वैशिष्टे आणि त्यांच्या यशाचे इंगित यांची चर्चा तिसऱ्या भागात केली आहे. समारोपात असे म्हटले आहे की, टाटांच्या वैशिष्ट्यांमुळे ब्रिटिश सरकारने त्यांना मदत केली आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनेही. त्यामुळे टाटांनी खूप मोठा पल्ला गाठला. स्वातंत्र्यानंतर हे असाधारण समीकरण जमले नाही आणि टाटा मागे पडले.

**टाटांच्या वाटचालीचा धावता आढावा : 1839 ते 1960**

रूसी लाला यांनी शैलीदारपणे दिलेल्या तपशिलांनुसार (लाला आर.एम., 1981) टाटा उद्योग समूहाच्या उभारणीमधील महत्त्वाच्या घटनांची माहिती याप्रमाणे:

जमशेदजी नसरवानजी टाटा यांचा जन्म 1839 मध्ये नवसारी येथे झाला. एलफिन्स्टन कॉलेज, मुंबई येथून पदवी मिळवल्यानंतर त्यांनी चीन व पूर्वेकडील इतर देश, युरोप यांच्याबरोबरच्या, प्रामुख्याने अफूच्या व्यापाराला सुरुवात केली. 1868 मध्ये त्यांनी एका खाजगी व्यापारी पेढीची स्थापना केली. जनरल नेपियरच्या नेतृत्वाखालील ॲबिसिनिया (आताचा इथिओपिया) येथील लष्करी मोहिमेला रसद पुरवण्याच्या कंत्राटातून या पेढीला खूप फायदा झाला. तिथून जमशेदजी टाटांनी कापड उद्योगात उडी घेतली. त्यासाठी त्यांनी मुंबईतील एक जुन्या तेल गिरणीचे कापड गिरणीत रूपांतर करून तिला ऊर्जितावस्थेत आणले. दोनच वर्षात ती विकून टाकून त्यांनी आणखी नफा मिळवला आणि 1874 मध्ये नागपूरला–कापूस उत्पादनात अग्रेसर असलेल्या विदर्भामध्ये एम्प्रेस मिलची स्थापना केली. मँचेस्टरच्या प्रगत गिरण्यांपेक्षाही वरचढ अशा रिंग स्पिंडल तंत्रज्ञानाचा वापर या गिरणीत करण्यात आला. 1886 मध्ये त्यांनी मुंबईत स्वदेशी मिलची उभारणी केली. त्यासाठी लोकांना सामान्य भाग (equity shares) विकून त्यांनी भांडवल गोळा केले. 1890 मध्ये त्यांनी जहाज वाहतूकीच्या क्षेत्रात पदार्पण केले.

या सुमारास युरोप, अमेरिकेला भेट देऊन तेथील कारखानदारीची प्रदर्शने बघण्याचा सपाटा जमशेदजी टाटांनी लावला. तेथील कोळसा खाणी आणि लोखंड बनवणारे कारखाने यांना त्यांनी भेटी दिल्या. तेव्हाच त्यांचा भारतात लोखंडाचा कारखाना उभारण्याचा बेत पक्का झाला. अमेरिकन व जर्मन तंत्रज्ञांना त्यांनी जमिनीचे सर्वेक्षण करून आपल्या कारखान्यासाठी योग्य ते ठिकाण शोधायला बोलावले. त्यांनी सुचवलेल्या चांदा, दुर्ग जिल्ह्यांमध्ये पाण्याची कमतरता होती. मयूरभंजच्या महाराजांनी त्यांना बिहारमध्ये बोलवले आणि कारखाना उभारण्यासाठी सवलतीही दिल्या. त्यानुसार बिहारमधील साकची (आताचे जमशेदपूर) या गावी लोखंड कारखाना उभा करण्याचे निश्चित करण्यात आले.

हा एक मोठा आणि अतिशय महत्त्वाचा

निर्णय होता. कापड गिरण्या चालवण्यामध्ये आता जम बसल्यामुळे टाटांना अजून गिरण्या उघडणे सोपे गेले असते किंवा गिरण्यांमधील यंत्र साम्रगीच्या उत्पादनाकडे ते वळले असते तर तेही सयुक्तिक ठरले असते. त्याऐवजी त्यांनी लोखंड, पोलाद उत्पादनासारख्या एका अवजड व पायाभूत उद्योगाची मुहुर्तमेढ रोवली. देशाच्या औद्योगिकरणाचा पाया या उद्योगातून घातला गेला.

त्या बरोबरच म्हणजेच 1818 पासून त्यांनी विज्ञानविषयक उच्च शिक्षण देणाऱ्या व संशोधन करणाऱ्या एखाद्या संस्थेच्या स्थापनेसाठी ब्रिटिश सरकारकडे पाठपुरावा करायला सुरुवात केली. शास्त्रीय शिक्षणाकडे भारतीय विद्यार्थी वळणार नाहीत आणि जे पुढे सरसावतील त्यांना नोकरी मिळणार नाही असे म्हणून व्हाइसरॉय लॉर्ड कर्झनने या कल्पनेला विरोध केला. मात्र या प्रकल्पाचा चार पंचमांश खर्च टाटा ट्रस्टने उचलण्याचे मान्य केल्यानंतर 1909 मध्ये बंगलोरला इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सची स्थापना झाली.

ही तयारी होत असतानाच 1904 साली वयाच्या पासष्टाव्या वर्षी जमशेदजी टाटांचे निधन झाले. त्यांचे पुत्र दोराब टाटा यांनी 1907 मध्ये टिस्कोची स्थापना केली. त्यासाठी परदेशातील भांडवल बाजाराची परिस्थिती अनुकूल नसल्यामुळे त्यांनी देशातून 2.32 कोटी रूपयांचे भाग भांडवल उभे केले. 1916 सालापासून कारखान्यात नियमित उत्पादनाला सुरुवात झाली. त्यासाठी ब्रिटिश सरकारने कच्चे लोखंड, त्याची वाहतूक या खर्चांमध्ये काही सवलत दिली.

पहिल्या महायुद्धात 1500 मैल लांबीचे रूळ मेसोपोटेमियाला (आताचा इराक) निर्यात करण्यात आले. लगेच लोखंडाचे उत्पादन पाच पटीने वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र युद्धोत्तर काळात भाववाढ झाली होती आणि कामगार लढाऊ बनत चालले होते. त्यातच जपानी लोखंडाचे भाव तेथील मोठ्या भूंकपामुळे पडले होते. आणि आयात स्वस्त झाली होती. जपानी लोखंड मोठ्या प्रमाणावर देशात येऊ लागले होते. त्यामुळे टिस्कोपुढे अडचणींचा डोंगर उभा राहिला. त्या वेळी काँग्रेस-विशेषत: मोतिलाल नेहरू- कंपनीच्या मदतीला धावून आले.काँग्रेसच्या प्रयत्नाने ब्रिटिश शासनाने लोखंडाच्या आयातीवर संरक्षणात्मक कर बसवला. त्याचप्रमाणे 1924 ते 1927 या चार वर्षांसाठी रेल्वे खात्यासाठी लोखंडी रूळांसाठी मोठी मागणी नोंदवली.

या नंतर कंपनीचे काम सुरळीतपणे सुरू झाले आणि स्थापित उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर होऊ लागला. 1930 सालच्या जागतिक महामंदीमध्ये युरोप-अमेरिकेत अनेक कामगार बेकार झाले. पण कंपनीने कामगार कपात केली नाही. मंदीतून बाहेर पडल्यावर 1934 सालापासून कंपनीने कामगारांना नफ्यावर आधारित बोनस द्यायला सुरूवात केली.

1938 मध्ये जेआरडी टाटांनी टिस्कोचे अध्यक्षपद स्वीकारले. दुसऱ्या महायुद्धात कंपनीला भरपूर काम मिळाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आर्थिक धोरणे काय असावीत याचे दिग्दर्शन करणारा बॉम्बे प्लॅन मुंबईतील उद्योगपतींनी तयार केला. त्यांच्यात टाटांच्या चार संचालकांचा समावेश होता. या प्लॅनने सरकारने करायच्या आर्थिक नियोजनाला विरोध केला.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून सार्वजनिक पायाभूत उद्योगांमध्ये आणि अर्थव्यवस्थेतील मोक्याच्या जागी पाय रोवले. त्यामुळे टिस्कोच्या विस्तारावर मर्यादा आली, पण टेल्कोसारख्या कंपनीमुळे जमशेदपूरचा विस्तार झाला. टेल्कोने जर्मनीच्या डेमलर-बेंझ कंपनीबरोबर तांत्रिक सहकार्याचा जो करार केला त्याला सरकारने लगेच हिरवा कंदील दाखवला. 1948 मध्ये एअर इंडिया इंटरनॅशनल हा देशातील पहिला सार्वजनिक-खाजगी क्षेत्रांचा पहिला संयुक्त प्रकल्प विमान वाहतूकीच्या क्षेत्रात करण्यात आला. त्यासाठी सरकारने 49%, टाटांनी 20% व इतरांनी 31% असे भांडवल पुरवले. मात्र नवीन उद्योगाची सुरुवात करण्यासाठी जे सरकारी परवाने लागत ते मिळतील तसे घेऊन जागा अडवून बिर्लांनी ज्या प्रमाणे त्यांच्या उद्योगसमूहाचा विस्तार केला तसे टाटांनी केले नाही. तरी 1980 पर्यंत टाटा उद्योगसमूह देशातील सर्वात मोठा समूह होता.

टाटा उद्योगसमूहात अनेक कंपन्यांचा समावेश होतो. त्या वेगवेगळ्या क्षेत्रात काम करतात. मात्र त्यांच्या स्थापनेमागे काही सूत्र दिसते. वर उल्लेख केल्याप्रमाणे कापड आणि लोखंड उत्पादन यांच्यात काही संबंध नसला तरी पुढे लोखंड-पोलाद-टिनचे पत्रे, रेल्वेची इंजिने व ट्रक्स, मुंबईतील कापड गिरण्यांसाठी वीज निर्मिती, मुंबईतील मालकीच्या जमिनीतून हॉटेल उद्योग असा विस्तार झाला. जेआरडी टाटांनी रसायने, इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रांमध्ये पदार्पण केले.

टाटा सन्स या खाजगी कंपनीमार्फत या सर्व कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यात येते. ही कंपनी 1917 साली अस्तित्वात आली. त्या आधी 1887 सालापासून टाटा अँड सन्स या भागीदारी पेढीमार्फत नियंत्रण होई. जमशेदजी टाटा, दोराब आणि रतन हे त्यांचे दोन पुत्र या पेढीत भागीदार होते. टाटा सन्सने 1970 सालापर्यंत म्हणजे व्यवस्थापकीय अभिकर्ता पद्धत रद्द होईपर्यंत समूहातील इतर कंपन्यांवर घट्ट नियंत्रण राखले. त्यानंतर ते थोडे सौम्य झाले व कंपन्यांची स्वायत्तता वाढली. मात्र टाटा सन्सचे नियंत्रण पक्केच राहिले.

एक द्रष्टा, प्रामाणिक, आधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाच्या कार्य पद्धती याचा अवलंब करणारा उद्योग समूह म्हणून टाटांची देशात मोठी उजळ प्रतिमा आहे. प्रतिमा निर्मितीकडे इतरांपेक्षा खूप आधीपासून पद्धतशीर लक्ष पुरवून आणि कामगारांना इतर उद्योगांच्या मानाने अनेक सोयीसुविधा खूप आधीपासून पुरवून ही प्रतिमा निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, 1886 सालीच एम्प्रेस मिलमधील कामगारांसाठी पेन्शन फंड चालू करण्यात आला. 1895 पासून कामगारांना अपघात विम्याचे संरक्षण देण्यात आले. गंमतीची गोष्ट म्हणजे अंबालाल साराभाई एंटरप्राइझेसचे जनसंपर्क खातेही साराभाईबद्दल हाच दावा करते. साराभाईंनी कामगारांसाठी इस्पितळे व पाळणा घर उभारली आणि कामगार संघटनेला मान्यता दिली. कायदा, इतर उद्योजकांची पद्धत, जनमताचा रेटा यांच्या आधीच हे त्यांनी केले असे या खात्याचे म्हणणे आहे. (शहा अमृता, 2007). जमशेदपूरमध्ये कामगारांना कोणत्या सुविधा पुरवल्या पाहिजेत हे बिएट्रिस आणि सिडनी वेब यांच्याशी सल्लामसलत करून ठरवण्यात आले. त्यांनी लंडन

विद्यापीठातील काही प्राध्यापकांसमवेत या बाबतीत ज्या शिफारसी केल्या त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी टाटांनी सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीची मदत घेतली. सोसायटीतर्फे ठक्करबाप्पांनी जमशेदपूरमध्ये प्राथमिक शाळा, खेळासाठी मैदाने आणि क्लब्ज, बगीचे, स्वस्त धान्य दुकाने, सहकारी पतसंस्था इ. स्थापन केल्या.

टिस्कोमधील कामगार संघटनेच्या स्थापनेशी सी.एफ. अँड्रूज, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस यांची नावे जोडली गेली आहेत. त्यांना विरोध करून मानेक होमी यांनी वेगळी संघटना स्थापन केली व 1928 मध्ये व्यवस्थापनाच्या विरोधात तब्बल आठ महिने संप केला. व्यवस्थापनाबरोबर वाटाघाटी करून कामाला सुरुवात करण्याचा सल्ला त्यांना नेताजींनी दिला. टाटांनी कामगारांना व्यवस्थितपणे हाताळले. त्यांचा कामगारविषयक दृष्टिकोन एका चौकटीतील पण सामान्यत: उदार राहिला.

**तत्कालीन घडामोडींचा विस्तीर्ण पट**

या कालावधीतील ठळक आर्थिक व राजकीय घटनांच्या पटावर वर उल्लेखलेल्या घटना कशा मांडाव्यात ? त्यासाठी प्रथम तत्कालीन परिस्थितीतील महत्त्वाचे घटक लक्षात घ्यावे लागतील (मार्कोविट्झ, 2008) ते असे होते :

**1) ब्रिटिश शासन :**

1857 सालापर्यंत ईस्ट इंडिया कंपनीच्या हितसंबंधांची पाठराखण करणाऱ्या ब्रिटिशांनी यानंतर प्रत्यक्षपणे राज्यशकट हाकण्यास सुरुवात केली. त्यात ब्रिटिश व्यवसायांना शक्य ती मदत करणे हा हेतू होताच. पण गोऱ्या माणसाच्या ओझ्यात त्याहूनही इतर हेतू होते.

**2) ब्रिटिश व्यवसाय :**

ताग उद्योग, चहा,कॉफीचे मळे, रेल्वे वाहतूक, वित्त, विदेशी व्यापार ही सर्व महत्त्वाची क्षेत्रे ब्रिटिशांच्या हातात होती. व्यापार आणि उद्योग यांच्यातील फरक त्यांना उमगला होता. तसेच व्यवसाय करताना व्यक्ती, कुटुंब आणि व्यवसाय यांच्यात ते फरक करीत. त्यांच्या व्यवसायाचे उद्दिष्ट जास्तीत जास्त नफा मिळवणे हे होते. त्यांना राज्यसंस्थेच्या जवळ जाण्याची व सवलती मिळवण्याची संधी उपलब्ध होती आणि इंग्लंड व इतर वसाहतिक देश यांच्यामध्ये जो वस्तूंचा, भांडवलाचा विनिमय चाले त्यात भारतातील ब्रिटिश व्यवसाय भाग घेत.

**3) एतद्देशीय व्यवसाय :**

हे व्यापार, सावकारी व सट्टेबाजी यात प्रामुख्याने गुंतलेले असत. फक्त कापड उद्योगात त्यांनी आघाडी घेतली होती. उद्योगाच्या व कारखानदारीच्या इतर संधी उपलब्ध नसल्यामुळे सट्टेबाजीत ते पुढे होते. त्यांचे आपापसात जवळचे संबंध होते पण ते कुटुंब, जात आणि समाज यांच्या आधारावर बेतलेले होते. याच आधारावर देशातील निरनिराळ्या भागातील बाजारपेठांची माहिती आणि पत,पैसा यांची देवाणघेवाण त्यांच्यामध्ये चाले. त्यासाठी प्रत्येक समूहामध्ये जाळी(नेटवर्क्स) असत. ग्रामीण भागातील नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करणे त्यांना सुकर होते.

संयुक्त कुटुंब आणि व्यवसाय यांचे निकटचे संबंध असत. कुटुंबातील लोकांची सोय लावण्यासाठी नवीन व्यवसाय सुरू केले जात.

विवाह संबंधांच्या मागे तेच गणित असे. कुटुंबाची अब्रू आणि बाजारातील पत यांना एतद्देशीय व्यवसाय अतिशय महत्त्व देत. त्यामानाने त्यांना नफा गौण वाटे. त्यांच्याकडे इंग्रजी शिक्षणाचा, आंतरराष्ट्रीय व्यापारातील प्रमुख प्रवाहांची माहिती यांचा अभाव होता. देशांतर्गत बाजारपेठांमध्येही इतकी अनिश्चितता होती की जास्तीत जास्त नफा मिळवणे या उद्दिष्टाला फारसा त्यांच्या लेखी अर्थ नव्हता.

**4) स्वातंत्र्यलढ्याची चळवळ आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :**

1885 मध्ये जेव्हा काँग्रेसची स्थापना झाली तेव्हा भारतातील व्यावसायिक वर्ग बाल्यावस्थेत होता. 1905 सालापर्यंत काँग्रेसचे आर्थिक प्रश्नांकडे लक्ष गेले नव्हते. त्या नंतर मात्र स्वदेशी चळवळीमुळे आर्थिक मागण्या पुढे येऊ लागल्या. पहिल्या महायुद्धानंतर भारतीय व्यावसायिकांची कार्यकक्षा वाढली. त्यांच्या वाढत्या आकांक्षांना ब्रिटिश सरकारकडून प्रतिसाद मिळत नाही हे पाहून ते काँग्रेसकडे वळले.

या नंतर देशाच्या राजकारणात महात्मा गांधीचा उदय झाला. त्यांना गुजराती, जैन व्यावसायिकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. दक्षिण आफ्रिकेत वांशिक समानतेसाठी गांधीजींनी एक मोहीम उघडली. तिला सर रतन टाटांनी मदत केली. गांधीजींच्या तत्वज्ञानाचे आणि ऋषितुल्य जीवनसरणीचे हिंदू मारवाडी आणि जैन व्यावसायिकांना आकर्षण वाटले. गांधीजींनी त्यांच्याकडून पैसे घेऊन टिळक स्वराज्य फंड गोळा केला आणि काँग्रेसला पैशाचा पक्का आधार मिळवून दिला. गांधीजींबरोबर वल्लभभाई पटेलांनीही व्यवसायांबरोबरच्या संबंधांची नीट बांधणी केली. अहमदाबादमध्ये कस्तुरचंद लालभाई, अंबालाल साराभाई, मुंबईत जमनालाल बजाज आणि कलकत्त्यात घनश्यामदास बिर्ला यांच्याशी गांधीजींची जवळीक निर्माण झाली. मात्र काँग्रेसला उघडपणे पाठिंबा दिल्यास ब्रिटिशांची मर्जी जाईल आणि व्यवसायावर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल अशी सर्वांना धास्ती होती. टाटा गांधीजी आणि काँग्रेस यांच्यापासून फटकून वागले. 1942 च्या चले जाव चळवळीनंतरच त्यांनी स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा दिला.

काँग्रेसलाही व्यावसायिकांबरोबर संबंध जोडताना लाभ-हानीचा विचार करणे आवश्यक होते. 1930 पर्यंत त्यांच्यापेक्षा जमीनदार आणि राजेरजवाडे यांच्याकडे जास्त पैसा होता. त्यामुळे फक्त पैशासाठी त्यांच्याबरोबर तातडीने संबंध जोडण्याची गरज नव्हती. शिवाय मोठ्या व्यावसायिकांना बरोबर घेतल्यास छोटे व्यवसायिक, व्यापारी नाराज होतील आणि मुख्य म्हणजे कामगार वर्ग दूर जाईल ही भीती होती.

कामगारांच्या प्रश्नावरून काँग्रेस आणि बडे उद्योगपती यांच्यात मोठे वादंग निर्माण झाले. 1934 सालापासून कामगारांचा लढा उभारून तो स्वातंत्र्य चळवळीशी जोडून घेण्यासाठी कामगार नेते प्रयत्न करत होते. त्यांना सहानुभूती असणारा एक वजनदार गट काँग्रेसमध्ये होता. 1935 पासून कामगार चळवळ लढाऊ बनत चालली होती.

गांधीजींचा या बाबतीत वेगळा विचार होता. उद्योगधंद्यांनी समाजाचे विश्वस्त म्हणून काम

करावे, दान धर्म करावा, सामाजिक सुधारणांच्या चळवळी आणि खादी यांना उत्तेजन द्यावे, मग ममताळू वडिलधारे म्हणून कामगार त्यांना मान देतील अशी त्यांची कल्पना होती.

1937 मध्ये प्रांतिक स्वयंशासनासाठी काँग्रेसने निवडणूका लढवल्या आणि सत्ता प्रांतांमध्ये काँग्रेसचे सरकार स्थापन झाले. या वेळी मंदीमुळे आणि शेतसारा घटल्यामुळे प्रांतिक सरकारांच्या खजिन्यात खडखडाट होता. गांधीजींच्या आग्रहामुळे दारूबंदी करून महसूलाच्या हुकमी भागावर पाणी सोडणे आवश्यक होते. राज्य चालवण्याच्या या अनुभवातून काँग्रेसला काही व्यावहारिक सत्ये शिकता आली आणि यापुढे काँग्रेस उद्योगांना धार्जिणी बनली. पंडित नेहरूंसह सर्व काँग्रेस नेत्यांचे कामगारांना वेसण घालण्याबाबत एकमत झाले. यातून काँग्रेस पक्ष आणि मोठे भांडवलदार यांच्यात टिकाऊ संबंध निर्माण झाले. त्यात टाटांपेक्षा इतर उद्योगांनी बाजी मारली.

**टाटांची वैशिष्ट्ये :**

ब्रिटिशांचे भारतीय व्यावसायिकांबद्दल चांगले मत नव्हते. त्यांना ते लोभी बनिया म्हणत. त्यांच्या तुलनेमध्ये फक्त टाटाच योग्य मार्गाने कमाल नफा मिळवण्यासाठी व्यवसाय करणारे आहेत असा त्यांचा समज होता. कारखानदारीत, त्यातही पायाभूत उद्योगात शिरण्याचे धाडस दाखवणारे, पाश्चिमात्य जग आणि मूल्ये यांच्याशी ओळख असणारे, नव्या तंत्रज्ञानाचे महत्त्व ओळखणारे टाटा त्यांना स्वीकारार्ह वाटत होते. ते फक्त खरेदी-विक्री आणि सट्टा यांच्या मागे नाहीत ही ब्रिटिशांना मोठी गोष्ट वाटत होती. टाटांनी मदत करण्यामुळे आपण न्याय्य वर्तनाच्या बाजूने वजन पारड्यात टाकत आहोत अशी ब्रिटिशांची धारणा होती.

टाटांनी पेढी/व्यवसाय आणि कुटुंब यांच्यात फरक करून कुटुंबाबाहेरच्या व्यक्तींना वरिष्ठ पदांवर नेमले होते. जेआरडी टाटांनी त्यावर विशेष भर दिला. इतर भारतीय व्यवसायांच्या तुलनेत आधीपासून आणि मोठ्या प्रमाणावर त्यांनी भांडवल बाजारातून पैसा उभारला होता. त्यामुळे त्यांच्या कंपन्यांचे नियंत्रण टाटांकडे असले तरी कंपन्यांची मालकी इतरांकडे होती. 1914 सालापासून निवृत्त सनदी अधिकाऱ्यांना वरिष्ठ व्यवस्थापक/संचालक म्हणून त्यांनी नेमले होते. जे एन टाटा एन्डावमेंट फंडातून परदेशी शिकायला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येई. दर पाच भारतीय सनदी अधिकाऱ्यांमध्ये एकाला ती मिळालेली असायची. सर आर्देशिर वकील हे त्यातील पहिले अधिकारी होते. या एका घटकामुळे ब्रिटिश राज्यकर्ते आणि भारतीय व्यावसायिक यांच्यातील वांशिक दरीचा टाटांना फारसा त्रास झाला नाही.

आपल्या कारखान्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना टाटांनी फक्त ब्रिटिशांचा कित्ता गिरवला नाही. टिस्कोमध्ये मोठ्या पगारावर अमेरिकन आणि जर्मन तंत्रज्ञ नेमण्यात आले होते. एम्प्रेस मिलमध्ये त्यांनी जे अद्ययावत रिंग स्पिंडल तंत्रज्ञान वापरले ते मँचेस्टरच्या गिरण्यांमध्येही वापरण्यात आले नव्हते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ची स्थापना बंगलोरला करण्याची शिफारस

प्रा. विल्यम रॅम्से (पुढे रसायनशास्त्रात नोबेल पारितोषिक विजेते) यांनी केली होती. दूरदृष्टीने जागतिक पातळीवरील आधुनिक तंत्रज्ञान तसेच बिनीचे शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि इतर विशेषज्ञ वापरण्यावर टाटांचा पहिल्यापासून कटाक्ष होता.

टाटांची झेप मोठी असल्यामुळे त्यांनी अनेक उद्योगांमध्ये प्रवेश केला. इतर भारतीय व्यावसायिक जागा मिळेल तिथे शिरकाव करायचे. त्यांच्या मानाने टाटांच्या विविधीकरणामध्ये बरीच सुसंगती होती. (याचा वर उल्लेख केला आहे.)

वरील वेगळ्या गुणधर्मांबरोबर काही खास भारतीय गुणधर्मही टाटा समूहात आढळून येतात. साराभाई, लालभाई त्यांच्याही उद्योगांसाठीचा व इतर उद्योगांप्रमाणेच प्राथमिक भांडवल संचय व्यापारातून-त्यातही प्रामुख्याने चीनबरोबरच्या अफूच्या व्यापारातून झाला. त्यांच्या समूहातील सर्व उद्योगांचे वित्त व्यवहार एका खाजगी पेढीमार्फत चालत. ती सर्व कंपन्यांचा नफा पाहिजे तिथे वळवे आणि वापरे. हे इतर भाग धारकांच्या संमतीवाचून होई. (त्यातही ठळकपणे दिसणारी गोष्ट म्हणजे टाटा कुटुंबाचे भाग भांडवलाच्या मालकीचे प्रमाण अत्यल्प होते.) कामगार, कामगार संघटना, त्यांचे पुढारी यांच्या बरोबरचे टाटांचे संबंध ममताळू वडिलकीच्या चौकटीतलेच राहिले. टाटांची माल विक्री व्यवस्था इतर उद्योगांप्रमाणेच होती.

तर वरील गुणधर्मांनी युक्त असा टाटा समूह पारतंत्र्याच्या काळात ब्रिटिश शासना बरोबर जवळचे संबंध ठेवून होता. त्याचा या शासनाबरोबर संघर्ष झाला नाही. उलट त्याने शासनाकडून पाहिजे त्या सवलती मिळवून आपली वृद्धी साधली.

ही अवघड कामगिरी साधायला त्यांना खूप खुबीने वागायला लागले. ब्रिटिशांनी सुरुवातीला टाटांना वेगवेगळ्या पद्धतीने पाठिंबा दिला. टिस्कोच्या उभारणीच्या वेळी कोळसा खाणींच्या वापराबद्दलचे नियम टाटांना सवलत मिळावी म्हणून लॉर्ड कर्झनने बदलले. सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड जॉन हॅमिल्टन यांनी जमशेदजी टाटांच्या मार्गातले नोकरशाहीचे अडथळे दूर केले. एवढेच नव्हे तर निरनिराळ्या सरकारी खात्यांकडून टिस्कोला मदत करण्यात आली. रेल्वे खात्याकडून टिस्कोचे काही उत्पादन उचलले जाईल याची हमी देण्यात आली.

या मदतीमागे युद्धकालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी लोखंडाची गरज भागवण्याची ब्रिटिश दूरदृष्टी होती. 1924 पासून इतर देशांकडून विशेषत: बेल्जियम आणि लक्झेंबर्ग-आयात होणाऱ्या लोखंडाला पर्याय म्हणून टिस्कोच्या लोखंडाचा खप होऊ लागला. कापड उद्योगामध्येही लँकेशायरमधील तलम आणि महाग कापडापेक्षा जपानी गिरण्यांच्या स्वस्त कापडाबरोबर टाटांची स्पर्धा होती.

1924 साली लोखंड उद्योग संरक्षण कायदा करण्यात आला. त्यानुसार वेगवेगळ्या देशातून भारतात आयात केल्या जाणाऱ्या लोखंडावर वेगवेगळे कर- इंग्लंडहून झालेल्या आयातीवर कमी, इतर देशांमधून केलेल्या लोखंडाच्या आयातीवर जास्त- बसवण्यात आले. 1932 च्या ओटावा करारानुसार साम्राज्यिक पसंती (imperial preference) च्या नावाखाली अशा वेगवेगळ्या करांची व्याप्ती वाढवण्यात आली. यासाठी काँग्रेसचे प्रयत्न कारणीभूत ठरले. काँग्रेसने टाटांना

नाही तर देशातील पायाभूत उद्योगाला मदत केली. ब्रिटिश लोखंड उद्योगाचा जागतिक बाजारपेठेतील हिस्सा कमी होत होता. अशा वेळी भारताच्या बाजारपेठेत इतर उत्पादकांची डाळ शिजू नये हा ब्रिटिशांचा टाटांना दिलेल्या सवलतींमागचा हेतू होता. असे ही म्हणायला वाव आहे की ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ब्रिटिश लोखंड उद्योग आणि टाटा यांच्यात मध्यस्थी करून एकोपा घडवून आणला. 1933 सालच्या लीस मोदी कायद्याने जपानी कापडाची आयात बंद केली. त्यासाठी लँकेशायरचे गिरणी मालक आणि टाटा यांनी संगनमत केले.

अशा रीतीने टाटांना एकीकडे ब्रिटिश शासनाची मोक्याची मदत झाली तर दुसरीकडे देशातील वाढते अर्थकारण, वाढत्या राष्ट्रवादी जाणीवा यांचाही लाभ झाला. त्यामुळे 1947 पर्यंत टिस्कोची भरभराट झाली. वास्तविक टिस्कोमध्ये नियमित उत्पादनाला जेव्हा सुरुवात झाली तेव्हा रेल्वे खात्याची लोखंडी रूळांची मागणी कमी झाली होती. या खात्याला पाहिजे तेवढे रेल्वेचे जाळे त्याने पूर्ण केले होते. इतर युरोपीय देशातील लोखंडाला पर्याय म्हणून टाटांचे लोखंड वापरले जाऊ लागले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात एकूण मागणी वाढल्यामुळे कंपनीचे उखळ पांढरे झाले.

टाटांना एवढी मदत करताना देशातील आपले नियंत्रण हळूहळू ढिले पडत असताना टाटा तटस्थ राहतील अशी ब्रिटिशांची धारणा असावी. त्याच वेळी त्यांचा कल काँग्रेसकडे आहे. असा किंतुही राज्यकर्त्यांच्या मनात असावा. म्हणून त्यांनी जमशेदजी टाटांना कुठलाही मान मरातब दिला नाही. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या दोघाही मुलांना सर हा किताब देण्यात आला.

जमशेदजी टाटा ब्रिटिशांना धार्जिणे असले तरी ते ताठपणे वागत. 1894 मध्ये सरकारने जेव्हा भारतात तयार झालेल्या कापडावर अबकारी प्रतिशुल्क लावले तेव्हा टाटांनी त्याला विरोध केला. काँग्रेसपासून टाटा लांब राहिले आणि स्वातंत्र्य लढ्याला त्यांनी अगदी मोजून मापून पाठिंबा दिला. मात्र लोकांचा समज ते राष्ट्रवादी आहेत असा होता. म्हणून 1907 मध्ये टिस्कोच्या भागांची जी विक्री झाली त्याला लोकांचा उदंड प्रतिसाद लाभला. त्यातही स्वदेशी चळवळीचा वाटा मोठा होता.

अशारीतीने ब्रिटिश शासन व उद्योगधंदे आणि काँग्रेस यांच्यामध्ये तारेवरची कसरत करून दोन्ही बाजूंनी फायदा उठवत टाटांच्या उद्योगांची वृद्धी झाली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सार्वजनिक क्षेत्राने अर्थव्यवस्थेतील मोक्याच्या जागा व्यापल्या. 1950, 1960 या दोन दशकांमध्ये बिर्ला समूहाची झपाट्याने वाढ झाली. त्या मानाने टाटा मागे पडले. पुढे 1963 ते 1978 या 15 वर्षांचा एक अभ्यास दर्शवतो की इतर उद्योजक समाजांच्या तुलनेमध्ये पारशी समाजच उतरणीला लागला. (शर्मा, 1985, पृ. 88) या पुढील काळात पुढे आलेल्या रिलायन्ससारख्या उद्योग समूहांनी शासनावर दबाव टाकून लाभ मिळवण्याचे वेगळेच व्यवसाय प्रतिमान अवलंबले.

**समारोप**

वर उल्लेखलेल्या कालखंडामध्ये परिस्थिती जन्म घटकांचा लाभ उठवून टाटा उद्योग समूहाने

नेत्रदीपक प्रगती केली. अर्थव्यवस्थेतील प्रवाहांचा परिणाम न होता टिस्कोने सतत प्रगती केली. विशिष्ट आर्थिक राजकीय घटकांचा विलक्षण मेळ घडवून आला आणि टाटा अग्रस्थानी पोहोचली. परिस्थिती बदलली आणि हे घटक नाहीसे झाले तेव्हा परत तशी प्रगती साधणे टाटांना शक्य झाले नाही.

**संदर्भ :**


1. Lala R. M. : The Creation of Wealth A Tata Story, India Bookhouse (IBH) Publishing company, Mumbai. 1981

   (या पुस्तकाचा प्रभाकर उर्ध्वरेषे यांनी मराठीत अनुवाद केला आहे.)
2. Markovils Claude : Merchants, Traders, Entreprenerous, Indian business in the colonial era, Permanent Black, Ranikhet. 2008
3. Shah Amrita : Vikram Sarabhai, A Life, Penguin Viking, New Delhi, 2007, Chap. 1, P 9.
4. Sharma RamAvtar : Entrepreneurial Performance in Indian Industry, Inter - India Publications, New Delhi, 1985.

# भाववाढ न रोखणारे मध्यममार्गी बजेट

**विनायक म. गोविलकर**
4 ब लोकमान्य नगर
गंगापूर रोड, नाशिक – 2
vgovilkar@rediffmail.com

**राजकीय पार्श्वभूमी –**

दुसऱ्यांदा सत्तेवर आलेल्या युपीए सरकारचा पहिला संपूर्ण अर्थसंकल्प 26 फेब्रुवारी 10 रोजी संसदेत मांडण्यात आला. अर्थमंत्री श्री प्रणव मुखर्जी अनुभवी आहेत. अर्थसंकल्प तयार करण्यात ते नवखे नाहीत. शासनात जरी एकच पक्ष नसला, आघाडी असली, तरी काँग्रेस हा मुख्य पक्ष आहे. अन्य पक्षांनी काँग्रेसच्या मागणीमुळे नव्हे तर स्वत:हून सरकारला पाठींबा दिला आहे. त्यामुळे मित्रपक्षांना खूप सांभाळून, खूष ठेवून अर्थसंकल्प तयार करण्याचे दडपण अर्थमंत्र्यावर नव्हते. दुसऱ्या युपीए सरकारच्या पाच वर्षातील वाटचालीचा Road Map या अर्थसंकल्पात असेल अशी अपेक्षा होती. भारत 2020 साली जगातील महासत्ता होणार असेल तर त्या दशकाचा प्रारंभ करणारे हे बजेट होते. त्यामुळेही या बजेटकडून खूप अपेक्षा होत्या. येणाऱ्या एका वर्षात बहुधा बिहार व्यतिरिक्त अन्य कोणत्याही राज्यात विधानसभेच्या निवडणुका नाहीत. अशा स्थितीत अर्थसंकल्प तयार करताना खूप राजकीय तडजोडीचीही आवश्यकता नव्हती. साहजिकच अर्थमंत्री काही धाडसी, कठोर आणि दूरगामी विचार करून पथदर्शक अर्थसंकल्प मांडतील असे वाटणारी परिस्थिती होती.

**अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने –**

अर्थव्यवस्थे समोर सध्या तीन आव्हाने प्रामुख्याने उभी होती. सप्टेंबर 2008 मध्ये अमेरिकेच्या वित्तीय क्षेत्रात संकट आले, ते त्या देशातील आर्थिक मंदीत रुपांतरित झाले आणि अल्पकाळात जगभर पसरले. भारतासही त्याचा फटका बसला आणि economic slowdown मधून मार्ग काढण्यासाठी काही उपाययोजना करणे भाग पडले. मंदीची झळ

भारतास फार व फार काळ लागली नसली तरी त्यातून लवकरात लवकर अर्थव्यवस्थेस बाहेर काढणे हे एक मोठे आव्हान होते. गेली दोन वर्षे भारताचे राजकोषीय शिस्तीकडे बरेच दुर्लक्ष झाले होते. दुष्काळ, शेतकऱ्यांची कर्ज माफी, मंदीतून मार्ग काढण्यासाठी एकापाठोपाठ दिलेली stimulus packages अशा कारणांमुळे शासनाचा खर्च प्रचंड प्रमाणात वाढला होता. परिणामत: सरकारची महसुली व राजस्व तूट प्रचंड प्रमाणात वाढली होती. सन 2008-09 मध्ये राजस्व तुटीचे राष्ट्रीय उत्पनाशी प्रमाण 7.8% तर 9-10 च्या सुधारित अंदाजानुसार ते 6.8% इतक्या धोक्याच्या पातळीवर पोहोचले होते. शासनाची कर्जे वाढली होती. वित्तीय शिस्तीची गाडी पुन्हा रुळावर आणणे हे दुसरे आव्हान अर्थमंत्र्यांसमोर होते.

गेले काही महिने सामान्य जनतेला भेडसावणारा एक मोठा प्रश्न होता तो वाढत्या किंमतीचा. शासनाच्या अधिकृत आकडेवारीनुसार अन्नधान्यांच्या किंमती १७% ने वाढल्या होत्या. प्रत्यक्षात यापेक्षाही जास्त महागाईचा अनुभव जनता घेत होती. किंमत वाढ रोखण्याचे तिसरे आव्हान अर्थमंत्र्यांसमोर होते. अर्थसंकल्पाचे मूल्यमापन करताना या तीन आव्हानांवर मात करण्याचा 'संकल्प' त्यात दिसतो का व त्यासाठीची ठोस 'उपाययोजना' आढळते का याचा विचार करायला हवा.

**पायाभूत सुविधा – स्तुत्य दिशा –**

उत्तम पायाभूत सुविधांमुळे उत्पादनांचा दर्जा वाढतो, कॉस्ट कमी होते व उत्पादनाची मायाही वाढते. भरपूर वस्तु उत्पादित झाल्याने पुरवठा वाढून किंमती कमी होऊ शकतात. तसेच कॉस्ट कमी झाल्यानेही किंमती कमी होण्यास हातभार लागतो. शासनाने पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी खर्च वाढविला तर अर्थव्यवस्थेत जनतेचे उत्पन्न वाढते, क्रयशक्ती वाढते, मागणी वाढते आणि मंदीतून मार्ग काढणे सोपे जाते. थोडक्यात पायाभूत सुविधांच्या विकासामधून किंमत वाढ रोखणे, मागणी वाढविणे साध्य होऊ शकते. याचा नीट विचार अर्थसंकल्पात दिसतो. 11 लाख कोटी रुपये एकूण खर्चाच्या या अंदाजपत्रकात पायाभूत सुविधांसाठी 1,73,552 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण खर्चाच्या सुमारे 16% असणारी ही तरतूद योजना खर्चाच्या 46% आहे. दर दिवशी वीस कि.मी. लांबीचा राष्ट्रीय महामार्ग बनविण्याचे उद्दिष्ट तर कौतुकास्पद आहे. पायाभूत सुविधा निर्माणासाठी अशा प्रकल्पांना 10-11 या वर्षात India Infrastructure Finance Company ने रु. 11,000 कोटींचा वित्तपुरवठा करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. वीज या अति संवेदनशील बाबींसाठीची गत वर्षीची रु. 2230 कोटींची तरतूद अडीचपट वाढवून रु. 5130 कोटी केली आहे. न्यू अँड रिन्युएबल एनर्जीसाठी रु. 1000 कोटींची तरतूद केली. शासनाने खर्च करण्याबरोबरच पायाभूत सुविधा निर्माणासाठी समाजाकडून सहजपणे निधी जमा व्हावा यासाठी अर्थमंत्र्यांनी एक कल्पक योजना या अर्थसंकल्पात आणली आणि ती म्हणजे 'Infrastructure Bonds करदात्यांनी अशा बॉंडसमध्ये रु. 20,000 पर्यंत गुंतवणूक केल्यास त्यांना नवीन कलम 80 ccf अन्वये आयकरातून सूट देण्याचे प्रस्तावित केले

आहे. लाखो आयकर दाते जर प्रत्येकी रु. 20,000 पायाभूत सुविधा बाँडस्‌मध्ये पैसे गुंतवतील तर बरीच मोठी रक्कम जनतेकडून उभी राहील. या साऱ्या तरतुदींमुळे अर्थसंकल्पात पायाभूत क्षेत्राकडे पुरेसे लक्ष व पुरेशी निधीची तरतूद केल्याचे म्हणावे लागेल.

**सामाजिक सुरक्षा व कल्याण –**

'विकास राज्य' म्हणून शासनाने पायाभूत सुविधांकडे लक्ष दिलेले दिसते. तसेच 'कल्याणकारी राज्य' म्हणूनही अर्थसंकल्पातील काही गोष्टींचे कौतुक व्हायला हवे. अर्थसंकल्पात सामाजिक क्षेत्रावरील प्रस्तावित खर्च रु. 1,37,674 कोटींचा म्हणजेच योजना खर्चाच्या सुमारे 37% आहे. त्यात शालेय शिक्षणावर रु. 31,036 कोटी, आरोग्य व कुटुंबकल्याण यावर रु. 22,300 कोटी आणि ग्रामीण विकासावर रु. 66,100 कोटी इतका खर्च प्रस्तावित आहे. सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने तीन अत्यंत चांगल्या बाबी अर्थसंकल्पात सापडतात. विणकर, रिक्षाचालक, बिडी कामगार अशा असंघटित क्षेत्रातील कामगारांना ना तर रोजगाराची हमी ना उत्पन्नाची. त्यांच्यासाठी National Social Security Fund अशा नावाने एक निधी तयार करण्याची घोषणा व त्यासाठी रु. 1,000 कोटींची केलेली तरतूद अभिनंदनीय आहे. गेली काही वर्षे शासन राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना चालवित आहे. त्याद्वारे दारिद्र्य रेषेखालील कामगार व त्यांचे कुटुंबीय यांना आरोग्य विम्याचा लाभ दिला जातो. या अर्थसंकल्पात या योजनेची कक्षा रुंदावून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली 15 दिवसांपेक्षा जास्त दिवस काम केलेल्या कामगारांनाही समाविष्ट करण्यात आले आहे. सामाजिक सुरक्षा देण्यातील तिसरा महत्त्वाचा निर्णय आहे नवीन पेन्शन योजनेचा विस्तार, असंघटित क्षेत्रातील कामगारांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्थसंकल्पात प्रोत्साहन दिले आहे. अशा कामगारांनी दरमहा किमान रु. 1,000 किंवा वार्षिक कमाल रु. 12,000 भरले तर शासनाने त्यात रु. 1,000 जमा करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच अशी रु. 1,000 ची रक्कम राज्य शासनानेही भरावी. असे आवाहन त्यांनाही केले आहे.

**कृषिक्षेत्र – प्रश्न कळले, उत्तरे सापडेनात –**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीचे महत्त्व सांगायचे कारण नाही. साठ टक्के जनता आपल्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. कृषी उत्पादन वाढले तर या 60% लोकांची क्रयशक्ती वाढून मागणीत वाढ होऊ शकते व मंदीतून वाट शोधणे सुकर होते. शिवाय शेतमालाचे उत्पादन वाढले तर बाजारात पुरवठा वाढून अन्नधान्य, फळे, भाजीपाला यांच्या किंमती आटोक्यात राहू शकतात. या साऱ्याचे भान अर्थमंत्र्यांना आहे. म्हणूनच त्यांनी शेतीक्षेत्राच्या चार प्रश्नांचा उल्लेख अर्थसंकल्पात केला – कृषी उत्पादन वाढविणे, साठवणुकीतील नुकसान कमी करणे, शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणे आणि अन्न प्रक्रिया उद्योगास चालना देणे. या प्रश्नांवर उत्तरे मात्र फारशी प्रभावी नाहीत असे दिसते. उदा. पूर्वेकडील सहा राज्यात दुसरी हरित क्रांती घडवून आणू व त्याद्वारे कृषी उत्पादन वाढवू ही घोषणा. घोषणा तर उत्तमच आहे, पण त्यासाठी केलेली अर्थसंकल्पातील तरतूद केवळ 400 कोटी

रुपयांची आहे. सहा राज्यांना 400 कोटी म्हणजे प्रत्येक राज्यास सुमारे 66 कोटी. एका राज्यात सुमारे तीस बत्तीस जिल्हे मानले तर प्रत्येक जिल्ह्याला सुमारे दोन कोटी रुपये. यापुढे त्या जिल्ह्यातील तालुके व खेडी यांचा विचार न केलेलाच बरा. इतक्या अपुऱ्या आर्थिक तरतुदीतून हरित क्रांतीची घोषणा कशी साकारणार? शेतमालाच्या साठवणुकीतील नुकसान कमी करण्यासाठीही काय उपाय आहे? अर्थसंकल्पात म्हटलय की, शासनास अन्न साठवणुकीसाठी अन्न महामंडळाची गोदामे अपुरी पडतात. म्हणून खाजगी गोदामे भाड्याने घेतली जातात. त्यांची मुदत 5 वर्षे होती ती 7 वर्षांपर्यंत वाढविली. नुकसान कसे कमी होईल? थोडक्यात शेती विषयी हा अर्थसंकल्प 'High on intent but very low on content' आहे असे दिसते.

**काही आकड्यांचे गांभीर्य –**

वित्तीय शिस्त आणण्यासंबंधी मोठी जबाबदार विधाने अर्थमंत्र्यांनी या अर्थसंकल्पात केली आहेत. परंतु त्यावर उपाय योजना फार गांभीर्याने केलेली दिसत नाही. शिस्त आणण्यासाठी खालील बाबींचा विचार करणे आवश्यक वाटते –

1. 2010-11 च्या अंदाजपत्रकात महसुली जमा रु. 6,82,212 कोटींची आहे तर महसुली खर्च रु. 9,58,724 कोटींचा प्रस्तावित आहे. याचाच अर्थ महसुली तूट रु. 2,76,512 कोटींची आहे. 2003 साली पारित झालेल्या राजस्व जबाबदारी व अर्थसंकल्प व्यवस्थापन कायद्यानुसार ही तूट शून्य असायला हवी. महसुली उत्पन्नातूनच महसुली खर्च भागायला हवा. किंबहुना त्यातून काही महसुली शिल्लक असावी. ज्यातून भांडवली खर्चासाठी हातभार लागू शकेल. हे साधे वित्तीय शहाणपण अर्थसंकल्पात पाळता आलेले नाही. शासनाची महसुली जमा रु. 100 असेल तर शासन या अर्थसंकल्पात रु. 140.5 इतका महसुली खर्च प्रस्तावित करत आहे.
2. शासनाने भांडवली जमा रु. 4,26,500 कोटींची अंदाजित केली आहे. तर भांडवली खर्च केवळ रु. 1,50,025 कोटींचा. याचाच अर्थ भांडवली जमेतून केवळ 35% भांडवली खर्च होणार आहे. संरक्षणावरील भांडवली खर्च वगळला तर इतर भांडवली गुंतवणूक खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे.

| | |
|---|---|
| योजनेतर भांडवली गुंतवणूक– | रु. 31,051 कोटी |
| केंद्रीय योजनानुसार भांडवली गुंतवणूक– | रु. 49E719 कोटी |
| एकूण भांडवली गुंतवणूक– | रु. 80,830 कोटी |

10-11 च्या अर्थसंकल्पात एकूण खर्च रु. 11,08,749 कोटींचा प्रस्तावित आहे. त्याच्याशी भांडवली गुंतवणुकीचे प्रमाण हे केवळ (80830--11,08,749 x 100) 7% येते. इतकी अल्प भांडवली गुंतवणूक देशाला विकासाकडे कशी नेईल?

3. शासनाने घेतलेल्या कर्जावरील व्याज, सबसिडी, संरक्षण व पेन्शन या चार बाबींवर होणारा खर्च अटळ आणि आवश्यक असला तरी तो 'उत्पादक' नाही. सबब

एकूण खर्चाशी त्यांचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न व्हायला हवा. 10-11 च्या अर्थसंकल्पात त्याची स्थिती अशी आहे.

| | |
|---|---|
| व्याजाचा खर्च | रु. 2,48,644 कोटी |
| सबसिडी | रु. 1,16,224 कोटी |
| संरक्षण | रु. 1,47,304 कोटी |
| पेन्शन | रु. 42,840 कोटी |
| एकूण | रु. 5,55,072 कोटी |

अंदाजपत्रकातील केंद्र शासनाने दाखविलेला नक्त कर महसूल रु. 5,34,094 कोटींचा आहे. थोडक्यात कराचा सर्व महसूलही या चार खर्चासाठी पुरेसा नाही. सुमारे रु. 21,000 कोटी त्यासाठी अपुरे आहेत. कर व करेतर अशा एकूण महसुली जमेच्या 81% हा खर्च झाल्यावर अन्य खर्चासाठी कर्जाद्वारेच पैसा उभारावा लागणार हे स्पष्ट आहे.

4. घेतलेल्या कर्जाचे व्याज देणे व त्याचा परतफेडीचा हप्ता देणे याला इंग्रजीत 'debt servicing' असे म्हणतात. अंदाजपत्रक 2010 मध्ये यावरील प्रस्तावित रक्कमा अशा –

| | |
|---|---|
| कर्जावरील व्याज | रु. 2,48,644 कोटी |
| कर्जावरील हप्ता | रु. 1,37,726 कोटी |
| **एकूण** | |
| Debt Servicing | रु. 3,86,390 कोटी |

या Debt Servicing चे एकूण नक्त कर महसुलाशी प्रमाण 72% आहे. अजून कर्ज काढून जुनी कर्जे परतफेड करावी लागत नाही यातच समाधान मानायचे काय?

**दिशाभूल तर नाही?**

1. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणाच्या परिच्छेद 115 मध्ये म्हटले की, "I have made a conscious effort to avoid issuing bonds to oil and fertiliser companies : I would like to continue with this practice of extending Government subsidy in cash, thereby bringing all subsidy related Liabilities into our fiscal accounting." यापूर्वी तेल वितरक कंपन्यांना येणारी तूट भरून काढण्यासाठी शासन तेलरोखे देत असे. असे तेलरोखे 'रोखे' या स्वरूपात असल्याने व ती तूट रोखीने भरून न काढल्याने अंदाजपत्रकात दाखविले जात नसत. त्यामुळे प्रस्तावित खर्चात ही रक्कम समाविष्ट होत नसे व परिणामत: शासनाची अंदाजपत्रकातील तूट तेवढ्याने कमी दिसत असे. या 'देण्याला' Off Budget Liabilities म्हणतात. थोडक्यात तेलरोखे देऊन आपली तूट कमी दाखविण्याची शक्कल शासनाने गेली काही वर्षे यशस्वीपणे वापरली. अर्थमंत्र्यांनी ही प्रथा बंद करण्याची उत्तम घोषणा 2010 च्या अर्थसंकल्पात वर नमूद केलेल्या वाक्यांतून केली. ही अर्थातच अभिनंदनीय बाब आहे. परंतु या घोषणेचा अर्थसंकल्पातील आकड्यात कसा समावेश झाला आहे? 2009-10 च्या सुधारित अंदाजानुसार एकूण सबसिडी रु. 1,31,025 कोटींची आहे. यात तेलरोख्यांचा समावेश नाही. डिसेंबर 09 पर्यंतच्या नऊ महिन्यात तेलरोखे सुमारे 1,00,000 कोटी रुपयांचे दिले आहेत. आता तेलरोखे न देता सर्व सबसिडी रोखीने

द्यायची आहे. म्हणजेच अगदी गेल्या वर्षीचा सबसिडीचा खर्च रु. 1,31,025 कोटी वजा 10 च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेली रु. 3000 कोटींची खत सबसिडीतील कपात आणि रु. 4000 कोटींची अन्न सबसिडीतील कपात यांचा विचार करता सबसिडी रु. 1,24,025 कोटींची होते. त्यात ऑइल बाँडस् द्यायचे नसल्याने रोखीने द्यायची पेट्रोलियम सबसिडी मिळविल्यास एकूण सबसिडीची रक्कम रु. 2,25,000 कोटींचा आसपास जायला हवी. अर्थसंकल्पात सबसिडीची तरतूद गेल्या वर्षीच्या सुधारित अंदाजापेक्षाही कमी म्हणजे केवळ रु. 1,16,224 कोटींची आहे. मग प्रश्न पडतो तो असा की, 'ऑईल बाँड' न देता तेल वितरण कंपन्यांना द्यायच्या सबसिडीची तरतूद कोठे केली आहे? की ही केवळ घोषणाच?

2. अर्थमंत्र्यांच्या बजेट भाषणातील परिच्छेद 186 असा आहे. "My proposals on Direct taxes are estimated to resust in a revenue loss of Rs. 26,000 crore for the year. Proposals relating to indirect taxes are estimated to result in a net revenue gain of Rs. 46,000 crore for the year. Taking into account the concessions being given in my tax proposals and measures taken to mobilise additional resources, the net gain is estimated to be Rs. 20,500 crore for the year."

या वाक्यांचा अर्थ असा होतो का की, अर्थमंत्र्यांना सन 2010-11 या आर्थिक वर्षात करांचा महसूल रु. 20,500 कोटींनी जास्त जमा होईल असे वाटते? अर्थसंकल्पातील आकड्यांवर नजर टाकली तर काय दिसते?

सन 2009-10 सुधारित अंदाजानुसार सरकारने कर महसूल रु. 6,33,095 कोटींचा दाखविला आहे आणि सन 2010-11 साठी तो रु. 7,46,651 कोटींचा अंदाजित केला आहे. या दोन आकड्यातील फरक म्हणजेच कर महसुलातील प्रस्तावित वाढ रु. 1,13,556 कोटींची वाढ यांचा मेळ कसा घालायचा?

**भाववाढ –**

गेले काही महिने भेडसावणारी भाववाढ रोखणे हे अर्थसंकल्पापुढील एक आव्हान होते. त्यासाठी काही थेट उपाय योजना अर्थसंकल्पात दिसत नाही. उलट काही प्रस्तावांचा परिणाम भाववाढीत 'वाढ' होण्यास हातभार लावील की काय अशी रास्त भीती निर्माण करते. रेल्वे वाहतुकीवर 10% सेवा कर लागू केल्याने वाहतूक खर्चात वाढ होणार, पर्यायाने खर्च वाढल्याने किंमत वाढ होणार. पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढल्याने वाहतूक खर्च तसेच इंधन खर्चात वाढ होणे स्वाभाविक आहे. Stimulus Packages टप्प्याटप्प्याने मागे घेणे आवश्यक आहे यात शंका नाही. त्यामुळे सेनव्हॅट, उत्पादन शुल्क यात झालेली वाढ शेवटी वस्तुंवरच आकारली जाईल ना? सेवा कराच्या जाळ्यात आणखी सेवा आणल्याने त्याचा अप्रत्यक्ष परिणाम 'कॉस्ट' वाढण्यात होणार आहे. सिमेंटचे भाव वाढल्याने केवळ धरबांधणीच नव्हे तर पायाभूत सुविधांची cost वाढणार आहे. कंपन्यांवरील किमान पर्यायी कराचा दर 15% वरून 18% पर्यंत वाढविल्याने त्याची भरपाईही कंपन्या अन्य मार्गाने करण्याचा

प्रयत्न करतीलच ना? या साऱ्या बाबी भाववाढ कमी करण्यास तर नव्हेच, त्याच पातळीवर ठेवण्यासही उपयुक्त नाहीत. भाववाढ आणखी होण्यास कारणीभूत आहेत.

थोडक्यात, सन 2010-11 चे अंदाजपत्रके पायाभूत सुविधांवर भर देणारे आणि सामाजिक कल्याणाचे भान असलेले आहे. शेती विषयी भरपूर चर्चा करणारे पण काहीच ठोस पावले उचलणारे नाही. वित्तीय शिस्तीच्या गरजेवर भर देणारे पण त्यादृष्टीने फारसे काही न करू शकणारे आहे. भाववाढ रोखण्यास असमर्थ वाटते. डाव्या विचाराकडे अथवा उजव्या विचाराकडे न झुकणारे, खूप कठोर अथवा सौम्य नसणारे, लोकप्रियतेचा अवाजवी प्रयत्न न करणारे पण त्याचवेळी फार अमुलाग्र बदलांविषयी न बोलणारे हे बजेट मध्यममार्गी आहे.

---

## निवेदन

अर्थसंवाद जानेवारी–मार्च २०१० खंड ३३, अंक ४ मध्ये अनुक्रमणिकेत प्रशांत हरमकर व मीरा आळशी यांच्या लेखाचे नांव नजरचुकीने आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्या असे छापले गेले आहे. ते पॉल क्रुगमनचे नव आर्थिक भूगोल असे वाचावे.

जगन्नाथ पाटील
संपादक

# महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणांत स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान - विशेष अभ्यास बारामती तालुका, जि. पुणे

**मुलाणी एम. यू**
प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, बारामती, जि. पुणे
भ्रमणध्वनी : 988161893

**1. प्रस्तावना**

भारतात आर्थिक व समाज व्यवस्थेत महिलांना दुय्यम स्थान असून त्या विद्यमान स्थितीतही संधी वंचित अर्थवंचित सत्तावंचित, निर्णय आणि प्रतिष्ठा वंचित राहिलेल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी जाणीपूर्वक प्रयत्न करण्यात आलेले असते तरी अपेक्षित यश प्राप्त झालेले नाही. महिला समस्यांचे मूळ आर्थिक असल्याने त्या समस्यांचे उच्चाटन करून आर्थिक सुबत्ता प्राप्त झाली तर महिलांना दर्जा व स्थान प्राप्त होईल. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवून समाजात मानसन्मान व गुणांना मान देण्यासाठी रोजगाराचे नवे दालन म्हणून स्वयंसहाय्यत बचत गटाच्या पर्वाचा प्रारंभ झाला आहे. याची प्रचिती येत आहे. त्यामुळे महिलांचे आर्थिक व सामाजिक परिवर्तन होत असून अर्थव्यवस्थेत नवे विचारप्रणाली, नवी व्यवस्था, नवी मानसिकता घडविण्यात स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्वपूर्ण योगदान आहे.

**2. उद्दिष्टे**

बारामती तालुक्यातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाच्या योगदानाचा शोध घेवून सद्यस्थितीचा आढावा घेणे स्वयंसहाय्यता बचत गटात महिला समाविष्ट झाल्याने होणाऱ्या लाभांचा शोध घेणे त्यांचा समस्या व उपाययोजना इ. शोध घेणे.

### 3. संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलनाचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक तथ्य संकलनात सर्वेक्षणाद्वारे मुलाखत पद्धतीने केले आहे. बारामती तालुक्यातील एकूण 117 महसुली गावापैकी 57 महसुली गावांची निवड अशा पद्धतीने केली की ज्या गावातील पाच वर्षापासून सुरू झालेले बचत गट, व्यावसायिक गट आणि अधिकोषणाशी संलग्न असणारे असे तीन निकषाद्वारे स्वयंसहाय्यता बचत गटाची यादृच्छिक नमुना पद्धतीने निवडलेले आहे. बारामती तालुक्यातील 101 स्वयंसहाय्यता बचत गटाची निवड शोधनिबंधासाठी केलेली आहे. द्वितीय तथ्य संकलनासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, जिल्हा परिषद, पंचायत समिती, अहवाल नाबार्ड प्रगती बुक, या स्रोताद्वारे संकलन केलेले आहे. तथ्य संकलित माहितीचे वर्गीकरण, सारणी आणि विश्लेषणासाठी विविध सांख्यिकीय व गणितीय साधन तसेच अनुमापन तंत्रे यांचा अवलंब केला आहे. शोध निबंधासाठी फक्त महिला स्वयंसहाय्यता बचत गट घेतलेले आहे.

### 4. संकल्पना

स्वयंसहाय्यता बचत गटाची संकल्पना वेगवेगळ्या दृष्टीकोनातून अनुभवली जात आहे. प्रादेशिकदृष्ट्या बचत गट, समूह गट, शेजारगट, स्वावलंबी गट, काटकसर गट, कर्ज गट, सूक्ष्म वित्त या संकल्पनेतून साकारत असली तरी लोकशाही मार्गाने चाललेली चळवळ असून महिलांची संख्या सर्वाधिक आहे. म्हणून महिला स्वयंसहाय्यता बचत गट शीर्षकाने नावारूपाला आली आहे. ज्या समूहात 10 ते 20 सदस्य एकत्र येऊन बचत करून एकमेकांच्या गरजा, अडचणी निर्मूलन करून सर्वानुमते निर्णय घेवून संघटन शक्ती मजबूत करून परस्पर सहकार्य सहभाग यात सातत्यपूर्ण प्रयत्नांना स्वयंसहाय्यता बचत गट म्हणतात.

### 5. उगमस्थान

स्वयंसहाय्यता बचत गटाची मूळ संकल्पना बांगला देशातील असून नोबेल विजेते डॉ. महंमुद युनुस यांनी सुक्ष्म वित्त स्वरुपात विकसित केले आहे. बांगला देशातील जोबरा गाव वर्षानुवर्षे सावकारी विळख्यात अडकले होते. या गावातील लोकांचे दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी व सावकारी जोखडच्यातून मुक्त करण्यासाठी सुक्ष्म वित्त स्वरूपात साह्य करण्यात आले. एकत्रित समूहाला विनातारण व विनाकार या तत्वावर वित्तीय मदत करून स्वरोजगारी निर्माण केले आहे. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलन झालेले आहे. डॉ. महंमद युनुसच्या प्रेरणेतून भारतात महिलांच्या सबलीकरणासाठी सर्व योजना एकत्रित स्वर्णजयंती स्वरोजगार या नावाने 1 एप्रिल 1999 पासून प्रारंभ झाला आहे. परंतु भारतात 1947 मध्ये अमरावती जिल्ह्यात काही सासू व सुनांनी एकत्र येवून 25 पैसे बचतीने गटाचा प्रारंभ केल्याचा उल्लेख आढळतो. तसेच 1970 च्या दरम्यान इलाबेन भट यांनी महिला व सुक्ष्म वित्त या विषयाची मांडणी सुरू केली होती.

महाराष्ट्रात 1994 मध्ये आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधीच्या मदतीने महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्पांतर्गत प्रायोगिक तत्त्वावर स्वयंसहायता

बचत गट चार जिल्ह्यात राबविण्यात आले. त्यातून अपेक्षित साध्य प्राप्त झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रभर महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे राबविण्यात येत आहे. तसेच स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून स्वयंसहायता बचत गट स्थापन करण्यास प्रारंभ झाला. पुणे जिल्ह्यात चैतन्य संस्था, अन्नपूर्ण महिला मंडळ, डीआरडीए, ग्रामीण महिला व बालविकास मंडळ, हॅल्पो फौंडेशन व यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

### 6. कार्यपध्दती

स्वयंसहाय्यता बचत गटाचे व्यवस्थापन व संघटिका व सहसंघटिका यांच्या मार्फत कार्यरत आहे. याची निवड लोकशाही मार्गाने गटातील सदस्यामार्फत होते. गटाच्या स्थापनेनंतर दरमहा सभा, बचत संकलन, उपस्थित अहवाल, गटांतर्गत कर्जवसुली, बँक कर्जवसुली, कर्जवाटप, सामाजिक समस्यांवर चर्चा सभासद पासबुक भरणा, अहवाल, गटाच्या प्रगतीबाबत चर्चा, बँकेत भरणा अशा पध्दतीने कारभार चालतो. स्वयंसहाय्यता बचत गटाचा आत्मा सभा असून दरमहा सभा घेणे सक्तीचे असते. संध्याकाळ सभेची वेळ आदर्श मानली जाते.

### 7. साधनसामुग्री

स्वयंसहाय्यता बचत गटाच्या अंमलबजावणीसाठी सदस्य पासबुक, गटाचा शिक्का, सभेचा इतिवृत्त पुस्तिका, कर्ज मागणी अर्ज, वचनचिठ्ठी, जामीनपत्र, अंतर्गत कर्जमंजुरी पत्रक, जमाखर्च नोंदवही, तेरीजपत्रक, नफा तोटा पत्रक, ताळेबंदपत्रक, बँक पासबुक, धनादेश, पुस्तिका इ. साधनसामुग्री आहे.

### 8. प्रगती

स्वयंसहाय्यता बचत गटाची संख्यात्मक प्रगती देश, राज्य व जिल्हा आणि तालुका पातळीवर पुढीलप्रमाणे

**1. देशपातळी** – संपूर्ण भारतभार स्वयंसहाय्यता बचत गटाची चळवळ फोफावली आहे. खालील तालिकेवरून स्पष्ट होते.

**तालिका क्रमांक 1**

| कर्जअखेर | वित्तपुरवठा गटसंख्या | | बँककर्ज रू. दशलक्ष | |
|---|---|---|---|---|
| | गटसंख्या | टक्केवारी | रक्कम रू. | टक्केवारी |
| 1992-99 | 32998 | 1.47 | 571 | 0.50 |
| 2000-01 | 149050 | 6.65 | 2789 | 2.54 |
| 2005-06 | 620109 | 27.70 | 449907 | 36.39 |
| एकूण | 2238565 | 100 | 113975 | 100 |

तालिका क्र. 1 वरून असे निदर्शनास येते की, भारतात 2005-06 पर्यंत स्वयंसहाय्यता बचत गटाची संख्यात्मक वाढ होवून कर्ज रकमेत वाढ झालेली आहे.

**2. महाराष्ट्र राज्यातील प्रगती** – महाराष्ट्र राज्य पुरोगामी विचारांचे असून महिला धोरणाचे प्रथम पुरस्कार करणारे राज्य असून महिला धोरणात स्वयंसहाय्यता बचत गटाला प्राधान्य देऊन त्याद्वारे महिलांचे सबलीकरण करण्यास वित्तीय स्त्रोत निर्माण करीत आहे. महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता बचत गट प्रगती पुढील तालिकेवरून स्पष्ट होते.

**तालिका क्रमांक 2**

| विभाग | 2002-03 | | 2003-04 | | 2004-05 | | 2005-06 | | 2006-07 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्व.ब.ग. | वित्तपुरवठा रू. | स्व.ब.ग. | वित्तपुरवठा रू. | स्व.ब.ग. | वित्तपुरवठा रू. | स्व.ब.ग. | वित्तपुरवठा रू. | स्व.ब.ग. | वित्तपुरवठा रू. |
| कोकण | 418 | 8.94 | 928 | 35.22 | 2127 | 86.28 | 2253 | 64.76 | 3986 | 861.72 |
| नाशिक | 670 | 29.58 | 899 | 52.25 | 5226 | 122.55 | 3906 | 183.15 | 10809 | 1863.1 |
| पुणे | 1119 | 41.46 | 1707 | 100.44 | 6575 | 208.42 | 19557 | 434.44 | 33836 | 6538.74 |
| औरंगाबाद | 1536 | 40.15 | 1651 | 6.63 | 5745 | 202.52 | 10907 | 333.71 | 13781 | 2653.00 |
| अमरावती | 2027 | 63.96 | 1897 | 70.1 | 4264 | 158.28 | 9930 | 276.52 | 14743 | 3627.91 |
| नागपूर | 2649 | 90.89 | 3388 | 12.1 | 10674 | 317.84 | 10486 | 470.88 | 21217 | 4796.67 |
| एकूण | 8446 | 274.00 | 10470 | 439.08 | 32611 | 109.80 | 60324 | 1769.63 | 94388 | 21332.64 |

स्रोत – Progres of SHG - Bank Linkage in India 2006-07.

तालिका क्र. 2 वरून स्पष्ट होते की महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षात 11 पटीने स्वयंसहाय्यता बचत गटात वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे 2002-03 मध्ये नागपूर विभाग तर 2006-07 मध्ये पुणे विभाग स्वयंसहाय्यता बचत 78 पटीने वित्तपुरवठा वाढ झाली आहे. गटाच्या बाबत प्रथम क्रमांकावर आहे. पुणे विभागात पुणे जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे.

**3. पुणे जिल्हातील प्रगती** – महाराष्ट्र राज्यात पुणे जिल्हा स्वयंसहाय्यता बचत गटाच्या बाबत प्रगतीपथावर आहे. हे खालील तालिकेवरून दिसून येते.

**तालिका क्रमांक 3**

**पुणे जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गटाची प्रगती (2008)**

| तपशिल | दारिद्र्यरेषेखालील | दारिद्र्यरेषेवरील | एकूण |
|---|---|---|---|
| गट स्थापन | 9624 | 38940 | 48564 |
| कर्जपुरवठा | 494.47 | 1697.25 | 2191.72 |

स्रोत – पुणे जिल्हा परिषद ग्रामीण विकास योजना 2008 प्रगती अहवाल

या तालिकेवरून स्पष्ट होते की पुणे जिल्ह्यात स्वयंसहाय्यता बचत गटाची प्रगती मोठ्या प्रमाणात होत असून हा जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांक दिसून येतो.

**9. शोधनिबंधाचे निष्कर्ष**

पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील एकूण स्वयंसहाय्यता बचत गटाची संख्या 1010 होती पैकी 10 टक्के नमुना निवड म्हणून 101 स्वयंसहाय्यता बचत गटाची निवड केली आहे. त्याचे निष्कर्ष पुढील प्रमाणे -

१. स्थापना - स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना किंवा निर्मिती करणारे विविध स्त्रोत आहे. प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे पुढील स्त्रोत स्पष्ट झाले आहे.

**तक्ता क्रमांक 1**

| क्रमांक | स्त्रोत | स्वयंसहाय्यता बचत गट संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | सरपंच | 34 | 33.67 |
| 2 | ग्रामसेवक | 15 | 14.86 |
| 3 | निवृत्त शिक्षक | 05 | 4.95 |
| 4 | स्वयंसेवी संस्था कार्यकर्ता | 15 | 14.86 |
| 5 | स्थानिक राजकीय पक्ष | 32 | 31.68 |
| | | 101 | 100 |

स्रोत - क्षेत्रीय पाहणी

या तक्त्यावरून असे निदर्शनास येते की टक्के स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना सरपंच यांनी सर्वाधिक केली आहे. जेथे महिला सरपंच त्या गावात जास्त संख्येने गटांची निर्मिती झाली आहे.

2. कारणनिहाय गटस्थापन - स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना वेगवेगळ्या कारणासाठी होते हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक 2**

| क्रमांक | कारण | संघटिका | | सदस्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| 1 | कर्जासाठी | 05 | 4.95 | 08 | 7.92 |
| 2 | शेजाऱ्याने सांगितले | 78 | 77.23 | 79 | 78.21 |
| 3 | सरकारी धोरण | 02 | 1.98 | -- | -- |
| 4 | बचतीसाठी | 10 | 9.9 | 12 | 11.88 |
| 5 | एकापेक्षा जास्त कारण | 06 | 5.94 | 04 | 3.96 |
| | एकूण | 100 | 100 | 101 | 101 |

स्रोत - क्षेत्रीय पाहणी

स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना शेजाऱ्याने सांगितले या कारणामुळे सर्वाधिक झालेला दिसून येते.

3. संघटिका व सहसंघटिका कालावधीनिहाय वर्गवारी – स्वयंसहाय्यता बचत गटातील कारभार पाहण्यासाठी सदस्यामधून संघटिका व सहसंघटिका यांची निवड एका वर्षापुरती असते परंतु या कालावधीचे बंधन पाळले जात नाही हे खालील तालिकेवरून स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक 4**

| कालावधी | स्वयंसहाय्यता बचत गट संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| 1 ते 2 वर्षे | 07 | 6.93 |
| 1 ते 5 वर्षे | 10 | 9.90 |
| कालावधी निश्चित नाही | 84 | 83.17 |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

4. सभा व सभेची जागानिहाय वर्गवारी – स्वयंसहाय्यता बचत गटाची सभा महिन्यातून एका वेळेस घेतली जाते व सभेची जागा शक्यतो सदस्यांच्या वर्तुळाप्रमाणे घरी घेतली जाते. सभेची जागा खालीलप्रमाणे निश्चित केली जाते.

**तक्ता क्रमांक 5**

| तपशील | स्वयंसहाय्यता बचत गट संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| घर | 59 | 58.41 |
| शाळा | 21 | 20.79 |
| मंदिर | 04 | 3.96 |
| चावडी | 05 | 4.95 |
| समाज मंदिर | 09 | 8.92 |
| अस्मिता भवन | 03 | 2.97 |
| **एकूण** | **101** | **100** |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

स्वयंसहायता बचत गटाची सभा घरी घेण्याचे प्रमाणे 58 टक्के सर्वाधिक आहे. कारण सभा संध्याकाळी घेतात. घरी सुरक्षेच्या दृष्टीने योग्य वाटते. दुपारी झालेल्या सभेचे कारण की शाळांना सुट्टी असते.

6. कारणनिहाय सभेची वेळ – स्वयंसहाय्यता बचत गटाची सभेची आदर्श वेळ संध्याकाळ मानली जाते. कारण महिलांचा स्वयंपाक व घरगुती कामे संध्याकाळ संपलेली असतात. शिवाय मोकळा वेळ असतो.

**तक्ता क्रमांक 6**

| तपशील | स्वयंसहाय्यता बचत गट संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| सकाळ | 24 | 23.76 |
| दुपार | 12 | 11.38 |
| संध्याकाळ | 65 | 64.36 |
| **एकूण** | **101** | **100** |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की 65 टक्के गटाची सभा संध्याकाळी होते म्हणून गटाची चळवळ यशस्वी होत आहे.

7. आकार – स्वयंसहाय्यता बचत गटामध्ये जास्तीत जास्त 20 सदस्य असतात. त्यापेक्षा कमी सदस्य असणारे गटही असतात. परंतु लहान आकाराचा गटाचा आर्थिक उलाढाल कमी असते.

**तक्ता क्रमांक 7**

| आकार | स्वयंसहाय्यता बचत गट संख्या | प्रतिशत | सदस्य एकूण | प्रतिशत |
|---|---|---|---|---|
| 1 ते 10 | 55 | 54.45 | 550 | 42.96 |
| 11 | 11 | 10.89 | 121 | 9.91 |
| 12 | 09 | 8.91 | 108 | 8.85 |
| 13 | 05 | 4.95 | 65 | 5.32 |
| 14 | 01 | 0.99 | 14 | 1.14 |
| 15 | 03 | 2.97 | 45 | 3.68 |
| 16 | 02 | 1.98 | 32 | 2.62 |
| 17 | 03 | 2.97 | 51 | 4.18 |
| 18 | 03 | 2.97 | 54 | 4.42 |
| 19 | - | - | - | - |
| 20 | 09 | 8.91 | 180 | 14.75 |
| **एकूण** | **101** | **100** | **1220** | **100** |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्रमांक 8 वरून स्पष्ट होते की 21 ते 40 वयोगटातील महिलांची संख्या सर्वाधिक आहे. म्हणजे तरुण महिला या गटात सर्वाधिक सहभागी आहेत.

10. शैक्षणिक स्तर निहाय वर्गवारी – स्वयंसहाय्यता बचत गटामध्ये असणारे सदस्य व संघटिका यांचे शैक्षणिक स्तर खालीलप्रमाणे –

**तक्ता क्रमांक 10**

| शै. स्तर | संघटिका | | सदस्य | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| अशिक्षित | - | - | 15 | 14.85 |
| प्राथमिक | - | - | 15 | 14.85 |
| माध्यमिक | - | - | 15 | 14.85 |
| उच्च माध्यमिक | - | - | 15 | 14.85 |
| पदवी व पदव्युत्तर | - | - | 15 | 14.85 |
| **एकूण** | **101** | **100** | **1220** | **100** |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. 10 नुसार निर्देशित होते की 50 टक्के सदस्या प्राथमिक शिक्षण पूर्ण झालेल्या आहेत. पदवी व पदव्युत्तर शिक्षण अतिशय नगण्य आहे. कारण महिलांमध्ये 1985 पर्यंत शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी होते. कारण घरगुती अडचण, मुलगी, शैक्षणिक सुविधांचा अभाव हे होय. बचत गटामुळे शिक्षणाचा प्रसार वाढत आहे.

**11. महिलांचे आर्थिक सबलीकरण**

स्वयंसहाय्यता बचत गटात महिलांचा सहभाग वाढल्यामुळे महिलांचे आर्थिक स्तर उंचावत आहे. हे आर्थिक स्तरांचे (सबलीकरण) निदेशक म्हणजे उत्पन्न वृद्धी, व्यवसाय जाण, बचत व काटकसर वृद्धींगत, कर्ज घेणे व परतफेड, व्यवसाय, प्रशिक्षण, बँकेत जाणे-येणे, कागदपत्रांची हाताळणी, रोजगार निर्मिती, गटांचे हिशोब व रेकॉर्ड सांभाळणे या बाबी महिला करू लागल्याने त्यांचे आर्थिक सबलीकरण होत आहे.

महिला या स्वयंसहाय्यता बचत गटात येण्यापूर्वी व गटात आल्यानंतर कशी सुधारणा झाली याचा उहापोह केला आहे. म्हणून आर्थिक सबलीकरणासाठी खालील निदेशक मानले आहेत.

11.1 हिशोब व कागदपत्र हाताळणी निहाय वर्गवारी

**तक्ता क्रमांक 11.1**

| | तपशील | गटात येण्यापूर्वी | | गटात आल्यानंतर | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत | |
| 1 | हिशोब ठेवणारे | 10 | 9.90 | 9 | 90.10 | 101 |
| 2 | कागदपत्र हाताळणी | 09 | 8.91 | 92 | 91.9 | 101 |
| 3 | धनादेश वापर | 05 | 4.95 | 96 | 95.5 | 101 |
| 4 | कागदपत्रात शिक्का मारणे माहिती | 02 | 1.98 | 99 | 98.2 | 101 |
| 5 | रेकॉर्ड लिहिणे | 03 | 2.97 | 98 | 97.03 | 101 |
| 6 | बँकेशी पत्रव्यवहार | 11 | 11 | 90 | 89.10 | 101 |
| 7 | बँकेत जाणे येणे | - | - | 101 | 100 | 101 |
| 8 | बँकेत पैसे भरणे व काढणे व्यवहार | - | - | 101 | 100 | 101 |

स्रोत : क्षेत्रीय पाहणी

वरील तक्त्यावरून सुचित होते की महिला गटात आल्यामुळे बँक व्यवहार करण्याचे प्रमाण 90 टक्क्याने वाढले आहे. त्याचप्रमाणे हिशोब आणि रेकॉर्ड लिहिण्याची कला अवगत झाली आहे. त्याचप्रमाणे बँकेतील पैसे काढणे व भरणा करणे 100 टक्के महिलांना जमू लागले आहे. याचाच अर्थ आर्थिक व्यवहाराची माहिती मिळू लागली आहे म्हणून महिलांचे आर्थिक सबलीकरण होत आहे.

### 11.2 उत्पन्नवृद्धी

स्वयंसहाय्यता बचत गटात महिला आल्यामुळे उत्पन्नवृद्धी झाली आहे. फक्त पाच वर्षाच्या कालखंडात हा बदल झाला आहे. ते पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

### तक्ता क्रमांक 11.2

| | तपशील | गटात येण्यापूर्वी | | गटात आल्यानंतर | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| 1. | 5000 पर्यंत | 30 | 29.70 | 101 | 100 |
| 2. | 5001 ते 10000 | 10 | 9.90 | 101 | 100 |
| 3. | 1000 ते 15000 | 01 | 0.99 | 50 | 49.50 |
| 4. | 15000 ते 20000 | 01 | 0.99 | 50 | 49.50 |
| 5. | 20000 ते 25000 | - | - | 35 | 34.65 |
| 6. | 25000 ते 30000 | - | - | 21 | 20.79 |
| 7. | 30000 च्यावर | - | - | 0.13 | 12.87 |

स्रोत : क्षेत्रीय पाहणी

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की गटात आल्यानंतर सर्वच महिलांच्या उत्पन्नात वृद्धी झालेली आहे. 5000 ते 20000 हजार रूपये वार्षिक उत्पन्नात वाढ झाली आहे. याचा अर्थ दरमहा 1500 रुपये उत्पन्न वाढलेले आहे.

## 11.3 बचत सवयी

स्वयंसहाय्यता बचत गटात आल्यापासून सर्वच महिलांना बचतीची सवय लागली आहे हे तक्ता क्रमांक 11.3 नुसार स्पष्ट होते.

### तक्ता क्रमांक 11.3

| दरमहा बचत रक्कम | संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| 20 पर्यंत | 10 | 9.9 |
| 21 ते 30 | 20 | 19.8 |
| 31 ते 40 | 01 | 0.99 |
| 41 ते 50 | 56 | 55.45 |
| 51 ते 100 | 12 | 11.88 |
| 101 ते 150 | 01 | 0.99 |
| 151 ते 200 | 01 | 0.99 |
| **एकूण** | 101 | 100 |

स्रोत : क्षेत्रीय पाहणी

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की दरमहा 50 रुपये बचत करणाऱ्या सदस्यांचे प्रमाण 55.5 टक्के इतके आहे. स्वयंसहाय्यता बचत गटात येण्यापूर्वी महिला बचत करीत नव्हत्या म्हणून स्वयंसहाय्यता बचत गटामुळे बचतीची सवय लागली आहे. सदर बचत रक्कम बँकेत करू लागल्यामुळे बँकाची पतनिर्मिती क्षमता वाढली आहे. तसेच भांडवल निर्मितीचा वेग वाढण्यास मदत झाली आहे अन्यथा महिलांजवळील हा पैसा घरात निष्क्रीय स्वरूपाचा राहिला असता.

### 11.4 व्यवसायनिहाय कर्जाचे वर्गवारी

स्वयंसहाय्यता बचत गटातून महिलांना व्यवसाय करण्यासाठी मागताक्षणी विनाखर्च विनाकागदपत्र कर्ज मिळते. अशा व्यवसायांना निहाय व रक्कमनिहाय कर्जाचे तपशील तक्ता क्र. 11.4 मध्ये आहे.

**तक्ता क्रमांक 11.4**

| व्यवसाय | 5000 पर्यंत | 5001 ते 10000 | 10001 ते 15000 | 15001 ते 20000 | 20001 ते 25000 | 25000 वर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शेतीसंलग्न | 16 | 08 | 34 | 01 | 08 | 12 | 79 |
| व्यापार | 60 | 60 | 06 | 04 | 03 | 01 | 74 |
| शिक्षण | 21 | - | - | - | - | - | 21 |
| आरोग्य | 35 | 02 | - | - | - | - | 37 |
| मुलीचे लग्न | 06 | 02 | - | - | - | - | 08 |
| घरगुती | 30 | 04 | - | - | - | - | 34 |
| एकूण | 101 | 101 | 101 | 101 | 101 | 101 | 101 |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

टिप – विविधर रकमेसाठी मागणी जास्त असल्यामुळे बेरीज 101 येत नाही.

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, शेती संलग्न म्हणून दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, याकरिता रक्कम जास्त लागते म्हणून 34 सदस्याने 10000 ते 15000 रु. पर्यंत कर्ज घेतले आहे. शिवाय व्यापारास कर्ज घेतलेले आहे. उत्पादक बरोबर अनुत्पादक **कारणासाठी** कर्जे घेतली आहे.

### 11.5 कर्ज थकबाकीचे वर्गवारी

स्वयंसहाय्यता बचत गटातून घेतलेले कर्जाची परतफेड (74 सदस्य 73.27 टक्के) प्रमाण असून थकबाकी (27 सदस्य) 26.73 टक्के आहे. थकबाकी असण्याचे कारण की काही भागात दुष्काळजन्य परिस्थिती होती.

### 11.6 सेवा स्वरूपात फायद्यांची वर्गवारी

स्वयंसहाय्यता बचत गटात महिला सहभागी झाल्यामुळे घरामध्ये वस्तू घेता आले. शिवाय व्यवसाय प्रशिक्षण रेकॉर्ड मेंटेनेन्स, सामूहिक व्यवसायाचे फायदे मिळाले आहे. हे तक्ता क्रमांक 11.5 वरून स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक 11.5**

| क्र. | तपशील | स्वयंसहाय्यता बचत गट संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | गॅस, फर्निचर, भांडी | 61 | 60.39 |
| 2 | दूरदर्शन, रेडिओ, टेलिफोन बुथ | 25 | 24.75 |
| 3 | दुचाकी वाहन | 22 | 21.78 |
| 4 | घरदुरुस्ती व घरबांधणी | 18 | 17.82 |
| 5 | स्वयंसहाय्यता बचत गटाचे ज्ञान प्राप्त | 95 | 94.05 |
| 6 | शैक्षणिक माहिती | 97 | 96.03 |
| 7 | व्यवसाय प्रशिक्षण | 101 | 100 |
| 8 | व्यवसाय निवडीस मदत | 101 | 100 |
| 9 | गटातील अंदाजपत्रक | 86 | 85.14 |
| 10 | तरतुदी | 86 | 85.14 |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्रमांक 11.5 वरून स्पष्ट होते स्वयंसहाय्यता बचत गटात आल्यामुळे महिलांच्या कुटुंबांना वरीलप्रमाणे फायदे प्राप्त झाले आहेत. त्यामुळे राहणीमानाचा दर्जा उंचावला.

### 11.7 रोजगार निर्मिती

स्वयंसहाय्यता बचत गटात आल्यामुळे महिला अर्ध रोजगारी, हंगामी रोजगार, काहींचा बारमाही रोजगार, व्यवसायातून प्राप्त झाला आहे. शिवाय घरगुती कामे पाहून व्यवसाय करीत असल्यामुळे रोजगार प्राप्त होत आहे. खालील तक्ता क्र. 11.6 वरून स्पष्ट होईल.

**तक्ता क्रमांक 11.6**

| तपशील | रोजगार प्राप्त संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| शेतीसंलग्न व्यवसाय | 806 | 62 |
| व्यापारातून रोजगार | 485 | 37.30 |
| सेवाक्षेत्र | 09 | 0.70 |
| **एकूण** | 1300 | 100 |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

या तक्त्यावरून निर्देशित होते की महिलांना ढोबळ मानाने अर्थ स्वरूपात, घराच्या कामाबरोबर व्यवसायाचे काम अशा स्वरूपात रोजगार प्राप्त होऊन काही प्रमाणात दारिद्र्य निर्मूलनास साहाय्य झाले आहे.

## 12. महिलांचे सामाजिक सबलीकरण

स्वयंसहाय्यता बचत गटामध्ये महिला आल्यामुळे सामाजिक सबलीकरण झाले आहे. सामाजिक सबलीकरणाचे निर्देशक शासकीय कार्यक्रमात महिलांचा सहभाग, व्यक्तीमत्व विकासात भर याद्वारे स्पष्ट होते.

### 12.1 शासकीय/सामाजिक योजनेत सहभाग

गाव विकासासाठी शासन गावपातळीवर विविध योजना राबविल्या जातात. त्यामध्ये महिलांचा सहभाग वाढला हे स्वयंसहाय्यता बचत गटामुळे परिवर्तन झाले आहे. हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक 12.1**

| क्र. | तपशील | स्वयंसहाय्यता बचत गट संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | महिला बचत गट अभियानात सहभागी | 100 | 99 |
| 2 | पौष्टीक आहार योजना | 49 | 48.51 |
| 3 | शालेय अन्नपोषण | 33 | 32.67 |
| 4 | अस्मिता भवन बांधकाम | 68 | 12.87 |
| 5 | पाणलोट क्षेत्र कार्यक्रम | 68 | 67.32 |
| 6 | वनराई बंधारे | 77 | 76.23 |
| 7 | घरकुल योजना | 64 | 63.36 |
| 8 | साक्षरता अभियान | 70 | 69.30 |
| 9 | दारूबंदी | 100 | 99 |
| 10 | आरोग्य शिबीर | 101 | 100 |
| 11 | कुटुंब कल्याण कार्यक्रम | 53 | 52.47 |
| 12 | ग्रामस्वच्छता | 101 | 100 |
| 13 | राष्ट्रीय सण | 11 | 10.89 |
| 14 | महिला दिन | 101 | 100 |
| 15 | वाढदिवस | 101 | 100 |
| | **एकूण** | 101 | 100 |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

टिप – एकापेक्षा जास्त योजनेत अनेक महिला सहभागी होतात म्हणून बेरीज 101 नाही.

वरील तक्त्यावरून निर्देशित होते की स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांचा विविध कार्यक्रमात सहभाग वृद्धींगत झाल्यामुळे शासकीय योजनांची माहिती प्राप्त झाली आहे.

## 12.2 व्यक्तीमत्व विकास

स्वयंसहायता बचत गटात आल्यामुळे महिलांचे व्यक्तीमत्व विकासात भर पडल्यामुळे जीवनमान सुधारले आहे. व्यक्तीमत्वात विकासाचे निर्देशक पुढील तक्त्यात स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्रमांक 12.2**

| क्र. | तपशील | महिला संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | संपर्क | 99 | 98.01 |
| 2 | नेतृत्व | 96 | 95.04 |
| 3 | निर्णय क्षमता | 98 | 97.02 |
| 4 | लिहिणे वाचणे | 90 | 89.10 |
| 5 | समजूतदारपणा | 97 | 96.03 |
| 6 | सन्मान | 94 | 93.06 |
| 7 | व्यवहार | 98 | 97.02 |
| 8 | संबंध वृद्धींगत | 96 | 95.04 |
| 9 | आत्मविश्वास | 98 | 97.02 |
| 10 | कार्यक्षमतेत वृद्धी | 90 | 89.10 |
| 11 | मतदान स्वातंत्र्य | 95 | 94.05 |
| 12 | उदारमतवाद | 93 | 92.07 |
| 13 | कामात सभ्यता | 97 | 96.03 |
| 14 | घरातील निर्णयात महत्त्व | 98 | 97.02 |
| 15 | समाजात प्रतिष्ठा प्राप्त | 97 | 96.03 |
| | **एकूण** | 101 | 100 |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. 11.8 नुसार स्पष्ट होते की स्वयंसहाय्यता बचत गटामुहे महिलांचा फायदा वरीलप्रमाणे झालेला असल्यामुळे आत्मीक समाधान प्राप्त झाले आहे.

**13. समस्यानिहाय वर्गवारी**

स्वयंसहाय्यता बचत गटामध्ये महिलांना विविध समस्यांना समोर जावे लागेल अशा समस्यांचे वर्गवारी खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक 13**

**समस्यांचे तपशील**

| अ | प्रशासकीय समस्या | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | स्वयंसहाय्यता बचत गट संख्या | प्रतिशत |
| 1 | मार्गदर्शनाचा अभाव | 2 | 1.90 |
| 2 | सभेत गैरहजर | 02 | 1.90 |
| 3 | अवेळी सभा | 2 | 1.90 |
| 4 | ग्रामसभेत हजर न राहणारे | 1 | 0.99 |
| 5 | भ्रष्टाचार | 2 | 1.98 |
| 6 | प्रसिद्धीचा अभाव | 4 | 3.96 |
| 7 | वेगळी बैठक व्यवस्थेचा अभाव | 4 | 3.96 |
| 8 | बँकेत जाण्याकरिता वाढता खर्च | 6 | 5.94 |
| 9 | बँकेत जाण्याकरिता वाढता खर्च (गावापासून दूरवर बँक) | 25 | 24.75 |
| 10 | सहयोगी कार्यकर्त्यांची दरमहा भेटी न घेणे | 3 | 2.97 |
| 11 | आत्मविश्वासाचा अभाव | 2 | 1.98 |
| | **एकूण** | **42** | **52.47** |

| ब. | वित्तीय समस्या | | |
|---|---|---|---|
| 1 | बँकेच्या मदतीचा अभाव | 11 | 10.89 |
| 2 | कर्जथकबाकी व अनियमित बचत | 6 | 5.94 |
| 3 | बिगर दारिद्र्य रेषेतील गटांना अनुदान नाही | 2 | 1.98 |
| 4 | नुकसान भरपाईचा अभाव | 1 | 1.98 |
| | **एकूण** | **20** | **19.8** |

| क. | विपणन समस्या | | |
|---|---|---|---|
| 1 | विपणन प्रशिक्षणासाठी उपस्थितीचा अभाव | 2 | 1.98 |
| 2 | विद्युत समस्या | 3 | 2.97 |
| 3 | विपणनाचा अभाव | 2 | 1.98 |
| | **एकूण** | **7** | **6.93** |

| ड. | सामुहिक समस्या | | |
|---|---|---|---|
| 1 | पुरुषांचा बचत गटाचा वाढता हस्तक्षेप | 2 | 1.98 |
| 2 | अ + ब एकूण | 82 | 81.18 |
| 3 | उत्तर न देणारे | 19 | 18.82 |
| | **एकूण** | **101** | **100** |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रशासकी समस्यांचे प्रमाण जास्त जाणवले.

**12.2 समस्या निर्मूलनाच्या स्त्रोतनिहाय वर्गवारी**

स्वयंसहायता बचत गटाच्या समस्या निर्मूलन करण्यासाठी मानद तत्वावर यंत्रणा वरीलप्रमाणे असून खालील स्त्रोतांचा वापर करतात.

**तक्ता क्रमांक 12.3**
**समस्यांचे तपशील**

| क्र. | स्त्रोत | स्वयंसहाय्यता बचत गट | प्रतिशत |
|---|---|---|---|
| 1 | चर्चा | 36 | 35.29 |
| 2 | कर्ज हप्त्यात सवलत | 11 | 10.78 |
| 3 | पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा व निर्णय | 11 | 10.78 |
| 4 | स्वयंसेवी सहयोगिनी | 16 | 15.68 |
| 5 | सदस्यांमध्ये सल्लामसलत | 8 | 7.84 |
| 6 | दंड | 1 | 0.98 |
| 7 | ज्येष्ठ व्यक्ती | 2 | 1.96 |
| 8 | बँकेशी संपर्क | 10 | 9.8. |
| 9 | सभेत निर्णय | 6 | 5.94 |
| | एकूण | 100 | |

स्रोत – क्षेत्रीय पाहणी

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की निर्मूलनाकरिता लोकशाही मार्गाचा अवलंब केला जात आहे. म्हणून स्वयंसहाय्यता बचत गट चळवळ ही लोकांची आहे. याची जाणीव सर्वांना असल्यामुळे स्वयंसहाय्यता बचत गट वृद्धिंगत होत आहे.

कोणतीही समस्या सोडविण्यासाठी चर्चा हा मार्ग सर्वाधिक उत्कृष्ट असतो. म्हणून 36 टक्के महिलांनी या मार्गाचा अवलंब केलेला आहे. त्यानंतर 16 टक्के महिलांनी सहयोगिनीद्वारे चर्चा करून मार्ग काढला आहे. याचाच अर्थ 50 टक्के महिला चर्चेच्या मार्गाचा अवलंब करतात.

**Reference**


1. Dr. V. V. Ghanekar, "Self Help Groups" Institution of Rural Development Pune, Jan. 2006.
2. Johnson S. and Rogaly Micro Credit and poverty Reduction Oxfarm London, 1977.
3. Karamkar K. G. - Rural Credit and Self Help Groups Micor Finance needs and Concepts in India, Saga Publication India Pvt. Ltd., New Delhi- 1990
4. Mahajan V. Ramola, Gupta B and Titus A. "Dhaka starting Micro Finance" Tata Mcgraw Hill, New Delhi - 2008.
5. Annual Report - Micro finance innovation 2005 NABARD, Mumbai
6. Micro Finance Hand Book, NABARD, Mumbai.
7. Shaik N. Meers and P. U. M. Rao It for empowerment of women yojana, Feb. 2003.
8. Saif Siddiqui - Rural Enterpreneurship and Poverty Allevitation.
9. Ritu Jain, R. K. Khushawada and Srivastava - Socio-economics Impact through Self Help Groups Yojana, July 2003, Vol. 47, No. 7
10. Sabyasachi Das - Self Help Groups and Micro Credit synergic Integration Kurukshetra, Vol. 51, No. 10, 2003.
11. डॉ. मुलाणी एम. यू. - अल्पबचत नियोजन, डायमंड प्रकाशन 2008
12. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे जिल्हा परिषद प्रगती अहवाल 2001-2008.
13. बारामती पंचायत समिती प्रगती अहवाल 2001-2008.

# श्रध्दांजली
# पॉल अँथनी सॅम्युअलसन

**सु. गो. भानुशाली**
मोबाईल : 09860092127

पॉल अँथनी सॅम्युअलसन यांचा जन्म लौकिक अर्थाने इंडियाना राज्याच्या गॅरी नावाच्या गावात झाला असला तरी डिसेंबर 2009 त्यांच्या प्रकाशित झालेल्या आठवणींमध्ये मात्र 'आपला जन्म वास्तविक अर्थाने शिकागो विश्वविद्यालयाच्या वर्गात दोन जानेवारी 1932 रोजी सकाळी आठ वाजता झाला' असे म्हटले आहे. त्यांचे शिक्षण शिकागो विद्यापीठात झाले. हार्वर्ड विश्वविद्यालयातून जोसेफ शुंपीटर आणि वॅसिली लिऑटिहाव्हे यांच्या हाताखाली शिक्षण घेऊन पीएच्.डी. ही पदवी प्राप्त केली. मॅसॅच्युसेटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये 1940 मध्ये प्राध्यापक म्हणून ते अध्यापन करू लागले. तेथे त्यांनी स्वत:च्या व्यक्तिमत्त्वावर आणि कर्तृत्वावर अर्थशास्त्राचा प्रभावी विभाग विकसित केला. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकन कोषागारात सात वर्षे सेवा केली. मॅसॅच्युसेटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये 1985 मध्ये मानद प्राध्यापक म्हणून गौरविण्यात आले. शिकागो विद्यापीठ आणि ओबर्लिन महाविद्यालयाने 1960 मध्ये डॉक्टर ऑफ लॉज आणि इंडियाना विश्वविद्यालय व ईस्ट इंग्लिया विश्वविद्यालयाने डॉक्टर ऑफ लेटर्स या मानद पदव्या त्यांना बहाल केल्या. अमेरिकन इकॉनॉमिक अॅसोसियशनने पहिले जॉन वेटस् क्लार्क पारितोषिक देऊन त्यांना गौरविले होते. नवअभिमत अर्थशास्त्रातील योगदानाबद्दल 1970 मध्ये त्यांना अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळविणारे ते पाहिले अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ होते. व्यष्टि अर्थशास्त्रातील पॅरेटोच्या लिखाणाचे पुनर्स्थापन तसेच नव केन्सवादाचा प्रसार त्यांनी आपल्या लिखाणातून केला.

1919-1921 चे आर्थिक अपसरण, मेक्सिकोमधून आलेले संपफोडे स्थलांतरीत श्रमिक, त्यानंतर आलेली तेजीची लाट व त्यानंतरची दुरावस्था या आर्थिक घटनांचा त्यांच्या अर्थविषयक विचारांवर कायमचा ठसा राहिला. समष्टी अर्थशास्त्रासंबंधाचे त्यांचे विचार या घटनांनुसार आकार घेत गेले. केन्सवादी अर्थशास्त्रातील ठराविक संकल्पनांचा ते पुरस्कार करीत असत. ते स्वत:ला मुक्त केन्सवादी (cafeteria keynesian) म्हणवीत असत. अर्थशास्त्राच्या विविध समस्यांच्या बाबतीत महत्तमीकरणाच्या मीमांसा पद्धतीच्या पद्धतशीर प्रायोजनाच्या आधारे त्यांनी अर्थशास्त्राच्या समस्या आणि अर्थशास्त्राची पृथक्करणाची तंत्रे यात एकात्मकता असल्याचे दाखवून दिले. अभिमत अर्थशास्त्र आणि केन्सवादी अर्थशास्त्र या मधील संकल्पनांच्या त्यांनी केलेल्या समायोजनात्मक अर्थशास्त्रालाच नव-अभिमत अर्थशास्त्र म्हटले जाते.

उदारमतवादी शिकागो अर्थशास्त्र संप्रदाय आणि त्याचे अध्वर्यु मिल्टन फ्रिडमन यांच्या विचाराचे सॅम्युअलसन कडवे टीकाकार होते. न्यूजविक साप्ताहिकातील स्तंभातून हे दोघे अर्थशास्त्रज्ञ आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या विचारांचे खंडन आणि स्वत:च्या विचारांचे समर्थन सतत करीत असत. सॅम्युअलसन भांडवलशाही विचारांचे खंदे पुरस्कर्ते होते आणि भांडवलशाही विचारपद्धतीला कमीपणा आणणाऱ्या विचारांचा ते खरपूस समाचार घेत असत. केंब्रिज भांडवल वादात ते ज़ोन रॉबिन्सनचे विरोधक होते; त्यातूनच त्यांनी पर्याय अथवा वैकल्पिक उत्पादन फलनाची संकल्पना (Surrogate production funtion) मांडली मात्र त्यानंतर त्यानी दिलदारपणे सौम्य भूमिका मांडली.

अर्थशास्त्राच्या विविध शाखांच्या अभ्यासामध्ये-संशोधनात त्यांना स्वारस्य होते; रूची होती. अर्थशास्त्राची अशी एकही शाखा नाही की त्यात त्यानी भरघोस संशोधन केले नाही आणि प्रत्येक संशोधनातून त्यांनी आपला ठसा उमटविला; प्रत्येक विचारातून भरीव योगदान दिले. त्यामुळेच विसाव्या शतकातील उत्तरार्धातील आर्थिक विचारांवर त्यांचा प्रभाव होता. व्यष्टि अर्थशास्त्रात उपभोगाचा सिद्धांत त्यांनी अभिव्यक्त पसंतीची संकल्पना मांडून पुढे नेला (1938,1947). विविधकरणाचे लाभ व परिपूर्णकता, बर्गसन-सॅम्युअलसन सामाजिक कल्याण फलन (1947,1950,1956), उत्पादनाचा आधुनिक सिद्धांत, तांत्रिक प्रगतीचा सिद्धांत (1972), पर्यायीत्व नसल्याचे पहिले लक्षणीय प्रमेय (non-substitution theory) (1951) असे अनेक क्रांतीकारी विचार त्यांनी मांडले. अभिव्यक्त पसंती सिद्धांत हा ग्राहकाच्या मागणीचा पर्यायी आणि जास्त व्यावहारिक सिद्धांत म्हणून मान्यता पावला. उपयोगितेचे मूल्यदर्शी आणि क्रमदर्शी विश्लेषण त्यामुळे मागे पडले.

समष्टी अर्थशास्त्रात कल्याणाचे अर्थशास्त्र, स्टॉलपर सॅम्युअल घटक समानीकरणाचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत (1948), गुणक-त्वरक समष्टी गतीशील प्रतिमान म्हणून व्यापारचक्राचा सिद्धांत, हिक्स व ॲलन यांनी

मागणीच्या सिद्धांतात घडवून आणलेल्या क्रांतीच्या चाळीसाव्या वर्धापन दिनानिमित्त केलेले विवेचन या सर्व बाबी युगप्रवर्तक ठरल्या. कार्यक्षम बाजारपेठ परिकल्पना (Efficient Markat hypotheis) आणि करार मूल्य (options pricing) या त्यांच्या उत्तर आयुष्यातल्या संकल्पनानी जगाला अभ्यासाची वित्तीय अर्थशास्त्र (finance economics) ही नवीन शाखा मिळवून दिली. या योगी अर्थशास्त्राज्ञाचे 13 डिसेंबर 2009 रोजी राहत्या घरी दुःखद निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्याच्या निमित्ताने हा लेख प्रपंच.

लेखाच्या दुसऱ्या भागात सॅम्युअलसन यांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या आणि संशोधन लेखांचा मागोवा घेण्यात आलेला आहे. तिसऱ्या भागात व्यष्टि अर्थशास्त्रातील त्यांच्या योगदानाचे व चौथ्या भागात समष्टी अर्थशास्त्रात केलेल्या सिद्धांताचे विश्लेषण केलेले आहे. लेखाच्या पाचव्या भागात कार्यक्षम बाजारपेठ परिकल्पना आणि करार मूल्य या संकल्पना विशद केल्या असून समारोप केला आहे.

सॅम्युअलसन यांच्या पीएच्.डी. प्रबंधावर आधारित Foundation of Economic Analysis या 1947 मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात त्यांनी अभिकर्त्यांच्या महत्तमीकरणाची वर्तणूक आणि आर्थिक व्यवस्थांमधील समतोलाच्या स्थैर्यीकरणाच्या बाबी या अर्थशास्त्रातील दोन मूलभूत शाखांमध्ये सर्वसाधारण गणिती संरचना कशी अनुस्यूत असते याचे विवेचन केले आहे. या पुस्तकांची विस्तृत आवृत्ती 1983 मध्ये प्रकाशित करण्यात आली.

पुस्तकाच्या पहिल्या भागात समतोलाची व्यवस्था, ग्राहकांची व उत्पादकांची महत्तमीकरणाची प्रवृत्ती, तुलनात्मक स्थितिक, उत्पादनपरिव्यय, उपभोक्त्याची प्रवृत्ती, निर्देशांक, मूल्यदर्शी उपयोगिता, कल्याणकारी अर्थशास्त्र या मुद्यांवर विवेचन केले आहे.

पुस्तकाच्या दुसऱ्या भागात समतोलावस्थेचे स्थैर्य, रेषीय व अरेषीय पद्धती, व्यापार चक्राची अंतर्जात प्रतिमाने, अंतर्जात-बहिर्जात मिश्र प्रतिमाने, रेषीय-प्रसंभाव्य प्रकारच्या मिश्र पद्धती यांचा ऊहापोह केला आहे. निर्देशांकाच्या सिद्धांतांचे प्रकटीकरण आणि कल्याणकारी अर्थशास्त्राचे विस्तृत विवेचन केले आहे. त्यात कल्याणकारी अर्थशास्त्रावरील थोडक्यात पण सर्वंकष विवेचन मांडण्यात आले आहे. करांच्या दरासारख्या प्राचलांमध्ये बदल झाल्यामुळे आर्थिक व्यवस्थेवर कसा परिणाम होतो याचे तौलनिक स्थितिक परिणामात्मक व गुणात्मक विवेचन दिले आहे. प्राचलांमध्ये बदल झाल्यावर समतोलात कसा बदल होतो याची चाचणीकरता येण्याजोगी भाकिते कशी असतील ते समतोलाच्या स्थैर्यावरून कसे अजमावता येईल हे सांगितले आहे. शेवटच्या भागात पृथक्करणात्मक पद्धतीची पुढील वाटचाल कशी असेल याचे विवेचन केले आहे. तुटीच्या अर्थभरण्यामुळे अल्प काळात सकारात्मक परिणाम होत असला तरी दीर्घ काळात बाजारपेठेत भांडवलाची गर्दी (Crowdingout) झाल्यामुळे भांडवल संचयावर विपरीत परिणाम होतो. तसेच लोकांचे आयुष्यमान वाढल्यामुळे पुनरूत्पादनाच्या दरावर कसा परिणाम होतो याचे विश्लेषण केले

आहे.

केनेथ ॲरो यांच्या म्हणण्याप्रमाणे सॅम्युअलसन यांचे पीएच्.डी. च्या प्रबंधावर आधारलेले, मूलगामी विवेचन असलेले महान साहित्य आहे. या पुस्तकातून सॅम्यूअलसन यांनी अर्थशास्त्राच्या विश्लेषणात उष्णता आणि तंत्रशास्त्राच्या परस्पर संबंधाचा वापर केला आहे. सॅम्युअलसन यांना दिलेल्या नोबेल पारितोषिकाच्या प्रकटनात या पुस्तकाचा उल्लेख 'स्थिर आणि गतीशील आर्थिक सिद्धांतनाच्या विकासाचे शास्त्रीय विवेचन करून आर्थिक विश्लेषणाचा दर्जा त्यामुळे उंचावला आहे' असा केला आहे.

अर्थशास्त्र (Economics) हे पॉल सॅम्युअलसन यांनी 1948 मध्ये लिहिलेले क्रमिक पुस्तक 2004 पर्यंत 18 आवृत्यात प्रकाशित झाले आहे. प्रत्येक आवृत्तीच्या 30000 प्रती विकल्या जात असत. या पुस्तकाचे एकेचाळीस भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. आर्थिक तत्त्वांच्या अभ्यासक्रमासाठी या पुस्तकातील विवेचन अधिकृत मानले जाते. केन्स यांच्या 'बचतीच्या विरोधाभासाचे' या पुस्तकात सुंदर विवेचन केले आहे. या पुस्तकाच्या सुरूवातीच्या आवृत्तीत मार्शल-केन्स यांच्या 'नवअभिमत संयोगीकरणाचे' विवेचन असले तरी नंतरच्या आवृत्त्यांमध्ये अर्थशास्त्राच्या विविध प्रवाहांचे सोप्या भाषेत विश्लेषण करण्यात आले आहे त्यात ऑस्ट्रियन आर्थिक संप्रदाय, संस्थात्मकवाद आणि मार्क्सवादी विचारणींचाही समावेश करण्यात आला आहे. सॅम्युअलसन दर तीन वर्षांनी या पुस्तकांचे आधुनिकीकरण करून प्रचलित समस्यांची, मुद्यांची भर घालीत असत. हे सर्व विश्लेषण स्पष्ट, काटेकोर आणि मनोरंजक असे. 1985 पासून बिल नार्धदोस हे सहलेखक म्हणून आले आणि नंतरच्या आवृत्त्या प्रामुख्याने त्यांनीच संपादित केल्या आहेत.

वित्तीय बाजार पेठा, चलनविषयक धोरण, बँकिंग, मध्यवर्ती बँक व चलन विषयक धोरण, चलनाच्या संख्यात्मक जगापासून व्याजदर जगापर्यंतचे रूपांतरण या पुस्तकात चर्चिले असून- चलनविषयक संक्रमणाच्या यंत्रणा विशद करणाऱ्या आकृत्या समाविष्ट केल्या आहेत.

नुकत्याच प्रकाशित झालेल्या या पुस्तकाच्या एकोणीसाव्या आवृत्तीत पेट्रोल वरील कर आणि रेशनिंग, कार्यकारी अधिकाऱ्यांची भरपाई, इराकमधील युद्धाचा खर्च, गृहवित्त आणि तोटा टाळण्याचा मार्ग, स्टॉलपर-सॅम्युअलसन सिद्धांत, वित्तीय गोंधळ आणि व्यापारचक्र या आजच्या घडीला जाणवणाऱ्या समस्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. विम्यावर एक स्वतंत्र विभाग आहे. बहुशाखी समतोलाचे महत्त्वाचे उदाहरण म्हणून दारिद्र्याच्या खोड्यांची, वित्तीय जागतिकीकरणाची रोख्यांच्या उभरत्या बाजारपेठेच्या प्रसारावरील प्रभाव दाखविणाऱ्या अशा आकृत्या दिल्या आहेत. बदलते व्याज दर असलेल्या खुल्या अर्थव्यवस्थांमधील चलन विषयक संक्रमणाच्या यंत्रणेचे उद्‌बोधक विवेचन केले आहे. सॅम्युअलसन यांचे हे दुसरे महत्त्वाचे पुस्तक.

या पुस्तकातील महत्त्वाचा सारांश असा की सॅम्युअलसन यांची धारणा अशी होती की गणित

अर्थशास्त्रीय विवेचनाचे एक प्रमुख साधन असल्यामुळे अर्थव्यवस्था आपोआप समतोल साध्य करते हे सिद्ध करता येते. अर्थशास्त्राला पदार्थविज्ञान शास्त्र आणि उष्णता आणि यांत्रिक काम यांच्या परस्पर संबंधाच्या (theremo dynamics) शास्त्रापासून खूप शिकण्यासारखे आहे अशी त्यांची धारणा आहे.

रॉबर्ट डॉर्फमन, पॉल सॅम्युअलसन आणि रॉबर्ट एम्. सोलो यांचे Linear Programming and Ecnomic Analysis हे पुस्तक 1987 मध्ये प्रकाशित झाले. या पुस्तकात उत्पादनाचा सिद्धांत, कल्याणकारी अर्थशास्त्र यांचे विवेचन रेषीय प्रायोजना (linear progamming) आधारे करण्यात आले आहे. जॉन नी.डँनटिझग यांचे रेषीय प्रायोजना (1947), वॅसिली लिऑटिएव्ह यांचे निविष्टी–उद्दिष्टी पृथक्करण (1936) व जॉन फॉन्यूमन यांचा द्युत सिद्धांत (1928) ही आर्थिक विश्लेषणाची प्रमुख आयुधे आहेत असे सॅम्युअलसन यांचे प्रतिपादन होते. ही तीनही आयुधे वेगवेगळ्या वेळी आणि वेगवेगळ्या पद्धतीने विकसित झाली असली तरी ती एकत्र उपयोगात आणली जात आहेत. रेषीय प्रायोजन हा रेषीय अर्थशास्त्राचा गाभा आहे. कारण रेषीय प्रायोजना व्यावहारिक उपयोगासाठी वापरता येते. एखादी एकजिनसी वस्तू अनेक ठिकाणी उत्पादन व तशीच अनेक ठिकाणी सेवन केली जात असेल आणि प्रत्येक ठिकाणच्या एकूण उत्पादनाची व सेवनाची मात्रा माहित असेल तर उपभोगाच्या प्रत्येक ठिकाणी उत्पादनाच्या प्रत्येक ठिकाणाहून किती खरेदी करावी म्हणजे किमान वाहतूक खर्च करून सर्व ठिकाणची मागणी पूर्णपणे भागविली जाईल ही समस्या रेषीय प्रायोजनाने सोडविता येते. रेषीय प्रायोजनाच्या सहाय्याने व्यवसाय संस्थांच्या कार्याचे परीक्षण करता येते. वॉलरस यांच्या सर्वसाधारण समतोलाच्या न सोडविता आलेल्या समस्या रेषीय प्रायोजनाच्या सहाय्याने सोडविता येतात. त्याचे विवेचन या पुस्तकात केले आहे. सॅम्युअलसन यांचे हे तिसरे महत्त्वाचे पुस्तक.

सॅम्युअलसन यांचे बहुतेक सर्व लिखाण नियतकालिकांमधून संशोधन लेखांच्या स्वरूपात प्रकाशित झालेले आहे. आपल्या पन्नास वर्षांच्या कार्यशील कारकीर्दित साधारणपणे दरमहा एक याप्रमाणे त्यांनी जवळ जवळ 388 संशोधन लेख प्रकाशित केले. अर्थशास्त्राच्या व्यष्टि आणि समष्टी शाखांमधील त्यांच्या काही महत्त्वाच्या योगदानाचे विवेचन पुढे दिले आहे.

वयाच्या एकविसाव्या वर्षी पीएच्.डी. चे विद्यार्थी असताना त्यांनी 'A Note on Measurment of Utility' हा पहिला लेख लिहिला होता. पुढे 1938 मध्ये अभिव्यक्त पसंतीचा सिद्धांत उपयोगिता सिद्धांताला पर्यायी सिद्धांत म्हणून मांडला. अभिव्यक्त पसंतीचा सिद्धांत उपभोक्त्याच्या ग्राहकाच्या वर्तणुकीचे सर्वगामी स्पष्टीकरण देतो. उपभोक्त्याला मिळणारी उपयोगिता मोजता येत नाही. त्यामुळे सीमांत पर्यायता दरावर आधारलेले मागणीचे विश्लेषण शास्त्रीय कसोट्यांवर उतरू शकत नाही. म्हणून ग्राहकांच्या सवयींचे निरीक्षण करून उपभोक्ता कोणती वस्तू अथवा वस्तूसमुह पसंत करतो यावरून त्याची अभिव्यक्ती जाणता येते. त्याचा मागणीच्या

सिद्धांताबरोबर सहज समन्वय साधता येतो.

दोन वस्तूंच्या दोन वस्तूसमूहातून, ते दोन्ही वस्तूसमूह विकत घेण्याची पात्रता असून सुद्धा ग्राहक एक वस्तूसमूह निवडतो याचा अर्थ तो त्या वस्तूसमूहाची पसंती व्यक्त करीत असतो. दोन वस्तूंचे, अ,ब आणि क असे वस्तूसमूह असतील आणि उपभोक्ता ब वस्तूसमूहापेक्षा अ वस्तूसमूह आणि क वस्तूसमूहापेक्षा ब वस्तूसमूह पसंत करीत असेल तर संक्रामकता (transitivity) तत्त्वाप्रमाणे उपभोक्त्याला क वस्तूसमूहापेक्षा अ वस्तूसमूह जास्त पसंत आहे असे दिसून येते. यामुळे अगोदरच विकसित करण्यात आलेल्या ग्राहक सिद्धांतातील तटस्थता वक्रावर उपभोक्त्याची पसंती जास्त स्पष्टपणे मांडता येते. अ आणि ब वस्तू समूहापैकी उपभोक्त्याने अ वस्तूसमूह निवडला असेल तर उपभाक्ता ब वस्तूसमूह असणारा कोणताही वस्तूसमूह निवडणार नाही ही संकल्पना अभिव्यक्त पसंतीचे अबलगृहितक (Weak axioms) होय. अभिव्यक्त पसंतीच्या सिद्धांतात उपभोक्त्याच्या पसंतीचे अवलोकन करून किंमतीत झालेल्या बदलामुळे उपभोक्ता पूर्वीपेक्षा जास्त चांगले समाधान (better off) मिळवू शकतो का हे सिद्ध करता येते.

सॅम्युअलसन यांनी 1938 मध्ये मांडलेला अभिव्यक्त पसंतीचा सिद्धांत अगोदरच्या उपयोगिता सिद्धांताला पर्यायी होता असे त्यांचे सुरूवातीचे प्रतिपादन होते. पण 1950 मध्ये त्यांनी असे मान्य केले की अभिव्यक्त पसंतीचा सिद्धांत प्रत्यक्षात उपयोगिता सिद्धांताचे समर्थन करणारा होता. स्टॅन्लेवाँग आपल्या 'Foundations of Paul Samuelson's Revealed Preference Theory: A Study by the Method of Rational Reconstruction' या पुस्तकात अभिव्यक्त पसंतीचा सिद्धांत हे एक फसलेले संशोधन आहे अशी टीका करतात.

व्यष्टि अर्थशास्त्रातील सॅम्युअलसन यांचे आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे पर्यायी उत्पादन फलन (Surrogate Production Function)होय. नट विकसेल यांनी निविष्टि आणि उद्दिष्टि मधील संबंध प्रस्थापित करणाऱ्या उत्पादन फलनाचे संकल्पन केले होते. पुढे चार्लस् कॉब आणि पॉल डग्लस यांनी सांख्यिकी पुराव्याच्या आधारे त्याचे फलन स्पष्ट स्वरूपात मांडले ते असे

$$Y = AL\ K^{\beta}$$

जेथे Y= उत्पादन केलेल्या उद्दिष्टिचे चलनातील मूल्य,

L = श्रमिक निविष्टि,

K = भांडवल निविष्टि,

A = एकूण उत्पादन घटकांची उत्पादकता, आणि

आणि β = श्रमिक व भांडवल यांची अनुक्रमे उत्पादक लवचिकता.

उपलब्ध तंत्रज्ञानामुळे यांचे मूल्य स्थिर असते. इतर परिस्थिती कायम असताना उत्पादनातील श्रमिकांची अथवा/आणि भांडवलाची मात्रा वाढविल्यास उत्पादनात होणारा बदल उत्पादक लवचिकतेच्या सहाय्याने मोजता येतो. कॉब डग्लस उत्पादन फलन अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाच्या ज्ञानावर आधारून

विकसित केलेले नव्हते. तसेच, अर्थव्यवस्थेतील विविध विभागात $\alpha$ आणि $\beta$ यांचे गुणांक, तसेच निरनिराळ्या वेळी ते स्थिर का असतात याचे स्पष्टीकरण कॉब डग्लस उत्पादन फलनामध्ये दिलेले नाही.

केंब्रिज अर्थशास्त्र संप्रदायाच्या भांडवलाच्या सिद्धांताचा भाग म्हणून मांडलेल्या कॉब–डग्लस उत्पादन फलनात बदलते उत्पादन तंत्र, संसाधनांचे बदलते स्त्रोत यांचा विचार केला जात नाही. त्याचा अंतर्भाव करणारे पर्यायी उत्पादन फलन (Surrogate production function) सॅम्युअलसन यांनी मांडले. या उत्पादन फलनाला सॅम्युअलसन यांनी पर्यायी (Surrogate) उत्पादन फलन असे नाव दिले. याचा अर्थ हे फलन परिपूर्ण नसण्याची शक्यता आहे अशी त्यांची धारणा होती. हे फलन पुढील पाच गृहीतांवर आधारलेले आहे. 1) रेषीय तंत्रज्ञान असलेली बंदिस्त अर्थव्यवस्था आहे. 2) स्थिर अनुमाप प्रत्याय अनुभवाला येत आहे. 3) बाजारपेठ पूर्ण स्पर्धात्मक आहे. 4) श्रमिक समान गुणवत्तेचे आहेत, 5) इतर वस्तूंचा उपयोग करून उद्योगात एकच वस्तू उत्पादन केली जात आहे. 6) उत्पादन पद्धती मर्यादित संख्येच्या आहेत. म्हणजे दिलेल्या नफ्याच्या दराला प्रत्येक उद्योगात उत्पादन पद्धतीचे ठराविक संयुक्तीकरण स्वीकारले जाते.

सर्व उत्पादन साधनांचे किंमत अनुपात सारखे असल्यामुळे उत्पादन साधने सारख्या प्रमाणात वापरली जात असतील तर पर्यायी उत्पादन फलनात उत्पादन तंत्राचा समावेश करता येतो असे सॅम्युअलसन यांचे म्हणणे होते व त्यासाठी त्यांनी नवे उत्पादन फलन विकसित केले. स्पर्धात्मक दृष्टच्या ठरलेल्या किंमतीना प्रति श्रमिकामागे असलेल्या भांडवलाचे मूल्य (j) आणि प्रतिश्रमिक केल्या जाणाऱ्या उत्पादनाचे मूल्य यांच्यामधील संबंध न बदलणारा आणि सतत असेल तर उत्पादन फलन सिद्ध करता येते. असे उत्पादन फलन उत्पादन घटकांच्या सारख्या सघनतेला अनुभवाला येते. मात्र उत्पादन घटकांची वेगवेगळी सघनता घेऊन अनेक क्षेत्रांसाठी सुद्धा पर्यायी उत्पादन फलन विकसित करता येते.

उझावा–सॅम्युअलसन पर्यायी उत्पादन फलनात प्रती नग किमान खर्च फलन q and w अवकाशात $C(q,w) \min (q^a k + w^a L)$ असे मांडता येते. म्हणजे $\frac{\Delta c}{\Delta q} \Big/ \frac{\Delta c}{\Delta w} K(w)$ असे फलन तयार होते.

सॅम्युअलसन यांच्या म्हणण्याप्रमाणे एकूण भांडवलाची जॉन बेटस् क्लार्क यांची संकल्पना न वापरता पर्यायी उत्पादन फलनाच्या सहाय्याने आपल्याला बहुजिनसी भांडवली वस्तुंच्या पूर्ण पृथक्करणाच्या सहाय्याने भांडवलाचा सिद्धांत मांडता येतो. रेषीय प्रायोजनाच्या साधनाचा त्यासाठी वापर करावा लागतो. बदलते उत्पादन तंत्र, मानवी आणि नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता, आवडी–निवडीचा आकृतीबंध यासारख्या व्यष्टि अर्थशास्त्रातील बाबींचा अभ्यास करून पर्यायी उत्पादन फलनाच्या सहाय्याने वेगवेगळ्या प्रकारच्या श्रमिकांमध्ये आणि विविध प्रकारच्या मत्ताधारकांमध्ये उत्पन्नाचे कल कसे वाटले जातात. याचा अभ्यास करता येतो.

समष्टी अर्थशास्त्राच्या शाखेतही सॅम्युअलसन यांचे योगदान तेवढेच मूलगामी आणि महत्त्वाचे आहे. बर्गसन-सॅम्युअलसन सामाजिक कल्याण फलन हा त्यातील एक महत्त्वाचा सिद्धांत. आब्राहाम बर्गसन यांनी 1938 मध्ये सामाजिक कल्याण फलनाची संकल्पना मांडली. सामाजिक कल्याण फलन म्हणजे अशी एक प्रक्रिया अथवा नियम आहे की ज्यात प्रत्येक व्यक्तीगत पसंती क्रमाच्या संचात (उदा. $R_1$ ------- $R_n$) विविध सामाजिक परिस्थितीत सामाजिक पसंती दिलेली असते. समाजाचे कमाल कल्याण ठरविणारी परिस्थिती निश्चित करण्यासाठी आवश्यक असणारे मूल्य निश्चितीचा निर्णय अचूकपणे मांडणे हा या सामाजिक कल्याण फलन सांगण्याचा हेतू होता. हे फलन वास्तव मूल्य सांगणारे आणि विकलनीय (differentiable) आहे. सामाजिक कल्याण फलनात व सामाजिक पसंतीक्रम व्यक्तीगत मूल्यामधील बदलांशी संबंधित असतो.

'क्ष' आणि 'य' यामधील समाजाचा पसंती पर्याय समाजातील व्यक्तींच्या पसंतीक्रमावरून ठरत असतो. समाजातील काही व्यक्ती 'य' पेक्षा 'क्ष' ला पसंती देत असतील, काही 'क्ष' पेक्षा 'य'ला पसंती देत असतील आणि काही तटस्थ असतील तर त्यावरून आपल्याला समाजाचा पसंतीक्रम निश्चितपणे ठरविता येतो. समाजातील वातावरण बदलत असेल पण व्यक्तींचा पसंतीक्रम स्थिर रहात असेल तर व्यक्तींनी केलेल्या विविध पसंतीचा एकमेकांशी सुसंगत संबंध असतो. या विरूद्ध समाजातील वातावरण स्थिर असेल पण समाजातील व्यक्तींच्या मूल्यात बदल होत असेल तर केलेल्या विविध पसंतीमध्ये ठराविक सुसंगती आढळते.

या फलनात श्रमिकांसह समाजाने वापरलेली साधने वापरून उत्पादन केलेल्या आणि सेवन केलेल्या वस्तू यांचे विश्लेषण केलेले असते. अशा परिस्थितीत समाजाचे कल्याण कमाल असण्यासाठी -1) एक डॉलर मूल्याचे सीमांत कल्याण प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक वस्तूसाठी सारखे असले पाहिजे, 2) एक डॉलर मूल्याच्या श्रमाचे अकल्याण (diswelfare) प्रत्येक श्रमिकाने उत्पादन केलेल्या वस्तूच्याबाबतीत सारखे असले पाहिजे, आणि 3) प्रत्येक संसाधनाच्या प्रत्येक एककाचे सीमांत डॉलर मूल्य वस्तूच्या सीमांत उत्पादकते एवढे असले पाहिजे.

सॅम्युअलसन यांनी 1947 मध्ये असे प्रतिपादन केले की कोणत्याही नैतिक स्वभावातील विशेष लक्षण स्पष्ट करण्याइतकी सामाजिक फलनात लवचिकता असते. त्यातून 1) समाजाला आपल्या पसंतीची पूर्ण आणि संक्रामक पसंती निश्चित करता येते. त्यातून उत्तम, चांगले, वाईट आणि तटस्थ अशा अवस्था दाखविता येतात. 2) कल्याण निर्देशांकातीलअगणित संचांपैकी एक संच आणि त्याचा मूल्यदर्शी निर्देशांक स्वभावाचे लक्षण स्पष्ट करीत असतो.

दोन देशांमध्ये मुक्त व्यापार असल्यास वस्तूंच्या सापेक्ष किंमतीतील बदलामुळे त्या वस्तू उत्पादन करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या घटकांच्या किंमतीतही बदल होतात. हा नियम स्टॉलपर-सॅम्युअलसन प्रमेय म्हणून मान्य पावला आहे. भांडवली वस्तूंच्या जगातील किंमती वाढल्या तर

त्या अनुषंगाने भाटकाचे (rent) दर सापेक्षतेने वाढतील व श्रमिकांच्या वेतन दरात सापेक्ष घट होईल. श्रमप्रधान वस्तूंच्या किंमती वाढल्यास श्रमिकांचे वेतनदर सापेक्षतेने वाढतील व भाटकाचे दर सापेक्षतेने कमी होतील.

मुक्त आणि स्पर्धात्मक आंतरराष्ट्रीय व्यापारपद्धतीमुळे व्यापार केल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किंमतीबरोबरच उत्पादन घटकांच्या किंमती बदलतात. हे उत्पादन घटक किंमत समानीकरण प्रमेय होय. हेक्स्चर-ओहलीन सिद्धांताचा हा महत्त्वाचा निष्कर्ष होय. पण प्रत्यक्षात या निष्कर्षाला पुरावा सापडत नाही. प्रगतीच्या वेगवेगळ्या टप्प्यावर असलेल्या देशांमध्ये व्यापार होऊन सुद्धा भांडवलावरील भाटक प्रत्याय आणि श्रमिकांच्या वेतनदरात समानता येत नाही.

गुणक पृथक्करण आणि त्वरण तत्त्व यामधील परस्पर व्यवहारांमुळे व्यापार चक्र निर्माण होते. सॅम्युअलसन यांनी संकल्पित केलेल्या व्यापार चक्राच्या या सिद्धांतातून व्यापार चक्राचा आधुनिक दृष्टिकोन विकसित झाला. दीर्घकालीन समतोलातील उत्पादनामुळे स्वायत्त खर्च तेवढाच होत असतो. राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या बदलांमुळे उपभोगात बदल होतात त्यामुळे उत्प्रेरित (induced) गुंतवणूक होत असते. या दोन तत्त्वांमधील परस्पर व्यवहारांमुळे देशात तेजी मंदीची आवर्तने उठतात. शासनाच्या वाढत्या खर्चामुळे गुंतवणूक वाढते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न आणखी वाढते. त्यामुळे रोजगार वाढतो व भांडवलदार आणखी गुंतवणूक करून उत्पादन वाढवितात. शासनाने खर्च कमी केल्यामुळे गुणक व त्वरक ऋण दिशेने कार्य करतात. त्यामुळे मंदी येते.

t या वेळेला Y हे राष्ट्रीय उत्पन्न असते; ते C, I आणि G यानी तयार झालेले असते. म्हणून $Y_t = C_t + I_t + G_t$ उपभोक्ते आपल्या भूतकाळातील उत्पन्नाचा ठराविक भाग खर्च करीत असतात. म्हणजे $Ct = a\ Yt\text{-}1$ प्रेरित गुंतवणूक उपभोगातील बदलाच्या ठराविक प्रमाणात असते. म्हणजे.

$$I_t = b\,(C_t - C_{t-1}) = ab\,(Y_{t-1} - Y_{t-2})$$
$$Y_t = G + a\,(1+b)\,Y_{t-1} - ab\,Y_{t-2}$$

म्हणून $\overline{Y} = \frac{1}{1-a}\,\overline{G}$ होय.

व्यष्टि आणि समष्टि अर्थशास्त्रातील सॅम्युअलसन यांच्या योगदानाचे विवेचन केल्यानंतर आणखी एका मुद्याचा उहापोह करावयाचा आहे. सॅम्युअलसन यांना आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षी आपण शैक्षणिक दृष्ट्या स्पर्धात्मक राहण्यासाठी अर्थशास्त्राच्या कोणत्यातरी शाखेत विशेषीकरण केले पाहिजे याची जाणीव झाली. त्या दृष्टीने गणिताशी संबंधित असलेल्या वित्तीय अर्थशास्त्रात त्यांनी विशेष प्राविण्य संपादन करून कार्यक्षम बाजारपेठ परिकल्पना (efficient market hypothesis) मांडली आणि विकल्पाचे मूल्य (options pricing) यावर मूलभूत लिखाण केले. त्यातूनच ब्लॅक-शोल्स विकल्प मूल्य प्रतिमान विकसित करण्यात आले आणि त्यात विशेष संशोधन केल्याबद्दल रॉबर्ट मेर्टोन यांना 1997 चे नोबेल पारितोषिक मायरॉन एस्. शोल्स यांच्याबरोबर विभागून देण्यात आले. या दोन्ही संकल्पनांचे विवेचन थोडक्यात पुढे दिले आहे.

समभाग, रोखे, स्थावर मत्ता यासारख्या खरेदी विक्री केल्या जाणाऱ्या जिंदगींच्या किंमती ज्ञात असलेल्या माहितीवरून ठरत असतात आणि नवीन माहिती उपलब्ध होईल तशा या किंमती बदलत असतात. कार्यक्षम बाजारपेठ संकल्पनेप्रमाणे बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या माहितीच्या उपयोग करून बाजारपेठेत अपेक्षित असलेल्या नफ्यापेक्षा जास्त नफा मिळविणे अशक्य आहे; शक्य झालेच तर ते नशीबाच्या सहाय्याने शक्य होऊ शकते. कार्यक्षम बाजारपेठ परिकल्पनेत माहिती अथवा बातमी या शब्दाला विशेष अर्थ आहे. आत्ता पेठेत माहीत नसलेल्या बाबींचा उपयोग किंमती बदलण्यासाठी होत असेल त्या सर्व बाबी म्हणजे माहिती अथवा बातमी होत.

कार्यक्षम बाजारपेठा दोन प्रकारच्या असतात. अर्धसबळ आणि सबळ. अर्धसबळ कार्यक्षम बाजारपेठ परिकल्पनेत लोकांना उपलब्ध नवीन माहितीशी समभागाच्या किंमती अभिनतीविरहीत (unbiased) पद्धतीने त्वरित जुळवून घेता येतात. म्हणजे त्या माहितीवर आधारून कोणालाही अतिरिक्त नफा मिळविता येत नाही. मूलभूत पृथक्करणाच्या अथवा तांत्रिक पृथक्करणाच्या सहाय्याने कोणालाही निश्चितपणे जादा परतावा मिळविता येत नाही.

सबळ कार्यक्षम बाजारपेठ परिकल्पनेत समभागांच्या किंमतीत खाजगी तसेच सार्वजनिक माहितीचे प्रतिबिंब उठत असते; पण कोणालाही जादा परतावा मिळत नाही. खाजगी माहितीचे सार्वजनिक माहितीत रूपांतरण करण्यात कायदेशीर अडथळे असल्यास सबळ कार्यक्षम बाजारपेठ परिकल्पना अस्तित्वात येऊ शकत नाही.

समभागांच्या अंगभूत मूल्याकडे लक्ष न देता निवेशक सारासार विचार सोडून गुंतवणूक करतात. आत्ताच्या जागतिक मंदीला कार्यक्षम बाजारपेठ परिकल्पना कारणीभूत आहे. जिंदगीचा बुडबुडा फुटण्याच्या भयाबद्दल वित्तीय बाजारपेठेतील नेतृत्वाने केलेल्या न्यून अनुमानामुळे ही मंदी निर्माण झाली.

सॅम्युअलसन यांनी 1965 मध्ये दीर्घकालीन विकलजाचा विचार करून आणि भूमितीय ब्राउशियन प्रस्तावाचा उपयोग करून यादृच्छिक वर्तणूकीचे प्रतिमान तयार केले. बॅचलर (Bacelier) यांनी 1900 मध्ये फ्रेंच शासनाच्या कर्ज रोख्यांच्या नमुनेदार विकलजांचे ब्राउनियन प्रस्तावाचे प्रतिमान तयार केले होते. सॅम्युअलसन यांनी आपल्या प्रतिमानात वापरात असलेल्या विकलजांच्या यादृच्छिक मूल्याचा सिद्धांत मांडला. त्यासाठी त्यांनी दोन गृहीते विचारात घेतली. ती अशी – 1) रोख्यांच्या ठराविक किंमतीवर $\alpha$ परतावा मिळेल. 2) ज्या तारखेला विकलजाची किंमत ठरविली आहे त्या तारखेला विकलज विकलेल्या दिवशी मिळालेली किंमत $\beta$ या दराने करमित (discount) करावी. व्यवहारात संबंधित असलेला रोखा आणि विकलज यांच्या जोखमीच्या वैशिष्ट्यावर ही दोन गृहीतके अवलंबून असतात. मात्र पेठेत यातला कोणताही घटक दृश्य स्वरूपात नसतो. दलालांच्या जोखीम टाळण्याच्या प्रमाणावर या दोन घटकांचे वेगवेगळे मूल्य ठरत असते. त्यामुळे सॅम्युअलसन यांचे प्रतिमान अनिश्चित स्वरूपाचे असल्याचे जाणवते. म्हणूनच त्यातून जोखीम टाळण्याच्या विविधतेत विक्रेत्याला अथवा ग्राहकाला विकलजाची किंमत ठरविण्याचे ठोस

सूत्र सापडत नाही.

एखाद्या व्यवसाय संस्थेचे समभाग विकत घेण्यासाठी दलालाकडे कोणी आल्यास आणि त्या दलालाकडे ते समभाग नसल्यास दुसऱ्या दलालाकडून तो ते समभाग ठराविक तारखेला ठराविक किंमतीला परत देण्याचे मान्य करून उसने घेतो. ठरलेल्या दिवशी त्या समभागांची बाजारातील किंमत कमी असल्यास ते समभाग विकत घेऊन त्या दलालाला देतो. पण किंमत जास्त असल्यास फरकाचे पैसे देऊन व्यवहार पूर्ण करतो. प्रत्यक्षात हे एवढे सरळपणे होत नसते. प्रत्यक्षात गतीशील बचाव व्यवहार हे अनिश्चित असतात. त्या दलालाची बचाव व्यूह आणि समभाग उसने घेणारा दलाल समभाग उसने देणारा दलाल आठवड्यातून दोन तीन वेळा, एवढेच काय पण दिवसातून दोन तीन वेळा बचाव बोली करू शकतो. समभाग उसने घेणाऱ्या दलालाने आपला मोहरा बदलला तर समभाग देणाऱ्याला परत बचाव करता येतो. त्यामुळे पर्यायी मूल्या (option pricing) मध्ये बरीच जोखीम असते.

सॅम्युअलसन केवळ सव्यसाची अर्थशास्त्रज्ञ नव्हते. ते American Academy of Arts and Sciences चे सभासद होते. American Philosophical Society फेलोचे होते. ब्रिटीश ॲकॅडॅमचे फेलो होत. Bhi Beta Kappa या संस्थेचे सभासद होते. अमेरिकन अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्षही होते.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष केनेडी यांचे मानद सल्लागार म्हणून राहण्याच्या घरांची समस्या सोडविण्यासाठी त्यांनी गहाणपटीचे दर कमी करण्याची, गहाण वटीवर कराव देण्याची, विम्याची फी कमी करण्याची आणि कर्ज परत फेडीचा कालावधी वाढविण्याची शिफारस केली होती. 2007-2008 च्या वित्तीय मंदीचे मूळ गहाणवटीच्या या निर्नियंत्रिकरणात आढळून येते. योगायोगाचा भाग असा की मंदीतून सावरण्यासाठी बँकांना वित्तीय सहाय्य (bail out) देण्याचे धोरण आखणाऱ्या राष्ट्राध्यक्ष ओबामा यांच्या सल्लागारांमध्ये सॅम्युअलसन यांचे पुतणे लॅरी समर्स यांचा सक्रीय सहभाग होता.

श्रध्दांजलीपर या लेखाच्या शेवटी असा प्रश्न उभा रहातो की सॅम्युअलसन यांच्या पश्चातचे अर्थशास्त्र कसे असेल. मिल यांचे Principles, ॲडॅम स्मिथ यांचे An Enquiry into the Nature and Causes of Wealth of Nations, आल्फ्रेड मार्शल यांचे Principles of Economics या युग प्रवर्तक पुस्तकांनी अर्थशास्त्राला समाजोपयोगी धोरणे आखण्याची दिशा दाखविली. सॅम्युअलसन यांनी आपल्या लिखाणातून अर्थशास्त्राच्या गणिती करणाच्या युगाची सुरूवात केली. नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदायाचे पुनर्स्थापन केले, मार्शल–केन्स यांच्या नवअभिमत विचारांचे एकीकरण (Snythesis) केले. उष्णता आणि यांत्रिक काम यांच्या परस्पर संबधांच्या शास्त्राचा (thermo dynamics) समावेश केला. नोबेल पारितोषिकाच्या मानपत्रात त्यांच्या Fondations of Econmic Analysis या पुस्तकाचा उल्लेख 'स्थिर आणि गतीशील आर्थिक सिद्धांतनाच्या विकासाचे हे शास्त्रीय विवेचन आहे' असे केला आहे. अशा युगधुरंधर अर्थशास्त्रज्ञाला 'अर्थसंवादची' विनम्र श्रध्दांजली.

## पीएच. डी. प्रबंधाचा सारांश

# जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र - तुलनात्मक अध्ययन

**राधेशाम किसनराव राऊत,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख, संत रामदास महाविद्यालय,
घनसावंगी, जि. जालना
मोबाईल : 9423274488

**(संशोधकाने प्रा. डॉ. आर.एस. सोळुंके, प्राध्यापक, डॉ. बा.आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली 'जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र– तुलनात्मक अध्ययन' या विषयावर डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्या पीएच.डी. प्रबंधाचा हा सारांश.)**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासनाची स्थापना 1 मे 1960 या दिवशी झाली. महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश हे विभाग आहेत. मराठवाडा विभाग हा महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण असे आठ जिल्हे असलेला विभाग आहे. औरंगाबाद, जालना, बीड,उस्मानाबाद, लातूर,हिंगोली,परभणी आणि नांदेड यांचा मराठवाड्यात समावेश होतो.मराठवाडा विभागात नैसर्गिक साधनसामग्रीची कमतरता आहे. मराठवाड्याचा विकास घडवून आणण्यासाठी मोठया प्रमाणावर विकासात्मक योजना या विभागात राबविण्याची आवश्यकता आहे.

औद्योगिक मागासलेपणाचे खरेखुरे चित्र लोकांसमोर यावे व त्याचा खोलवर अभ्यास व्हावा या हेतूने केंद्र सरकारने काही समित्या नेमल्या व त्यांच्या मदतीने प्रादेशिक असमतोलाच्या समस्येवर ठोस तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला.

औद्योगिकदृष्ट्या मागासलेले प्रदेश निश्चित करण्यासाठी 1968 मध्ये पांडे समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने 1969 मध्ये केंद्र शासनाला शिफारशी केल्या.

1) औद्योगिक दृष्ट्या मागास राज्यात काही मागास जिल्ह्यांची निवड करून त्यांना विशेष प्रोत्साहन व उत्तेजन द्यावे.
2) औद्योगिक दृष्ट्या मागास प्रदेश म्हणून जिल्हा हा एक घटक असावा.

पांडे समितीने असे सुचविले की, 4 थ्या पंचवार्षिक योजनेमध्ये मागासलेल्या प्रदेशांच्या विकासासाठी विशेष उत्तेजन देण्याच्या दृष्टीने प्रारंभी 20 ते 30 जिल्हयांची निवड करावी. या मागास जिल्हयांमधून विकासासाठी प्रयत्न केंद्रीत करता येतील व नंतर या योजनेचा सर्व जिल्हयात विस्तार करता येईल.

अविकसित भागात जास्तीत जास्त उद्योग सुरू व्हावे म्हणून त्यांना कोणत्या वित्तीय आणि इतर सवलती द्याव्यात या संबंधी वांच्छू समितीची नियुक्ती करण्यात आली.

राज्य पातळीवरील महाराष्ट्राचा सखोल अभ्यास करण्यासाठी 1983 मध्ये मागास प्रदेशाला अनुशेष शोधण्यासाठी गाडगीळ समिती आणि प्रा. डॉ. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिती (Fact Finding Committee) ची स्थापना झाली.

नवीन उद्योग उभारू इच्छिणाऱ्या उद्योजकांस निरनिराळ्या संस्था/ कार्यालये यांच्याकडे जावे लागत असे. या संस्थांची मुख्य कार्यालये बहुधा राजधानीच्या ठिकाणी असल्यामुळे अर्ज करणे, आवश्यक ती माहिती पुरविणे व स्वत:ची योजना सर्वांना पटवून देणे यामध्ये ग्रामीण उद्योजकांचा बराच वेळ पैसा वाया जात असे. साहजिकच योजना मंजूर होऊन नवीन उद्योग प्रत्यक्ष सुरू होण्यास अवास्तव विलंब लागल्यास उद्योजक नाउमेद होत. हे सर्व टाळण्यासाठी जिल्ह्याचे ठिकाण हा जिल्ह्यांचा औद्योगिकीकरणाचा केंद्रबिंदू मांडण्यात आला. ग्रामीण भागात लघुउद्योग काढू इच्छिणाऱ्या उद्योजकांना आवश्यक ते सर्व सहाय्य एकाच ठिकाणी मिळावे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. म्हणून भारतात केंद्र सरकारने 1 मे 1978 ला जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना केली.

**संशोधन विषयाची निवड :**

1978 ला जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला चालना मिळाली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने 2 मे 1981 ला जालना आणि 16 ऑगस्ट 1982 रोजी लातूर जिल्ह्याची स्थापना केली. या अनुषंगाने जालना जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना 1981-82, तर लातूर जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना 1982-83 ला करण्यात आली. मराठवाड्याची औद्योगिक रचना ही बरीच भिन्न आहे. येथील सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहाराचे मुख्यालये औरंगाबाद येथे केंद्रित झालेले आहेत. ही दोन्ही जिल्हे मराठवाडा विभागात येत असल्या कारणाने जिल्हा उद्योग केंद्राची भूमिका कोणत्या प्रकारची असेल याचा तुलनात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टीने जिल्हा उद्योग केंद्र आणि लातूर व जालना जिल्ह्याचे तुलनात्मक अध्ययन करण्यासाठी हा विषय

निवडण्यात आला. यामुळे दोन्ही जिल्ह्याचा दोन्ही जिल्हा उद्योग केंद्रामार्फत किती प्रमाणात औद्योगिक विकास झाला आहे आणि यातून किती प्रमाणात स्वयं रोजगार निर्माण झाला आहे तसेच कोणत्या शासनाने कोणत्या प्रकारे मदत केली आहे, याचा सविस्तर आणि चिकित्सक अभ्यास होण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

**संशोधन कालावधी :**

"जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र– तुलनात्मक अध्ययन" संशोधन अध्ययनासाठी वर्ष 1982-83 ते 2006-07 असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टये ठरविण्यात आलेली आहे.

1) सुशिक्षीत बेरोजगारांसाठी बीज भांडवल योजना जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र तुलनात्मक अध्ययन करणे.
2) जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना (ग्रामीण कारागीरांसाठी) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र तुलनात्मक अध्ययन करणे.
3) सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 आणि सामूहिक प्रोत्साहन योजना 2001 यांचा जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र तुलनात्मक अध्ययन करणे
4) पंतप्रधान रोजगार योजना जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र तुलनात्मक अध्ययन करणे
5) जालना आणि लातूर जिल्ह्यातील लघु उद्योजकांचा तुलनात्मक अध्ययन करणे.

**संशोधन गृहीतके :**

प्रस्तुत संशोधन खालील गृहीतकांनुसार करण्यात आले आहे.

1) औद्योगिक विकासाचा वेग लातूर जिल्ह्यात अधिक आहे.
2) सामूहिक प्रोत्साहन योजनेमुळे लघु उद्योगांच्या विकासास गती मिळते.
3) स्वयंरोजगाराच्या संदर्भात अनुकूल स्थिती दोन्ही जिल्ह्यात नाही.
4) आधारभूत सोयींच्या संदर्भात दोन्हीही जिल्ह्यात तफावत आढळते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत प्रबंधाच्या संशोधनासाठी द्वितीय साधन सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. यासाठी अहवाल पुस्तके, मासिके, शासकीय अध्यादेश, सांख्यिकी कार्यालयातील माहिती, जिल्हा उद्योग केंद्रातील अहवाल, जिल्हा माहिती कार्यालयातील माहिती, संकेतस्थळे, शासकीय प्रकाशने इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे.

दोन्ही जिल्हा उद्योग केंद्रातील विविध योजनांच्या आकडेवारीवरून दोन्ही जिल्ह्यातील योजनांचे तुलनात्मक अध्ययन करण्यासाठी 'सहसंबंध' (Correlation), 'विचरण गुणांक'(Coefficient of variation), 'चक्रवाढ वृद्धीदर'(Compound Growth Rate) या सांख्यिकीय साधनांचा उपयोग करून विश्लेषण केले आहे.

**प्रकरणांची रूपरेषा :**

'जालना व लातूर जिल्हा उद्योग केंद्र– तुलनात्मक अध्ययन' हा प्रबंध प्रामुख्याने

खालील प्रकरणांमध्ये विभागलेला आहे.

**प्रकरण पहिले: प्रस्तावना**

प्रस्तूत प्रकरणामध्ये देशातील औद्योगिकीकरण, समतोल औद्योगिक विकासाची आवश्यकता, नवीन आर्थिक धोरणातील औद्योगिक धोरणे, भारतीय उद्योगातील रोजगार आणि जिल्हा उद्योग केंद्रामधील संघटन व रचना यांचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा**

या प्रकरणामध्ये जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा उद्योग केंद्रातील विविध योजना व लघु उद्योग यांच्या संबंधित अभ्यासकांनी व संशोधकांनी केलेल्या अभ्यासाचा तसेच संशोधनाविषयी प्रकाशित साहित्याचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण तिसरे : जालना व लातूर जिल्हाची पार्श्वभूमी**

प्रस्तूत प्रकरणामध्ये जालना आणि लातूर जिल्ह्यातील प्राकृतिक रचना, भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ व प्रशासकीय विभाग, हवामान व पर्जन्यमान आणि जमीन तसेच लोकसंख्या, साक्षरता, उत्पन्न अंदाज, क्षेत्रवार उत्पन्नाची विभागणी, पायाभूत सुविधा, उद्योग, जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र रचना व व्यवस्थापन यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**प्रकरण चौथे : जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्रातील विविध योजनांचे तुलनात्मक अध्ययन**

4.1 सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्यक बीज भांडवल योजना

4.2 जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना (ग्रामीण कारागीरांसाठी)

4.3 सामूहिक प्रोत्साहन योजना

4.4 पंतप्रधान रोजगार योजना

4.5 लघु उद्योगांचा तुलनात्मक अभ्यास

**प्रकरण पाचवे : निष्कर्ष आणि शिफारशी**

या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधन कार्यात आढळलेला निष्कर्ष नोंदवून महत्त्वपूर्ण शिफारशी सुचविल्या आहेत.

**निष्कर्ष (Conclusions) :**

1) जालना व लातूर जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत सुशिक्षित बेरोजगार अर्थ सहाय्य बीज भांडवल योजना, प्रगती वर्ष 2006-07 पर्यंत दोन्ही जिल्हा उद्योग केंद्राच्या एकूण रकमेच्या प्रमाणात एकूण रक्कम लाभार्थी प्रमाण जालना जिल्हा उद्योग केंद्रामध्ये अनुक्रमे 52.25 टक्के आणि 32.89 टक्के आहे तर लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये अनुक्रमे 47.74 टक्के आणि 67.11 टक्के एवढे आहे.

2) जिल्हा उद्योग केंद्र, जालना अंतर्गत एकूण सर्वसाधारण लाभार्थी प्रमाण 92 टक्के असून विशेष घटक योजना लाभार्थी प्रमाण 8 टक्के आहे. तर यांना एकूण बीज भांडवल रक्कम वितरण प्रमाण अनुक्रमे 86 टक्के आणि 14 टक्के आहे. तर लातूर जिल्हा उद्योग केंद्राअंतर्गत एकूण सर्वसाधारण लाभार्थी प्रमाण 15 टक्के असून विशेष घटक योजना लाभार्थी प्रमाण 5 टक्के आहे. तर यांना एकूण बीज भांडवल रक्कम

वितरण प्रमाण अनुक्रमे 95 टक्के आणि 5 टक्के आहे.

3) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत बीज भांडवल रक्कम आणि लाभार्थी प्रमाण जालना आणि लातूर तहसीलमध्ये अधिक प्रमाणात असून इतर तहसीलमध्ये किंबहुना ग्रामीण भागातील वितरण प्रमाण कमी आहे.

4) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत मार्च 2007 पर्यंत बीज भांडवल योजनेची प्रगती बघितली असता जालना जिल्हा उद्योग केंद्रामध्ये एकूण लाभार्थी 1007 असून यांना 215.18 लाख रूपये बीज भांडवल वितरीत केले, तर लातूर जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत 920 लाभार्थ्यांना 439.16 लाख रूपये बीज भांडवल वितरीत केले आहे.

5) सुशिक्षित बेरोजगारांकरीता बीज भांडवल योजना जालना आणि लातूर उद्योग केंद्रामध्ये असे स्पष्ट होते की, मार्च 2007 पर्यंत लातूर जिल्ह्यामध्ये सर्वाधिक रक्कम वितरीत केली, तर जालना जिल्ह्यामध्ये फक्त दोन्ही जिल्ह्याच्या रकमेचा प्रमाणात फक्त 32.89 प्रतिशत एवढीच रक्कम वितरीत केली. मात्र जालना जिल्हा उद्योग केंद्रामध्ये कमी रकमेत लातूर जिल्ह्यापेक्षा अधिक लाभार्थ्यांस सदरील रक्कम वितरीत केली आहे. बीज भांडवल योजने अंतर्गत जालना जिल्हा उद्योग केंद्रामध्ये जास्त लाभार्थी आणि कमी रक्कम; तर लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये जास्त रक्कम आणि कमी लाभार्थी आढळतात.

6) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्रातील बीज भांडवल वितरीत रकमेचा सहसंबंध हा ऋण (-0.0025) आहे.

7) सुशिक्षित बेरोजगारांची अर्थसहाय्य बीज भांडवल योजना जालना आणि लातूर जिल्ह्याचा वितरीत रकमेचा विचरण गुणांक अनुक्रमे 57.29 आणि 67.17 आहे. म्हणजेच यावरून लातूर जिल्ह्यामध्ये बीज भांडवल योजनामध्ये अधिक सातत्य आहे असे स्पष्ट होते.

8) जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनामध्ये सर्वसाधारण गट आणि विशेष घटक योजना लाभार्थी आणि रक्कम संदर्भात तुलना केली असता जालना जिल्ह्यामध्ये सर्वसाधारण लाभार्थी 216 यांना 36.54 लाख रूपये वितरीत केले; तर लातूर जिल्ह्यामध्ये लाभार्थी 353 यांना 64.53 लाख रूपये वितरीत केले. विशेष घटक योजनेतील जालना जिल्ह्यामध्ये 58 लाभार्थ्यांना 10.14 लाख रूपये तर लातूर जिल्ह्यामध्ये 26 लाभार्थ्यांस 4.69 लाख रूपये वितरीत केले. म्हणजेच जालना जिल्ह्यापेक्षा लातूर जिल्ह्यामध्ये विशेष घटक योजनेतील लाभार्थी आणि रक्कम अनुक्रमे 32 व 5.45 लाख रूपये कमी आहेत. तर सर्वसाधारण गटातील लाभार्थी आणि रक्कम लातूर जिल्ह्याची अधिक आहे.

9) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र

कर्ज योजना प्रगती तालुका निहाय बघितली असता जालना आणि लातूर तालुक्यामध्येच प्रगती अधिक झालेली आहे.

10) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत मार्च 2007 पर्यंत जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना प्रगती बघितली असता जालना जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत 274 लाभार्थ्यांना 46.68 लाख रूपये वितरीत केले तर लातूर जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत 379 लाभार्थ्यांस 69.51 लाख रुपये वितरीत केले आहे. म्हणजेच जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना एकूण रक्कम वितरण जालना जिल्हा उद्योग केंद्रापेक्षा लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये 22.83 लाख रूपये अधिक वितरीत केले आहे.

11) जालना जिल्हा उद्योग केंद्रामधील कर्ज योजनांचे एकूण लाभार्थी आणि रक्कम लातूर जिल्हा उद्योग केंद्रापेक्षा कमी आहे. दोन्ही जिल्हा उद्योग केंद्राच्या एकूण रकमेच्या प्रमाणात जालना जिल्ह्याचे प्रमाण 40.18 टक्के असून लातूर जिल्ह्याचे प्रमाण 59.82 टक्के आहे. तर लाभार्थ्यांचे प्रमाण जालना आणि लातूर जिल्ह्यामध्ये अनुक्रमे 41.96 टक्के आणि 58.03 टक्के आहेत.

12) जालना आणि लातूर यांच्यातील जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना रक्कम वितरण सहसंबंध धन (0.57) आहे. पण जालना जिल्हा उद्योग केंद्रापेक्षा लातूर जिल्हा उद्योग केंद्राची वितरीत रक्कम अधिक आहे. जालना जिल्हा उद्योग केंद्रामध्ये रक्कम आणि लाभार्थी यांचा सहसंबंध धन (0.85) आहे. तर लातूर जिल्हा उद्योग केंद्रामधील रक्कम व लाभार्थी सहसंबंध धन (0.24) आहे. म्हणजेच जालना जिल्हा उद्योग केंद्रामध्ये कमी रकमेत अधिक लाभार्थी तर लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये जास्त रक्कम कमी लाभार्थ्यास वितरीत केलेली आढळते.

13) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनामधील विचरण गुणांक (Co-efficient of variation) विचारात घेता जालना जिल्ह्याचा विचरण गुणांक 80.54; तर लातूर जिल्ह्याचा विचरण गुणांक 69.29 आहे. म्हणजेच जालना जिल्ह्यापेक्षा लातूर जिल्ह्याचा उद्योग केंद्रामध्ये सदरील योजनांसंदर्भात सातत्य अधिक आहे. म्हणून लातूर जिल्ह्याचा विकास अधिक झालेला आहे.

14) सामूहिक प्रोत्साहन योजना अंतर्गत 'ड' आणि 'ड+' अशी वर्गवारी केली असून जालना जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत फक्त जालना तालुकाच 'ड' वर्गवारीत आहे. तर इतर तालुके 'ड+' वर्गवारी गटात येते. तर लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये लातूर, रेणापुर, निलंगा आणि शिरूर अनंतपाळ हे तालुके 'ड' वर्गवारीत येतात तर इतर तालुके 'ड+' वर्गवारीत येतात. म्हणजेच जालना जिल्ह्यापेक्षा लातूर जिल्ह्यामध्ये 'ड' वर्गवारी तालुके अधिक आहे.

15) जिल्हा उद्योग केंद्र जालना आणि लातूरमध्ये सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 व 2001

प्रगती बघितली असता घटक संख्या, गुंतवणूक व अनुदान हे जालना जिल्हा उद्योग केंद्रापेक्षा लातूर जिल्हा उद्योग केंद्राचा प्रगतीस्तंभ आलेख उंच आहे.

16) जालना जिल्हा उद्योग केंद्रामध्ये सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 मध्ये केलेले एकूण वाटप घटक 132 आणि रक्कम 952.44 लाख रूपये; तर लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये 562 घटकांना 2555.54 लाख रूपये वाटप करण्यात आले. म्हणजेच जालना जिल्ह्यापेक्षा लातूर जिल्ह्यामध्ये 430 घटकांना 612.1 लाख रुपये अधिक वितरीत केले आहेत. म्हणजेच मराठवाड्याच्या एकूण संख्येच्या प्रमाणामध्ये जालना जिल्ह्याचे घटक आणि रक्कम प्रमाण अनुक्रमे 6.21 आणि 8.41 आहे तर लातूर जिल्ह्याचे घटक आणि रक्कम प्रमाण अनुक्रमे 26.44 टक्के आणि 22.78 टक्के आहे. म्हणजेच जालना जिल्ह्यापेक्षा लातूर जिल्ह्यामध्ये सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 चे वाटप निधी अधिक आहे. म्हणजेच सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 चे वितरीत रक्कम प्रमाण जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्राचे अनुक्रमे 27 टक्के आणि 73 टक्के आहे. म्हणजेच जालना जिल्हा उद्योग केंद्रापेक्षा लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये वितरीत रकमेचे प्रमाण अधिक आहे.

17) सामूहिक प्रोत्साहन योजना 2001 ची जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्राची प्रगती बघितली असता मार्च 2007 मध्ये एकूण 112 घटकांना 1042.89 लाख रूपये वाटप करण्यात आले आहेत. तर मराठवाड्यात 328 घटकांना 2419.71 लाख रूपये वाटप करण्यात आले आहेत. मराठवाड्याच्या एकूण वाटपाच्या प्रमाणात जालना जिल्ह्याचे प्रमाण 10.04 असून लातूर जिल्ह्याचे प्रमाण 33.15 आहे. मराठवाड्याचा एकूण अनुशेष घटक 592 असून वाटप रक्कम 4212.61 लाख रूपये आहे. जालना जिल्हा उद्योग केंद्र घटक अनुशेष 52 असून 572.6 लाख रूपये आहे. तर लातूर जिल्हा उद्योग केंद्र घटक अनुशेष 124 असून 1062.280 लाख रूपये आहे. म्हणजेच लातूर जिल्हा उद्योग केंद्राचा अनुशेष जालना जिल्हा उद्योग केंद्रापेक्षा अधिक आहे. म्हणजेच सामूहिक प्रोत्साहन योजना 2001 चे वितरीत रक्कम प्रमाण बघितले असता जालना जिल्हा उद्योग केंद्राचे 23 टक्के तर लातूर जिल्हा उद्योग केंद्राचे 77 टक्के आहे.

18) सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 व 2001 चे वितरीत अनुदान प्रमाण जालना जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत 30 टक्के आहे. तर लातूर जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत 70 टक्के आहे. म्हणजेच जालना जिल्हा उद्योग केंद्रापेक्षा लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये अनुदान प्रमाण अधिक आहे.

19) जिल्हा उद्योग केंद्र जालना आणि लातूर मधील पंतप्रधान रोजगार योजना

तालुकानिहाय प्रगती बघितली असता जालना आणि लातूर तालुक्यातील प्रगती अधिक आढळते; तर इतर तालुक्यातील प्रगती कमी आहे.

20) जिल्हा उद्योग केंद्र जालना आणि लातूर पंतप्रधान रोजगार योजना संदर्भात प्रगती बघितली असता सदर कालावधीत जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत लाभार्थी अनुक्रमे 5900 आणि 5981 असून यांना वितरीत एकूण रक्कम अनुक्रमे 3100.56 आणि 3306.47 लाख रूपये वितरीत केले आहे. तर यांना एकूण अनुदान अनुक्रमे 463.95 आणि 495.98 लाख रूपये वितरीत केले आहे. म्हणजेच लातूर जिल्ह्यामध्ये 81 लाभार्थ्यांना वितरीत रक्कम 206 लाख रूपये तर अनुदान 32.03 लाख रूपये जालना जिल्हा उद्योग केंद्रापेक्षा अधिक वितरीत केले आहे.

21) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्रातील लाभार्थी प्रमाण बघितले असता अनुक्रमे 62 टक्के आणि 38 टक्के आहे; तर रक्कम प्रमाण 48 टक्के आणि 52 टक्के आहे. म्हणजेच जालना जिल्हा उद्योग केंद्रातील लाभार्थी प्रमाण 62 टक्के असून रक्कम प्रमाण 48 टक्के आहे. तर लातूर जिल्हा उद्योग केंद्रातील लाभार्थी प्रमाण 38 टक्के असून रक्कम वितरण प्रमाण 52 टक्के आहे. म्हणजेच जालना जिल्हा उद्योग केंद्रामध्ये अधिक लाभार्थ्यास कमी रक्कम, तर लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये कमी लाभार्थ्यास अधिक रक्कम वितरीत केलेली आहे.

22) पंतप्रधान रोजगार योजनेमध्ये लाभार्थ्यास दिलेल्या रकमेचा विनियोग व्यवसायासाठी न करता इतर कारणांसाठी विनियोग करत असल्यामुळे स्वयंरोजगारांच्या संदर्भात अनुकूल स्थिती दोन्ही जिल्ह्यात नाही.

23) पंतप्रधान रोजगार योजना रक्कम सहसंबंध जालना आणि लातूर जिल्ह्याचा 0.26 असून विचरण गुणांक जालना जिल्ह्याचा 48.97, तर लातूर जिल्ह्याचा 32.11 आहे. म्हणजेच लातूर जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत सदर योजनेमध्ये सातत्य अधिक आहे.

24) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्रामधील पंतप्रधान रोजगार योजना लाभार्थी उद्दिष्ट सहसंबंध 0.37 आहे. तर याचा विचरण गुणांक बघितला असता जालना जिल्हा उद्योग केंद्राचा 43.005; तर लातूर जिल्हा उद्योग केंद्राचा 36.668 आहे. म्हणजेच जालना जिल्ह्यापेक्षा लातूर जिल्ह्यामध्ये लाभार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे. म्हणजेच लाभार्थी उद्दिष्ट प्रमाण अगोदर ठरवित असतांना लाभार्थी उद्दिष्ट समाधानकारक निश्चित केले जात नाही. आणि याचाच फायदा लातूर जिल्हा उद्योग केंद्राला अधिक झालेला आढळतो.

25) जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत पंतप्रधान रोजगार योजनामधील लाभार्थी– रक्कम सहसंबंध हा जालना जिल्हा उद्योग केंद्राचा 0.96, तर लातूरचा 0.95 आहे; तर जालना आणि लातूर

जिल्ह्यातील पंतप्रधान रोजगार योजना वितरीत रक्कम सहसंबंध 0.26 आहे. तर विचरण गुणांक जालना जिल्ह्याचा 48.97, आणि लातूर जिल्ह्याचा 32.11 आहे. म्हणजेच रक्कम वितरण सातत्य लातूर जिल्हा उद्योग केंद्रामध्ये अधिक आहे. म्हणून लातूर जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत पंतप्रधान रोजगार योजनेद्वारे अधिक लाभार्थ्यास व्यवसाय निर्माण करण्यास मदत झाली. त्यामुळे लातूर जिल्ह्याचा विकास अधिक झालेला आहे.

26) 1982-83 ते 2006-07 या कालावधीत जालना जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत एकूण लघु उद्योग घटक संख्या 13603 असून लातूर जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत एकूण लघु उद्योग घटक संख्या 22812 आहे. जालना जिल्ह्यापेक्षा लातूर जिल्ह्याची लघु उद्योग घटक संख्या 1209 अधिक आहे. तर गुंतवणूक जालना जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत लघु उद्योग घटकासाठी 2593.86 कोटी रूपये; तर लातूर जिल्ह्यातील लघु उद्योग घटकासाठी गुंतवणूक 2663.18 कोटी रूपये, असून जालना जिल्ह्यापेक्षा लातूर जिल्ह्याचे गुंतवणूक 69.62 कोटी रूपये ने अधिक आहे. जालना जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत लघु उद्योग घटकातील एकूण रोजगार संख्या 110327; तर लातूर जिल्हा उद्योग केंद्राची एकूण रोजगार संख्या 97607 असून लातूर जिल्ह्यापेक्षा जालना जिल्ह्यामध्ये 12720 रोजगार संख्या अधिक आहे. म्हणजेच लातूर जिल्ह्यात अधिक लघु उद्योग घटक व यासाठी असणारी गुंतवणूक अधिक असतांना सुद्धा रोजगार संख्या कमी आहे; तर जालना जिल्ह्यात गुंतवणूक कमी असतांना रोजगार संख्या अधिक आहे.

27) जिल्हा उद्योग केंद्र जालना आणि लातूर यांची निर्मिती जवळजवळ सोबतच होऊनही जालना जिल्हा उद्योग केंद्राला मिळणाऱ्या निधीचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे जालना जिल्ह्याचा विकास कमी झालेला आहे.

**शिफारशी (Recommendations) :**

1) जिल्हा उद्योग केंद्र जालना आणि लातूर यांची निर्मिती जवळजवळ सोबतच होऊनही सुशिक्षीत बेरोजगारांकरिता अर्थसहाय्य बीज भांडवल योजनेकरीता वितरीत रक्कम लातूर जिल्हा उद्योग केंद्राची अधिक; तर जालना जिल्हा उद्योग केंद्राची कमी आहे. यामुळे जालना जिल्ह्यामधील बेरोजगारांना कमी बीज भांडवल उपलब्ध झाल्यामुळे त्यांचा परिणाम जालना जिल्ह्याची प्रगती कमी होण्यासाठी झाला आहे. या करिता दिला जाणारा निधी अधिक वाढविणे आवश्यक आहे.

2) जिल्हा उद्योग केंद्राला दिला जाणारा निधी विकासाच्या प्रमाणात वाटप करावा. ज्या जिल्ह्याचा विकास कमी झालेला आहे त्यांना अधिक निधी उपलब्ध करून द्यावा. म्हणजेच जालना जिल्ह्याला अधिक निधी मिळण्यास मदत होईल.

3) सुशिक्षित बेरोजगारांकरीता बीज भांडवल

योजनेमध्ये शासनाने जिल्हा उद्योग केंद्रामध्ये राष्ट्रीयकृत बँकांना सक्तीचे करून सुशिक्षित बेरोजगारांना बीज भांडवल वितरीत करण्याचे आदेश द्यावेत.

4) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत कर्ज योजनेसाठी दिली जाणारी रक्कम आणि लाभार्थी यांचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. सदरील योजनेमध्ये दिलेली रक्कम ही लाभार्थ्यास अपूरी पडत असल्यामुळे सदरील रकमेचा विनियोग व्यवस्थित होत नाही.

5) जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेचा (ग्रामीण कारागीरांसाठी) उपयोग ग्रामीण कारागीरांसाठी व्हायला पाहिजे. जेणे करून ग्रामीण भागातील कारागीरांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल आणि शहराकडे येणारा ग्रामीण कारागीरांचा लोंढा कमी होईल. जिल्हा उद्योग केंद्रामध्ये कर्ज योजना मंजूर रक्कम प्रमाण इतर योजनेतील मंजूर रकमेपेक्षा अत्यंत कमी आहे. म्हणून शासनाने जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना निधी वाढवून ग्रामीण कारागीरास कर्ज पुरवठा करावा.

6) जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेअंतर्गत जालना जिल्हा उद्योग केंद्राला शासनाकडून अधिक प्रमाणात निधी मिळाला पाहिजे. जेणे करून लाभार्थ्यास कर्ज रूपाने वितरीत करून त्यांना रोजगार उपलब्ध होईल व या माध्यमातून लाभार्थ्यांच्या विकासाबरोबरच जालना जिल्ह्याचा विकास होण्यास मदत होईल.

7) सामूहिक प्रोत्साहन योजनांमुळे लघु उद्योगांना प्रोत्साहन मिळत असते आणि यावर औद्योगिक विकास अवलंबून असतो. या आधारे लातूर जिल्ह्यामध्ये सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 व 2001 मधील गुंतवणूक आणि रक्कम प्रमाण जालना जिल्ह्यापेक्षा अधिक असल्यामुळे लातूर जिल्ह्यामधील विकासाचा वेग अधिक आहे. शासनाने लातूर जिल्हा उद्योग केंद्राला अधिक निधी दिल्यामुळे लातूर जिल्ह्याचा विकास अधिक वेगाने झाला आहे. शासनाने निधी वाटप करतांना राजकारण न करता जिल्ह्याच्या विकासाच्या प्रमाणात निधी वाटप केला असता तर लातूर सारखा जालना जिल्ह्याचा औद्योगिक विकास होण्यास मदत होईल.

8) पंतप्रधान रोजगार योजनेतील लाभार्थी हे जालना जिल्हा आणि लातूर जिल्ह्यामध्ये जालना आणि लातूर तालुक्यातीलच लाभार्थ्यांनी अधिक फायदा घेतलेला आहे. तर यामुळे उर्वरीत तालुक्याच्या लाभार्थ्यांच्या विकासावर याचा प्रतिकूल परिणाम होतो. हा प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी प्रामुख्याने ग्रामीण लाभार्थ्यांना पंतप्रधान रोजगार योजनेअंतर्गत जास्त रक्कम वाटप करून त्यांना स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी त्यांना शासनाकडून अनुकूल वातावरण निर्माण करून द्यावे.

9) जालना आणि लातूर जिल्ह्यात आधारभूत सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिल्या तर लघु उद्योग घटकांचा विकास

मोठ्या प्रमाणात होईल. विशेषत: जालना जिल्ह्यातील लघु उद्योग घटकांचा विकास करण्यासाठी आधारभूत सुविधांची उपलब्धता (जमीन, वीज, पाणी, भांडवल) करून देऊन, त्याचबरोबर माहिती तंत्रज्ञान, बायोटेक्नॉलॉजी, वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालये, स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रे यांची उपलब्धता झाली तर जालना जिल्ह्याचा विकास होण्यास मदत होईल.

10) जालना आणि लातूर जिल्ह्यामध्ये कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणारे कृषी उद्योग स्थापन केले तर याचा फायदा उद्योगांना कच्चा माल स्थानिक पातळीवर उपलब्ध होईल की, जेणे करून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळेल आणि उद्योगाला सहज कच्चा माल मिळाल्यामुळे उद्योगांची प्रगती होईल. याकरिता कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योग जर जालना जिल्ह्यामध्ये स्थापन केले तर याचा परिणाम जिल्ह्याचा विकास होण्यावर निश्चित होईल.

11) जिल्हा उद्योग केंद्रांमधील विविध योजनेचे उद्दिष्ट ठरवित असतांना सदरील योजनेचे लाभार्थी एकाच तालुक्याच्या ठिकाणी केंद्रीभूत न करता ज्या तालुक्यांचा विकास झाला नाही अशा तालुक्यांच्या ठिकाणी जिल्हा उद्योग केंद्रातील योजनांची अंमलबजावणी केल्यास जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

12)) जालना जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत लघु उद्योग गुंतवणूक प्रमाण वाढवून जिल्ह्यातील लघु उद्योगाचा विकास करण्यासाठी शासनाने प्रोत्साहनात्मक विशेष योजना जालना जिल्ह्यामध्ये राबविणे गरजेचे आहे आणि मोठे प्रकल्प जालना जिल्ह्यामध्ये आणले तर रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत होईल.

13) जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत असलेले लघु उद्योग यांना लागणारा कच्चा माल मिळविण्यासाठी मदत करावी तसेच उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे काम जिल्हा उद्योग केंद्राने करायला पाहिजे.

14) जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत बीज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना, सामुहिक प्रोत्साहन योजना, पंतप्रधान रोजगार योजना आणि लघु उद्योगासाठी दिला जाणारा निधी जालना आणि लातूर या शहरापुरताच केंद्रीत न करता ग्रामीण तालुक्याकरिता किंबहुना ग्रामीण भागाकरिता उपलब्ध झाला तर याचा फायदा धनात्मक होऊन ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होईल.